माणूस
साप्ताहिक
२१ जून १९६९ । किंमत ४० पैसे

# विहंगमावलोकन

सरोवर.... रविंद्र सरोवर प्रकरण
सरिता..... बंगाली युवतीची ओळख
सागर..... बंगाली युवकाची मनःस्थिती
सलिल .... बंगाली जीवनाचे स्वरूप
समीर..... बंगालमधील साम्यवाद
सिकता.... नक्षलवादी चळवळीचे आव्हान
साद.. .... बंगला-नक्षलवादी प्रेरणा
सेतु....... बंगाल आणि भारत

# कलकत्ता दिनांक

लेखक : चंद्रशेखर

आगामी २८ जून 'माणूस' अंकापासून क्रमश: प्रकाशन

# नियमितपणें वापरल्यानें फोऱ्हान्स टूथपेस्ट हिरड्यांचे विकार व दंतक्षय यांना आळा घालते

तरुण तसेंच वयस्कर लोकांकडून आलेली अनाहूत प्रशस्तीपत्रें हिरड्यांचे विकार व दंतक्षय यांना आळा घालण्यात फोऱ्हान्स टूथपेस्टला मिळालेल्या आश्चर्यजनक यशाची स्तुति करतात. ही प्रशस्ती पत्रें जेफ्री मॅनर्स ॲन्ड कं. लि. च्या कोणत्याहि कार्यालयात पहावयास मिळतील.

"मला दांतांच्या विकाराचा त्रास होत असे. मी आपली फोऱ्हान्स वापरू लागलो. आता मला दांतांचा कोणताच विकार नाहीं. सुमारे २० ते २५ लोक आधीची टूथपेस्ट बदलून फोऱ्हान्स वापरू लागले आहेत. आणि माझ्या कुटुंबात तर ती सर्वात अत्यंत आवडती होऊन राहिली आहे."

—उदयशंकर तिवारी, पाटणा.

"शास्त्रीय पद्धतीने बनविलेली आपली फोऱ्हान्स टूथपेस्ट गेली दहा वर्षें मी वापरीत असून तिच्यामुळे माझे हिरड्यांचे सर्व विकार दूर झाले. आता माझ्या कुटुंबातील सर्वजण फोऱ्हान्स टूथपेस्टने नियमितपणे दांत घासतात."

—एस. एम. लाल, नवी दिल्ली.

दांतांची योग्य निगा राखण्यासाठीं फोऱ्हान्स टूथपेस्ट व फोऱ्हान्स दुहेरी कार्य करणारा टूथब्रश दर रात्रीं व सकाळीं वापरा...आणि आपल्या दंतवैद्याकडे नियमितपणें जात चला!



मोफत! "दांतांची व हिरड्यांची निगा" नामक रंगीत पुस्तिका

ही पुस्तिका आपल्याला मराठी, हिंदी अथवा इंग्रजीमधून मिळूं शकेल. त्याकरितां हे कूपन भरून (टपालखर्चासाठीं) १५ पैशांच्या स्टॅम्पसहित पुढील पत्त्यावर त्वरित पाठवा: मॅनर्स डेन्टल ॲडव्हायझरी ब्यूरो, पोस्ट बॅग क्रमांक १००३१, मुंबई १.

नांव ______________________ वय ________

पत्ता ______________________________

भाषा ____________________

**फोऱ्हान्स** दंतवैद्याने निर्मिलेली टूथपेस्ट

65F-182MR

२१ जून १९६९

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : नववे : अंक : तिसरा

**संपादक : श्री. ग. माजगावकर**

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव पुणे २ : दूरध्वनी : ५७३५९

किंमत : ४० पैसे वार्षिक वर्गणी : वीस रुपये परदेशची वर्गणी : चाळीस रुपये




माणूसचा ७ जूनचा अंक वाचला. त्यातील मुंबई समाचार, मुक्ताफळे व दादूमिया यांचा वन्ना-पार्टी...हे सर्व लेख फार आवडले. दादूमिया यांचे खरे नाव–गाव कळल्यास बरे होईल म्हणजे त्यांचे व्यक्तिगत अभिनंदन करता येईल. २४।५ च्या अंकातील कव्हर पानावरील आपले मत पटले. श्री. जगजीवनराम यांचे अभिनंदन. ३१।५ च्या अंकातील कव्हर पान एक व दोन वरील श्री सरवटे यांची व्यंगचित्रे कमालीची बोलकी आहेत.

जून, ११. **मनोहर दामले**–कुर्ली.

७ जूनचा वर्षारंभ अंक वाचला. नवव्या वर्षा-निमित्त अभिनंदन. मुखपृष्ठ उत्तम. दादूमिया छान. झुंड मजा आणते. वसंत सरवटे यांचे ब्लॉक्स मात्र चांगले नाहीत. सत्यकथेवरच्या मुखपृष्ठासारखे काहीतरीच. मलपृष्ठावरील त्यांची व्यंगचित्रे मात्र छान आहेत.

जून, ९. **अशोक गोखले.**

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.



# मुंबई समाचार

सु. ल. सोमण

## वळवळणारे साप वेळीच ठेचा

चळवळींना, दंगलींना अत्याचारांना भीक घालणार नाही, हिंसाचारांच्या दडपणापुढे मान तुकवणार नाही. वगैरे बऱ्याच वल्गना पंतप्रधान, गृहमंत्री वगैरे वरिष्ठ नेत्यांनी तेलंगण-चळवळीबाबत केल्या. पण शेवटी परवा ह्या साऱ्या वल्गना गुंडाळून ठेवून, इंदिराजी धावत-पळत हैद्राबादेत गेल्या. पाठोपाठ श्री. चव्हाणही जाऊन ठेपले. आज श्री. चव्हाणांच्या हैद्राबादेत, तेलंगणातल्या विविध नेत्यांशी वाटाघाटी चालू आहेत. व शक्यतो महिनाभरांत तेलंगण प्रश्नावर काही निर्णयिक पावलं केंद्र सरकार टाकील असं घोषित करण्यात आलं आहे. केंद्रिय नेत्यांनी परिस्थिती एवढी हाताबाहेर जाईपर्यंत वाट का पाहावी हेच समजत नाही. अर्थात त्याचं आताशा आश्चर्यही वाटेनासं झालं आहे म्हणा ! आधी प्रश्न घोळत ठेवायचे, निदर्शनं चालू झाली की तीकडे कानाडोळा तरी करायचा किंवा दडपशाही तरी करायची, जुजबी इलाज म्हणून वेळखाऊ कमिशनं नेमायची आणि शेवटी परिस्थिती हाताबाहेर जाऊ लागली की धावपळ करुन, दडपणाला बळी पडून, विरोधकांच्या मागण्या मान्य करायच्या ! हा परिपाठ शासनाच्या अगदी अंगवळणीच पडला आहे. पंजाब, संयुक्त महाराष्ट्र, विदर्भविद्यापीठ,—गेल्या वीस वर्षात अशी अनेक उदाहरणं घडली; पण काँग्रेस सरकार त्यापासून काहीही शिकायला तयार नाही, हेच खरं !

तेलंगण आंदोलनाबाबत एक अगदी वेगळी बातमी अलिकडेच वाचण्यात आली. काही दिवसांपूर्वी तेलंगणाच्या मुस्लिम समाजाकडून आंध्र सरकारकडे काही मागण्या सादर करण्यात आल्या. आंध्रचा मुख्यमंत्री आलटूनपालटून मुसलमान व हिंदू असावा, नोकऱ्या, शासन यंत्रणा, पोलिस ह्यांतून मुसलमानांना त्यांच्या

[ पान ५८ पाहा ]



# मुक्ताफळे

## ऐन लग्नातील ज्वलंत समस्या !

लग्ना-मुंजीत सारखे आहेर देण्याचा महिना संपून आता शाळा-कॉलेजे उघडली आहेत. मुलांची व स्वागतसमारंभाची कटकट एकदम बंद झाल्याने सर्वांना मोकळे-मोकळे वाटत आहे. स्वागत समारंभाला जाऊन गोल्डस्पॉट पिऊन आल्याबरोबर साधारणपणे कुणाचे कुणाशी लग्न झाले हे देखील मंडळींना आठवत नाही. रात्री दिवसाचा हिशेब म्हणून दैनंदिनीत '५ रु. आहेर' असे लिहिताना जी छातीत लहानशी कळ येत असेल तेव्हाच काय ती क्षणभर लग्नाची दुःखद आठवण.

परंतु काही लग्ने ही विक्षिप्तपणामुळे अजरामर होण्याची पुण्याची परंपरा आहे. पुण्याच्या एका प्राध्यापकांनी यंदा लग्न केले. त्यांच्या निमंत्रणपत्रिकेत विशिष्ट पद्धतीने नावे लिहिलेली होती. आम्हांस वाटले ही एक नवीन टूम असेल ! कारण स्वतःचे नाव, वडिलांचे नाव व शेवटी आईचे नाव अशी ही पद्धत होती व वधु-वरांनी आपली नावे या पद्धतीनेच दिलेली होती. प्राध्यापकांचे नाव दामोदर रामचंद्र सीता.

कुणी आपले नाव कसेही लिहिले तरी त्यावर लिहिण्याची गरज आजपर्यंत भासलेली नव्हती. परंतु या पत्रिकेबरोबर प्राध्यापकांनी एक चार पानी टंकलिखित निवेदन जोडलेले होते.—"नावात काय आहे ?" आम्हाला वाटले विसरभोळेपणामुळे प्राध्यापकांनी चुकून पत्रिका संपादकांकडे व लेख आमच्याकडे पाठवला असावा. पत्रिकेत विशिष्ट पद्धतीने नावे का दिली आहेत यासंबंधी या निवेदनात प्राध्यापक लिहितात—

"गेल्या काही शतकांपासून भारतीय समाजाला 'जातीयता' हा एक शाप ठरला आहे. व्यक्तिशः जातीयतेची पाळेमुळे लहानमोठ्या प्रयत्नांनी संपूर्णपणे

उखडून टाकावी अशा मताचे आम्ही आहोत. त्याचप्रमाणे समाजात समानता निर्माण करण्यासाठी हरघडीला प्रयत्न केला पाहिजे असे आम्हास वाटते. "

जातीयता हा शाप असेल. परंतु भारताला तो शाप ठरला आहे, असे आम्हास वाटत नाही. गेली वीस-पंचवीस वर्षे आपल्याला जो काँग्रेसचा सुदृढ व चोख कारभार लाभला, तो जाती नसत्या तर शक्य होता काय, याचा सुज्ञांनी विचार करावा ! तेव्हा जातीयतेची पाळेमुळे उखडून टाकण्याची भाषा ही काँग्रेस उखडून टाकण्याची भाषा होय. झाडाच्या फांदीवर बसून चार पाने खुडायची आणि आपण पाळेमुळे उखडणार आहोत असे आपले सांगायचे असल्यास खुशाल सांगावे. प्राध्यापक सांगतात—

" महाराष्ट्रात शेकडा ७५% आडनावांवरून जातीचा बोध होतो. आडनावे संपूर्णपणे वगळल्यास चार-एक पिढ्यात आडनावावरून सुप्तपणे होणारा जातीचा बोध नष्ट होण्यास मदत होईल व व्यवहारात आपल्या अंतर्मनावर एक नकळत जो दुष्टपरिणाम होत असतो तो दूर होईल. "

चालू जमान्यात इतर सर्व 'बोध' खोटे असून जातीचा बोध हाच एकमेव खरा बोध होय ! समजा, आडनावे लिहिली नाहीत. नोकरीतील दहा टक्के जागा हरिजनांना ठेवलेल्या आहेत. हजारो अर्ज आलेले आहेत. कसे निवडायचे हरिजन-बंधू इंटरव्ह्यूसाठी ? कंसात हरिजन लिहिण्यापेक्षा आडनावातून ते सांगितलेले चांगले नाही का ? कारण निवड तर जातीवरच करायची आहे ना ? रयत शिक्षण संस्थेच्या कॉलेज संचालकांना प्रिन्सिपॉल नेमताना भोसले, शिंदे, यांचे अर्ज चटकन बाजूला करता येतात आणि सदाशिवपेठी कॉलेजांना दामले, कुलकर्णी, जोशी यांचे अर्ज बाजूला काढता येतात. फारशी तकलीफ न होता जे आज सहज जमते आहे त्यात बिघाड करण्यात काय बरे हंशील आहे ? जागा जात पाहून द्यायच्या हे तर नक्की ठरलेले आहे !

शिवाय प्राध्यापकांनी सुचविलेली सूचना ही अंमलात आणूनही जात लपेलसे वाटत नाही. विष्णू गोविंद जोश्याने आपली मातुश्री सांगितली व आडनाव लपवून नाव सांगितले विष्णू गोविंद रुक्मिणी तरी त्याची जात कशी लपणार ? कारण गोविंदराव जोशी आपल्या मुलाचे नाव भीम, शिवाजी, संभाजी, आबाजी असे ठेवीत नाहीत हे तर सगळ्यांना ठाऊकच आहे. हिंदू कोण, मुसलमान कोण, पारशी कोण, इसाई कोण हे देखील ओळखू न येण्याची खरीखुरी व्यवस्था करायची असेल तर गोविंदरावांच्या बापाने त्याचे नाव जोसेफ व जोसेफ जोश्याने विष्णूचे नाव महंमद ठेवायला हवे होते. म्हणजे नाव झाले असते महंमद जोसेफ जोशी ! लागणार आहे पत्ता जातीचा ? घरी जावे तो महंमद आपला चतुर्थी सोडतोय ! लग्न-समारंभात भटजी म्हणतील जोशी कुलोत्पन्नेन जोसेफ सुनुना महंमदशर्मणा ! तेव्हा जाती पार रसातळाला न्यायच्या असतील तर सरकारने सर्व 'बारशी'

नाव्यान घ्यावी. मुलाचे नाव ठेवताना सरकारकडे अर्ज करावा लागेल. मग सरकार पाच-सहा नावे सुचवील व त्यातले एक नाव ठेवता येईल, अशी व्यवस्था व्हायला पाहिजे. एकदा अशी व्यवस्था झाली की एकदोन पिढ्यानंतर लग्नपत्रिका छापताना 'जात दाखव आणि लग्न कर' हा प्रकार होणार नाही. 'क्रासब्रीड' पत्रिका अशी हायब्रीड असेल !

आमचे येथे गजानन शंकर पार्वती कृपेकरून आमचा ज्येष्ठ पुत्र 'नवरोज' याचा विवाह श्रीयुत महंमद जोसेफ झेबुन्निसा यांची कनिष्ठ कन्या मार्गारिट हिजबरोबर दिनांक १०-५-२०१० रोजी होणार आहे. या प्रसंगी होणाऱ्या स्वागत-समारंभास आशीर्वाद व आहेर देण्यासाठी आपण अवश्य यावे ही विनंती.

**शिवाजी गुलामहुसेन ज्युलिया**
**आयेशा भीमा विठा.**


वडील बंधूंचे विनंतीस मान देऊन अवश्य यावे.

**अफझल गुलामहुसेन ज्युलिया.**
**सीता झाकीर निर्मला.**

अशा पत्रिकेमुळे कसलाही बोध तर अशक्य होईलच शिवाय अंतर्मनावर नवरोज-मार्गारिट यांना प्रत्यक्ष पाहण्याची विलक्षण ओढ निर्माण होईल यात शंका नाही !

आमचे म्हणणे आडनावे ही तितकीशी मारक नसून नावे हीच जास्त जातीय असल्याने या पद्धतीने जातीयवादाची पाळेमुळे, लवकर उखडना येतील !

नावातील जातीयता काढणे शक्य होईल, परंतु संस्कृती व पेहराव यांवरून ओळखली जाणारी जात नाहीशी करणेही आवश्यक आहे. असा पहिला मोठा प्रयत्न शिवाजीमहाराजांनी केलेला दिसतो. सर्व खान मंडळींना दाढ्या होत्या. शहेनशहा औरंगजेबालाही दाढी होती. महाराष्ट्रातील मुसल-

मानांना आपलेसे करण्यासाठी शिवाजीमहाराजांनी कल्ले व दाढी ठेवली होती असे आम्हास वाटते. महाराजांच्या अंतर्मनावर झोत टाकणारे ‘ रायगडाला जाग येते ’ अनेक वेळा पाहूनही राजांनी दाढी का राखली हे कुणाला कळू शकत नाही. या बाबतीत आमचा तर्कच बरोबर आहे. कॉंग्रेसच्या नेत्यांतून ‘ दाढीवाले ’ संपले आहेत. तरी देखील ६०–७० टक्के मुसलमान कॉंग्रेसला मते देतात. जर ना. यशवंतरावांनी एक फूट, वसंतरावांनी पाऊण फूट, बाळासाहेब देसाईंनी अर्धा फूट अशी दाढी राखली तर ही मंडळी शिवाजीमहाराजांच्या अधिक जवळ जातीलच, परंतु मुसलमानांच्याही अधिक जवळ जातील. हा तर प्रत्यक्ष आबासाहेबांचा आदर्श होय ! तेव्हा देशात कुणी ओळखू म्हणून येऊ नये यासाठी सर्वांनी प्रथम सर्व जाती-पातीतली नावे पोरांना ठेवावी; नंतर दाढ्या वाढवाव्या, लुंग्या नेसाव्या. स्त्रियांनी पारशी पद्धतीची पोलकी घालावी, गोषे पाळावे, मुसलमानांना शेंड्या ठेवण्यास भाग पाडावे, पारश्यांना गांधी टोप्या घालायला लावाव्यात आणि ख्रिश्चनबंधूंनी मुंजी लावाव्या ! शेवटी कशात काही नाही हे तरी सिद्ध होईलच.

प्राध्यापकांनी आपल्या लग्नपत्रिकेच्या निमित्ताने कुटुंब-नियोजनालाही हात घातला आहे. ते लिहितात –

“ एखाद्या दांपत्याला तीन मुली झाल्या तरी चौथा पुत्र व्हावा, अशी रुखरुख लागते. तितकी रुखरुख दोन मुलगे झाले असता नसते. ही चुकीची समजूत वंशाचे आडनाव लिहिणे बंद पडल्यास हळूहळू नाहीशी होईल. ”

ही रुखरुख– “ दोनच मुले पुरेत ” या घोषणेत हळूहळू विलीन होईलच. परंतु मुलगा व्हावा यासाठी लोकांची धडपड चालते ती बंद पाडायची असेल तर खात्रीचा उपाय आम्ही सांगतो. हा उपाय म्हणजे लग्न झाल्यानंतर हल्ली मुलगी मुलाकडे जाते ही प्रथा बंद करून मुलाने मुलीकडे जायची पद्धत सुरू केली, तर मुलगी झाल्यामुळे वाईट वाटणार नाही; कारण मुलापेक्षा जावई जास्त करतो, असा तूर्त अनुभव आहे. ही सुधारणा झाल्यास दोन मुली झाल्या तर आनंदाला पारावार राहणार नाही व मुलगा जेमतेम S. S. C. होताच बाप त्यांना स्थळे शोधू लागतील! कारण, मुलगा झाला किंवा मुलगी झाली यात माणसाचा वंशच पुढे जात असला तरी तो पुढे नेताना मुलगी जोडे फाडायला लावते व मुलगा ते आपोआप घरबसल्या करतो, एवढाच काय तो फरक आहे.

लग्नाच्या निमित्ताने प्राध्यापकांनी देशातील जातीयता व समाजातील मुलींचे स्थान या महत्त्वाच्या विषयाला हात घातला याबद्दल त्यांचे आभारी आहोत. या विषयांना हात घालण्यासाठीच केवळ त्यांनी आपला हात दुसऱ्याच्या हातात देण्याचा विचार केला असावा !

आमची मनापासून प्रतिक्रिया एवढीच– नांदा सौख्यभरे !

## फॅमिली प्लॅनिंग !

केंद्रीय मंत्री के. के. शहा यांना नभोवाणीवरून उठवून फॅमिली प्लॅनिंगवर नेल्यामुळे काय झाले पाहा ! श्री. शहा यांनी फॅमिली प्लॅनिंग नावाखाली ठिकठिकाणी जे लाखो रुपये केंद्रीय मंत्री चंद्रशेखर महाराजांनी उधळले आहेत त्याची जातीने चौकशी सुरू केली. सांबरकाठा जिल्ह्यात नुकतेच ते या कामासाठी गेले होते. त्या ठिकाणी ३००० कुटुंबनियोजन शस्त्रक्रियांसाठी अफाट खर्च केलेला त्यांना आढळला. या ३००० पैकी फक्त एक शस्त्रक्रिया ही कुटुंबनियोजनाचा हेतू समजावून घेऊन त्या इसमाने करून घेतलेली होती....आणि बाकीच्या ? फसवून आणलेल्या, पैशासाठी लाचार झालेल्या अशा पकडून आणलेल्या लोकांवर ग्रामसेवकांनी आग्रहाने केलेल्या होत्या. चौथ्या योजनेत ३०० कोटी रुपये या कामासाठी खर्च करायचे असल्याने व लोकसभेत मला उत्तरे द्यावी लागत असल्याने मी हे सर्व लक्षपूर्वक पाहणार आहे, असे के. के. शहा म्हणाले ! श्री. शहा यांनी इतकी बारकाईने खात्याची चौकशी करण्याचे धोरण पत्करणे हे फार धोकादायक आहे, असे आम्हास वाटते. नभोवाणीच्या इंग्रजी बातम्यांच्या वेळा बदलून त्यांनी हिंदी बातम्यांना अधिक प्रतिष्ठा दिली. यामुळे दक्षिणेत इंदिरा गांधी अप्रिय होऊ लागताच त्यांना 'नभोवाणी' सोडावी लागली ! यावरून शहाणे होऊन त्यांनी इंदिरा गांधींच्या मर्जीतल्या मंत्र्यांना संभाळून घेतले तरच हे खाते तरी त्यांच्याकडे राहील. इंदिराजींचे मंत्रिमंडळातील 'फॅमिली प्लॅनिंग' हे महत्त्वाचे होय ! के. के. शहांनी चंद्रशेखरांना दुखवणे बरे नाही. चंद्रशेखर शाळेपासून मुलांना फॅमिली प्लॅनिंग शिकवावे असे परवा एका भाषणात म्हणाले. शहासाहेब, चंद्रशेखरला माँटेसरीपासून पोरांना फॅमिली प्लॅनिंग शिकवायचे असले तरी शिकवू द्या ! नवे नवे फुगे किंवा लिमलेटच्या गोळयांतून 'लूप' शोधणे असे नवे खेळ माँटेसरीतील पोरांना खेळू द्या...तुमचे काय जाते. ३०० कोटी खर्च तर झाले पाहिजेत !

—ग्यानबा



# प्रा. हर्बर्ट मार्क्यूज

भालचंद्र शंकर भणगे

पश्चिमेकडील देशात विद्यार्थ्यांच्या ज्या विध्वंसक चळवळी उफाळल्या आहेत त्यांमागे हर्बर्ट मार्क्यूजचे तत्त्वज्ञान आहे, असे काही वेळा म्हणण्यात येते. त्याचे तत्त्वज्ञान काय आहे याबद्दल मला जिज्ञासा होती, म्हणून त्याचे काही लिखाण मार्च, ६९ च्या 'एन्काउंटर' मासिकात त्याच्यावरील मॉरिस क्रॅन्स्टन ह्याचा दीर्घलेख पाहण्यात आला आणि मार्क्यूजच्या तत्त्वज्ञानाचा सुसूत्र असा अन्वयार्थ लागला. क्रॅन्स्टन हा स्वत: चांगला लेखक असून त्याचे मानवी हक्कांवरील ( भाषांतरित ) मराठी पुस्तक उपलब्ध आहे. त्याच्या वरील लेखनावरून पुढील मांडणी केली आहे.

मार्क्यूज ह्याचा जन्म १८९८ साली जर्मनीत ज्यू कुटुंबात झाला. तो तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी असून, रोझा लक्झेंबर्ग ह्यांच्या क्रांतिकारक चळवळीचा पुरस्कर्ता होता. तेहतीस साली जर्मनी सोडून तो जिनेव्हा येथे गेला. तेथून अमेरिकेत जाऊन कोलंबिया, हार्वर्ड, कॅलिफोर्निया वगैरे विद्यापीठात त्याने संशोधकाचे आणि प्राध्यापकाचे काम केले. तो मूळ जर्मन असल्यामुळे परस्परविरोधी दोन अपेक्षा

उद्‌भवतात. एक तर, तो हेगेलचा अभिमानी म्हणून फॅसिझमचा पुरस्कर्ता असावा. हेगेल हा फॅसिस्टवादाचा अग्रदूत होता, हा विचार मार्क्यूजला मान्य नाही. दुसरे असे की, फॅसिस्टवादात जर्मनीतील ज्यूंचा अमानुष छळ झाल्यामुळे मार्क्यूज हा जर्मन ज्यू फॅसिस्टवादाच्या विरुद्ध–म्हणजे उदारमतवादी असेल. प्रत्यक्षात त्याचे तत्त्वज्ञान उदारमतवादाविरुद्ध आहे. हिटलरशाहीतील गॅसचेंबरची त्यास आठवण दिली असताना तो म्हणतो, "त्यात काय विशेष भयानक होते ? आज प्रत्येक दिवशी ज्या समाजाचा आम्ही अनुभव घेत आहोत त्याचाच एक मासला म्हणजे हिटलरचे कॉन्सेंट्रेशन कँप." हे ऐकायला विचित्र वाटते खरे.

'इरॉस अँण्ड सिव्हिलायझेशन' (१९५५) ह्या ग्रंथात मार्क्यूजने फ्राइडच्या सिद्धांतास विरोध केला आहे. फ्राइडचा सिद्धांत असा की, माणसाच्या मूळ प्रेरणांचे दमन करून संस्कृतीची निर्मिती करावी लागते. मार्क्यूजचे उत्तर असे की, ह्यातील बरेचसे नियंत्रण अनावश्यक आहे. ते दूर करावे म्हणजे माणसाच्या प्रवृत्तींचे रूपांतर होईल, त्याची विध्वंसक शक्ती नष्ट होईल. माणूस जोपर्यंत बदलत नाही तोपर्यंत जिवाची कदर करणारा, अहिंसक, शांततापूर्ण असा समाज निर्माण होऊ शकत नाही, असे फ्राइडचे मत; तर, असा समाज निर्माण होऊ शकेल असे मार्क्यूजचे मत आहे. फ्राईड माणसाला दोष देतो; मार्क्यूज समाजपद्धतीला दोष देतो.

आजच्या समाजाचे विश्लेषण मार्क्यूजने 'वन डायमेन्शनल मॅन' (१९६४) ह्या पुस्तकात केले आहे. हे पुस्तक अमेरिकेत खूप खपले. पुढारलेल्या ह्या देशात (अमेरिका आणि रशिया दोन्ही सारखीच) नियंत्रणाचा किंवा दबावाचा उपयोग एक वर्ग दुसऱ्या वर्गावर आपली अधिसत्ता गाजविण्यासाठी करीत असतो. हे नियंत्रण अतिरिक्त होय. ह्या नियंत्रणाची जरुरी नाही. हे नियंत्रण काढले तर माणसे सुखी होतील. सुखी होतील अशा अर्थाने की, त्यांच्या लैंगिक शक्तीचा (लिबिडो) विस्तार होईल. लैंगिक शक्ती केवळ जननेंद्रियाच्या व्यवहारापुरती मर्यादित नसून ती माणसाचे सर्व व्यक्तिमत्त्व व्यापते. ही शहरी संस्कृती, ही कृत्रिमता जाऊ द्या, म्हणजे माणसे उघड्या माळावर प्रेम करू लागतील. ह्या प्रेमात मानवाची व्यापकता, उदात्तता आहे.

आधुनिक लोकशाही ही एक फसवणूक आहे. दळवळणाची साधने, विचारविनिमयाची साधने, माहिती देण्याची साधने, करमणुकीची साधने ही माणसाचे स्वातंत्र्य हिरावून घेतात. ह्या साधनांनी माणूस उत्पादनयंत्राने बाहेर ओकलेल्या वस्तूंना बेमालूम बांधला जातो. त्याचे वेगळे अस्तित्व त्याला माहीतच नसते. तो वेगळा असून शरण जातो असे नसून, त्याच्यावर कोणी दबाव आणते असे नसून, तो स्वतःच खुला झालेला असतो. तो स्वतःच खुल्या वरिष्ठ वर्गाला किंवा प्रस्थापित समाजसत्तेला बांधला जातो.

ह्या संपन्न समाजात आतून विरोध करावयास किंवा बंड करावयास कोणताच

वर्ग उरत नाही. जसा, वर सांगितल्याप्रमाणे, सामान्य माणूस उपभोक्ता म्हणून बंड करणार नाही, त्याचप्रमाणे कामगारही करणार नाही. कामगाराचीही परिस्थिती बरी असते. एकंदर सुबत्तेत त्याला थोडासा वाटा मिळालेला असतो. तो सबंध व्यवस्थेवर खूष असतो आणि स्वतःच्या परिस्थितीवरही खूष असतो. (बिचारा !) विचारवंतांचीही अवस्था तीच असते ! टीका-दृष्टी, वेगळ्या कल्पना, वेगळ्या आकांक्षा विकृती तरी ठरतात किंवा परिणामी अशक्य ठरतात. माणूस एक परिमाणी (' वन डायमेन्शनल ') ठरतो; त्याला दुसरी परिमाणे, दुसऱ्या दिशा, दुसऱ्या दृष्टी माहीत नसतात.

असा समाज हुकूमशाहीचा किंवा सर्वंकषशाहीचा (' टोटॅलिटेरिअन ') बनतो. " प्रचलित औद्योगिक समाज त्याला आधारभूत असलेल्या तंत्रपद्धतीमुळे (' टेक्नॉलॉजिकल बेस ') सर्वंकष होतो. कारण, सर्वंकषशाही म्हणजे नुसती दहशतीवर आधारित राजकीय पद्धती नसून, ती हितसंबंधी वर्गाच्या हितासाठी राबविली जाणारी, प्रत्यक्ष बळाचा उपयोग न करणारी आर्थिक पद्धतीही असते. ती तिच्याविरुद्ध विरोध निपजू देत नाही. अमुक प्रकारचे सरकार किंवा राजकीय पक्षाचा अंमल इतकेच सर्वंकषशाहीचे स्वरूप नसून, ती उत्पादनाची आणि विभाजनाची विशिष्ट पद्धतीही आहे. ह्या आर्थिक पद्धतीत अनेक पक्ष, वृत्तपत्रे आणि विरोधक शक्ती (' काउंटरव्हेलिंग पॉवर्स ') इत्यादी असू शकतात. "

ह्या तथाकथित लोकशाहीत लोकशाही प्रक्रमाच्या ' बाहेर ' असणारे लोक असतात–जातिबाह्य, परदेशी, शोषित, बेकार आणि कामास अपात्र. त्यांना समाजात जगणे असह्य होते, ते–तेवढेच लोक–बंड करून उठतील.

यापुढे मार्क्यूजने असहिष्णुतेचा आणि हिंसेचा पुरस्कार केला. ' क्रिटीक ऑफ प्युअर टॉलरन्स ' (१९६६) ह्या ग्रंथात त्याने आपली ही भूमिका मांडली आहे. हे पुस्तक अतिशय खळबळजनक आहे. मार्क्यूजच्या सर्व पुस्तकात हे अतिलोकप्रिय ठरले. एखादे प्रार्थनेचे पुस्तक असावे त्याप्रमाणे त्याला काळे कव्हर घातले आहे. ह्याआधी लिहिलेल्या ' रीझन अ‍ॅण्ड रेव्होल्यूशन ' (१९४१) ह्या पुस्तकात उदारमतवाद आणि फॅसिझम दोन्ही संलग्न आहेत असा दावा मार्क्यूजने मांडला होता. आर्थिक व्यवस्था एकोणिसाव्या शतकात स्पर्धामय असताना उदारमतवादाचा प्रभाव होता. पण पुढे मक्तेदारी निर्माण झाल्यावर फॅसिझम बरा वाटू लागला. उदारमतवादाचेच स्थित्यंतर म्हणजे फॅसिझम. दोन्ही मार्क्सवादाच्या विरुद्ध आहेत. ह्यावरून हेच सत्य दिसते, असे मार्क्यूज म्हणतो. त्याला उदारमतवादाविषयी आदर नाही हे स्पष्ट दिसते. उदारमतवादात सहिष्णुतेचा पुरस्कार केला जातो, तर मार्क्यूज असहिष्णुतेचा पुरस्कार करतो.

सहिष्णुता त्यास मान्य आहे–ध्येय म्हणून मान्य आहे. खऱ्या अर्थाने मानवी समाज निर्माण व्हायचा असेल तर, माणसांना आणि इतर प्राण्यांना पीडा होता कामा नये.

उलट त्यांचे संरक्षण झाले पाहिजे. होय, पण असा समाज अजून अस्तित्वात नाही. सहिष्णुतेचा पुरस्कार आतापर्यंतच्या समाजात अन्यायाला आधारभूत, अन्यायाचे संरक्षण ठरला. ज्या गोष्टी सहन करू नयेत त्या सहन केल्या गेल्या; आणि ज्या गोष्टी सहन कराव्यात त्या सहन केल्या गेल्या नाहीत. विरोध व्यक्त करण्याची जी साधने देण्यात आली आहेत—मतदान, वृत्तपत्रातील पत्रलेखन आणि बहिष्कार किंवा मोर्चे—त्यातही प्रचलित हिंसेला हिंसेने उत्तर द्यावयाचे नाही असे आधीच गृहीत धरलेले असते.

वादविवादापुरती सहिष्णुता ठीक आहे; पण प्रत्यक्ष व्यवहारात सहिष्णुता पाळणे म्हणजे स्वातंत्र्याच्या आणि सुखाच्या अपहाराला मान्यता देण्यासारखे आहे. सहिष्णुतेच्या तत्त्वात असे गृहीत धरले आहे की, माणसे 'रॅशनल' आहेत—सर्व गोष्टींचा खल करून, बरे-वाईट ठरवून, नंतर त्याप्रमाणे वागतात. हे गृहीतकृत्य खोटे आहे. आधी ह्या माणसांची मने इतकी भरून किंवा शिकवून ('इन्डॉक्ट्रिनेटेड') ठेवल्यासारखी आहेत की, त्यांच्या मनावर वादाचा परिणाम होऊ शकत नाही. मार्क्यूज यापुढे जाऊन असेही म्हणतो की, विरोधकांनी अगदी उलटच्या पढवणुकीचा स्वीकार करावा. सत्याचा शोध घेण्यापेक्षा, आजच्या असत्याला उलटच्या असत्याने तोंड द्यावे.

वरकरणी लोकशाहीविरोधी दिसणाऱ्या मार्गांचा अवलंब करावा लागेल. ज्यांची धोरण आक्रमक आहेत, जे युद्धखोर आहेत, जे शस्त्रास्त्रांच्या निर्मितीच्या मागे आहेत, जे वंश-धर्माप्रमाणे भेदभाव करतात, जे सरकारने जनतेस द्यावयाच्या सेवेच्या ('सामाजिक सुरक्षा') आड येतात त्यांचा भाषणस्वातंत्र्याचा आणि संघटनेचा अधिकार काढून घेतला पाहिजे. शैक्षणिक संस्थांमध्ये ज्यांच्या कल्पना आणि ज्यांच्या शिकवण्याच्या पद्धती प्रस्थापित समाजातच विद्यार्थ्यांचे मन गुंतवून ठेवतात,


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, अजूनही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच-या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

वेस्टर्न इंडिया कं. (मान) पो. कतरीसराम (गया)

त्यांच्यावर बंदी घातली पाहिजे. त्यासाठी हलकल्लोळ ('अपहीवल') उडवून दिला पाहिजे—क्रांती केली पाहिजे. ह्या क्रांतीत हिंसेचा जरूर वापर होईल. ज्याच्याशी मुकाबला करावयाचा त्याचे हिंसक सामर्थ्य मोठे असल्यामुळे विरोधकांनी हिंसा टाळणे वेगळे—ते समर्थनीय आहे. पण हिंसा म्हणून हिंसा टाळणे वेगळे—हे असमर्थनीय आहे. इतिहासात हिंसेवाचून बदल घडलेले दिसत नाहीत. हिंसेने अन्याय, क्रौर्य आणि स्तब्धता यांच्या सातत्यात अल्पकालच खंड आणला तरी, त्या अल्पावधीत स्वातंत्र्याचा आणि न्यायाचा विस्तार केलेला दिसेल.

मॉरिस क्रॅन्स्टन याने मार्क्यूजच्या ह्या विवेचनावर टीका केली आहे. ती थोडक्यात अशी :

१ : मार्क्यूजचा इतिहासाचा अभ्यास विश्वसनीय नाही. नियंत्रणावाचून समाज सुखी होतो असे म्हणताना त्याने ऐतिहासिक आधार दिला नाही. हिंसेवाचून बदल झाले नाहीत असे म्हणण्यातही इतिहासाचा अपलाप होतो.

२ : अतिरिक्त दडपशाही नको असे म्हणताना अतिरिक्त म्हणजे कोणती ते मार्क्यूजला नीट सांगता आले नाही. 'वरिष्ठ वर्गा'ची दडपशाही म्हणताना त्याची त्या वर्गाची कल्पना स्पष्ट नाही. वर्गविहीन समाजात जी दडपशाही असते तिचे काय ?

३ : बळ ('फोर्स') आणि हिंसा ('व्हॉयलन्स') ह्यात मार्क्यूजने भेद केला नाही. बळ हे नेहमीच अनावश्यक किंवा अन्याय्य असते असे नाही, हे तो विसरतो.

४ : सर्वंकषशाहीच्या प्रसारात मार्क्यूजने भिन्नता ठेविली नाही. सर्वच औद्योगिक समाज (उदा. अमेरिका आणि रशिया) तो सर्वंकष मानतो.

५ : स्वतंत्र समाजाचे मार्क्यूजचे ध्येय आहे. पण ते निर्माण करताना दहशतीचा वापर करावा असे तो मानतो. इतकेच नव्हे तर दहशतीचा अंमल ('रेन ऑफ टेरर') असावा असेही तो सांगतो. स्टॅलिनशाही त्यास मान्य नाही असे तो म्हणत असला तरी प्रत्यक्षात स्टालिनशाही तो आणू पाहतो.

६ : सद्सद्विवेक आणि सत्याचा तो उल्लेख करीत असला तरी त्याचे आवाहन भावनेला आणि झुंडवृत्तीला आहे. ■■



# "माझी पत्नी हेर आहे!"

अनंत भावे

लेखांक–दोन । । । । । । ।

"श्रीमती सँडर, हे सारं सांगताना तुम्हाला किती त्रास झाला असेल याची पूर्ण कल्पना आहे मला. पण मला आपल्याला काही प्रश्न विचारायचे आहेत. आपली काही हरकत नाही ना त्याला ?"

श्रीमती सँडरने मान हलवली.

"पहिली गोष्ट म्हणजे तुम्हा पतिपत्नींना मूल नाही. मला असं सांगा, याला काही शारीरिक कारणं आहेत काय ?"

"नाही." ती तत्परतेने म्हणाली, "मला नाही तसं वाटत. आमचं लग्न झालं तेव्हा काही वर्षं मुलांची कटकट नको होती आम्हाला. आणि मग युद्ध पेटलं तेव्हा मुलांचा विचार बाजूलाच ठेवावा लागला परिस्थितीमुळं. तीच परिस्थिती अजूनही कायम आहे, असंच म्हटलं पाहिजे."

"वरं, आता या मेजर हॉटमानविषयी ! तो मेजर इथून निघून गेल्यानंतर तुमची-त्याची भेट कधी झाली होती का ? किंवा त्याचं काही पत्र वगैरे आलं होतं का तुम्हाला ?"

श्रीमती सँडरने जोराने मान हलवली. "अजिबात नाही. काहीच कळलं नाही मला त्याच्याबद्दल." ती म्हणाली, "इथून जाताना तो म्हणाला होता की, त्याच्या आयुष्यातलं हे एक अनपेक्षित विष्कंभक होतं, आणि ते यथाकाल संपलं होतं

युद्धातून वाचण्याची त्याला आशा नव्हती. पण वाचल्यानंतरदेखील माझी भेट घेण्याचा प्रयत्न करून मला संकटात टाकणार नाही, असं अभिवचन दिलं होतं त्यानं. तो जर अजून जिवंत असेल तर त्यानं आपलं वचन पाळलं आहे असंच म्हटलं पाहिजे."

" आता मला सांगा, या मेजर हॉटमानच्या तुमच्याबद्दलच्या भावना कशा प्रकारच्या असाव्यात, असं वाटतं तुम्हाला ?

ती थोडी अवघडली, पण नंतर मोकळेपणाने म्हणाली, " मला वाटतं त्याचं माझ्यावर खरोखरच प्रेम असावं."

माझा पुढील प्रश्न सर्वाधिक महत्त्वाचा होता. म्हणून तो विचारण्यापूर्वी मी एक क्षणभर थांबलो. मग तो प्रश्न विचारला, " आणि तुमच्या त्याच्याविषयीच्या भावना ? त्या कशा प्रकारच्या होत्या ?"

## देशद्रोही कबुली (?)

आता श्रीमती सँडरला क्षणभर थांबावे लागले. तिने आपली मान हलवली. खांदे उडवले. जणू तिला या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी योग्य शब्द सापडत नव्हते. अखेर ती म्हणाली, " माझं मलाच कळत नाही नीटसं. तुम्हालादेखील ते कळेल असं वाटत नाही मला. मला वाटतं माझंदेखील प्रेम असावं त्याच्यावर... मला ठाऊक आहे, हे सारं अक्षम्य वाटेल कोणालाही. मला सक्तीनं शय्यासोबत करायला लावणाऱ्या मेजर हॉटमानचा तिरस्कार वाटायला पाहिजे होता मला. घृणा यायला पाहिजे होती. कारण, एक तर तो शत्रुपक्षाचा होता, आणि दुसरं म्हणजे मला पतीशी प्रतारणा करायला भाग पाडलं होतं त्यानं. पण प्रामाणिकपणं सांगायचं तर तो खरोखरच परोपकारी आणि दुसऱ्याची कदर करणारा असामी होता; आणि मी एकाकी होते. शिवाय त्याचं माझ्यावर खरंखरं प्रेम होतं. आणि मला सुखच होतं त्यात."

त्याच क्षणी माझी खात्री पटली की, नीतिमार्तंडांच्या दृष्टीने श्रीमती सँडरचे वागणे गर्हणीय असले किंवा नसले तरी सुरक्षिततेच्या दृष्टीने ती सर्वस्वी निरपराध होती. तिची सारी कहाणी बनावट असती, तिने त्या जर्मन अधिकाऱ्याला आपल्या मोहात जाणीवपूर्वक पाडले असते आणि नवऱ्याच्या अटकेकडे सोयीस्कररीत्या दुर्लक्ष केले असते, किंवा जर ती हॉलंडशी बेइमान झालेली असती तर नक्कीच तिने आपण त्या दुष्ट मेजर हॉटमानचा द्वेष करतो आणि केवळ पतीसाठी त्याच्या प्रेमचेष्टा आपण सहन केल्या, असे माझी दिशाभूल व्हावी म्हणून सांगितले असते! आपल्याला त्या शत्रुपक्षाच्या मेजरबद्दल हळूहळू जिव्हाळा वाटू लागला, अशी वरचेवर पाहता सरळसरळ देशद्रोही कबुली देण्याच्या तिच्या प्रामाणिकपणामुळे मला तिच्या निरपराधीपणाबद्दल संशय उरला नव्हता.

तरीदेखील मी प्रश्न विचारणे चालूच ठेवले. " श्रीमती सँडर, मला सांगा,

तुमच्या आणि मेजर हॉटमानच्या संबंधांचा तुमच्या नवऱ्यानं कधी उल्लेख केला आहे काय ? त्याला तुमचा काही संशय आला आहे काय ? कारण हे गाव तसं लहानच आहे. शिवाय अफवा कशा पसरतात याची कल्पना असेलच तुम्हांला. त्यामुळं कोणीतरी सँडरच्या कानांवर घातलंच असेल हे प्रकरण, नाही का ?"

" त्याला संशय आला असेल कदाचित्," श्रीमती सँडर उत्तरादाखल म्हणाली, " पण त्यानं उघड मला कधीच विचारलं नाही त्याबद्दल. तो नसताना इथं काय घडलं याबद्दल मुळी बोललाच नाही तो कधी. जणू काही त्या काळात तो एकटाच जगत होता आणि आमचं जगणं थांबलं होतं; तो आल्यावरच पुन्हा थांबल्या ठिकाणी ते सुरू झालं ! "

" ठीक आहे. तुम्ही थोड्या वेळापूर्वी म्हणालात, की परत आल्यानंतर सँडरचं लक्षच आपल्या कामावरून उडालं. कसंही असलं तरी या दिवसांत छपाईच्या धंद्याला तेजी आहे, असं काही म्हणता यायचं नाही. मग तुमचं भागतं कसं म्हणतो मी ? युद्ध सुरू होण्यापूर्वी जर तुम्ही चांगले श्रीमंत नसाल तर एव्हाना पुंजी संपूनही गेली असेल तुमची."

" गावातल्या साऱ्या लोकांचे उपकार आहेत आमच्यावर त्या बाबतीत." श्रीमती सँडर म्हणाली, " सँडरच्या युद्धकाळातल्या कामगिरीबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी स्वतः महापौरांनी पुढाकार घेऊन एक निधी उभा केला होता. आणि ज्यांना शक्य होतं त्यांनी अगदी सढळ हातानं निधीला देणग्या दिल्या."... मग किंचित अडखळत ती म्हणाली, " मला मात्र त्यांचे पैसे घेताना काही प्रशस्त वाटलं नाही."

" का ?"

" तुमच्या मनात असलेल्या कारणाकरिता नव्हे; अगदी वेगळ्या कारणासाठी ! ज्या दिवशी सँडर परत आला त्या दिवशी त्याची अवस्था कठीणच होती. त्याचे सारे कपडे काढून एखाद्या लहान बाळासारखा झोपवावा लागला त्याला. आणि कपडे काढले तेव्हा त्याच्या कमरेला नोटांची बंडलंच्या बंडलं बांधलेली होती. मी काही नीट मोजल्या नाहीत त्या नोटा. पण काही हजारांच्या निश्चितच असतील त्या."

" त्या कशा मिळाल्या हे सांगितलं का त्यानं तुम्हांला ?"

" होय तर. अगदी मोकळेपणानं सांगितलं. त्याची तब्येत सुधारली तेव्हा विचारलं मी त्याला त्याबद्दल. तो म्हणे कँपमधून पळून गेल्यावर एके ठिकाणी खंदकात लपून राहिला होता. जवळूनच मालवाहू मोटारींचा एक तांडा चालला होता. अचानक ब्रिटिश शाहीदलाचं एक विमान तिथं आलं आणि त्यानं त्या तांड्यावर मशिनगनचा जोरदार मारा केला. सँडर लपला होता त्या जागेपासून जवळच एक मोटार अकस्मात ज्वाळांनी पेटली. तिच्यात असलेले दोन जर्मन सैनिक जीव घेऊन पळून गेले. त्या सगळ्या गडबडीत सँडर त्या मोटारीत चढला आणि तिच्यातून

दोन-तीन मोठ्या पेट्या त्यानं बाहेर काढल्या. त्यांत काही खाद्यपदार्थ मिळतील अशी आशा होती त्याला. पण पेट्या फोडून पाहतो तो त्या नोटांनी ठिच्च भरलेल्या होत्या ! बहुधा त्या विभागातल्या जर्मन तुकड्यांचा पगार वाहून नेणारी मोटार असावी ती. युद्धात विलक्षण चंचल असलेलं दैव सँडरवर अचानक प्रसन्न झालं होतं. घेता येतील तितक्या नोटा त्यानं छपवून घेतल्या."

"त्यात त्याचं काही चुकलं असं वाटत नाही मला. कोणीच त्याला याबद्दल दोष देऊ शकणार नाही." मी म्हटले. "अहो, एखादा कैदी जर कॉन्सेंट्रेशन कँप-मधून पळाला तर जर्मनांनी त्याच्या राहण्याजेवण्याचा भत्ता नको का द्यायला त्याला ?"

त्याच वेळी दिवाणखान्यालगत असलेल्या जिन्यावर पावले वाजली. श्रीमती सँडर उद्गारली, "बापरे, मि. सँडर परत आलेले दिसतात. तुम्ही इथं का आलात त्याचं काही पटणारं कारण आठवून ठेवा पटकन. त्यांना संशय येऊन चालणार नाही."

"ते पाहून घेतो मी." मी मध्येच म्हटले, "आपण काही काळजी करू नका."

दरवाजा उघडला आणि सँडर आत आला. मध्यम उंची, सडपातळ पण काटक. पिंगट केस. चमकदार निळेभोर डोळे. गणवेषधारी सैनिकी अधिकाऱ्याला तेथे पाहून तो थोडा चमकला. त्याला बोलण्याची संधी न देता मी उठलो आणि त्याच्याशी हस्तांदोलन करण्यासाठी हात पुढे ओढवून म्हणालो, "मीच माझी ओळख करून देऊ का ? माझं नाव पिंटो. कर्नल पिंटो. आणि इथल्या डच प्रतिहेरखात्यात (डच काऊंटर–इंटेलिजन्स मिशन) काम करतो मी. त्या संदर्भात काही जुजबी चौकशी करायला आलो होतो मी इथं. श्रीमती सँडरनी कॉफी दिली ती घेत बसलो होतो."

"कसली माहिती पाहिजे तुम्हांला?" सँडरने चटकन विचारले.

"बर्लिनजवळ असलेल्या हेरखात्याकडून आलेल्या सूचनांबरहुकूम काम करतो आहे मी." मी खुलासा केला, "असं दिसतं की त्यांनी जर्मन गुप्तहेरखात्याच्या बऱ्याच वरिष्ठ अधिकाऱ्यांना अटक केली आहे. नंतर युद्ध-गुन्हेगार म्हणून खटले भरण्यात येणार आहेत त्यांच्यावर. त्यातले दोघे त्याच विभागात होते. याच घरात राहत होते. इथं असताना त्यांची वर्तणूक कशी होती, त्यांनी काही जुलूम-जबरदस्ती, काही बेकायदा कृत्यं केली काय, त्याची चौकशी करून गुप्तहेरखात्याला माहिती कळवायची आहे मला."

"नावं काय आहेत या अधिकाऱ्यांची ?" सँडरने विचारले.

माझ्याजवळची वही नावांसाठी चाळण्याचा अभिनय करत, नावे सापडल्यासारखी दाखवून मी म्हटले, "एकाचं नाव होतं फॉन बुशवॉल्ड आणि दुसऱ्याचं हॉटमान–मेजर हॉटमान."

हॉटमानचे नाव एकताच नकळत सँडरच्या चेहऱ्याचे स्नायू तणावले आणि डोळे

आकुंचन पावले. बाकी फारशी चलबिचल त्याच्या ठिकाणी मला दिसली नाही. सँडर मला म्हणाला, "फॉन बुशवॉल्ड–हे नाव माहीत नाही मला. पण गेल्या चार वर्षांत इथं कितीतरी जर्मन अधिकारी राहून गेले असतील. त्यातले काही तर काही आठवडयांपुरते वा दिवसांपुरते होते. त्यामुळं सगळयांची नावं लक्षात राहणं मुष्कीलच आहे. फॉन बुशवॉल्ड आठवत नाही मला, पण हॉटमानची गोष्ट वेगळी आहे. आम्ही दोघंही हॉटमानला चांगले ओळखतो. नाही का गऽ ?" सँडर आपल्या पत्नीकडे वळून म्हणाला.


या शेवटच्या वाक्यात छद्म आहे की काय, अशी शंका मला आली. मी म्हणालो, "होय. आत्ताच श्रीमती सँडर सांगत होत्या मला. जर्मन फौजांनी काढता पाय घेतला त्याच्या आधी काही महिने हा मेजर हॉटमान इथं होता म्हणे. तुम्हाला त्याच्या येथल्या वर्तणुकीबद्दल काही तक्रार वा आरोप अधिकृतरीत्या करायचा आहे काय ?"

"पण म्हणजे त्याच्या खटल्याच्या वेळी मला साक्षीबिक्षीला बोलवण्यात येईल की काय ? तसं असेल तर–"

मी खांदे उडवले. म्हणालो, "शक्य आहे. तुम्हाला प्रवास करणं अशक्यच आहे असं सिद्ध झालं तर न्यायासन शपथपत्रकदेखील मानतं तुमचं. पण देहान्ताची शिक्षा असलेल्या खटल्याच्या बाबतीत, शक्य असेल तर साक्षीदार स्वतः हजर असावा, अशी न्यायासनाची अपेक्षा असते."

आता सँडरने खांदे उडवले. तो म्हणाला, "ठीक आहे. पण जर्मनांचा कितीही तिरस्कार करत असलो मी तरी, प्रामाणिकपणं सांगायचं तर, मेजर हॉटमानविरुद्ध कसलीच तक्रार नाही माझी. त्याच्या वर्तणुकीत मला तरी आक्षेपार्ह काही दिसलं नाही. हे लक्षात घ्या तुम्ही की, माझ्या अटकेला खुद्द हा मेजर हॉटमानच जबाबदार होता. त्या बाबतीत त्यानं आपलं कर्तव्य केलं असं म्हणू शकेल तो–आणि आपण-देखील. त्यांच्या दृष्टीनं मी जर्मन साम्राज्याचा गुन्हेगार होतो. आणि मला 'हे' भोगावं लागलं ही काही हॉटमानची चूक म्हणता येणार नाही," असे म्हणून त्याने त्याचा डावा हात उघडा करून माझ्यापुढे ठेवला. त्याच्यावर भाजल्याच्या दोन-तीन गोल खुणा होत्या. तो पुढे म्हणाला, "मला अटक केल्यानंतर त्याची वर्तणूक कशी होती हे अर्थातच मी सांगू शकत नाही. तोपर्यंत तरी युद्ध-गुन्हेगार म्हणून त्याचा विचारच करता येणार नाही."

पुन्हा एकदा, त्याच्या बोलण्यात काही छद्म असल्याचा संशय मला आला. एका परीने या प्रसंगाने त्याची करमणूक होत असावी. पण श्रीमती सँडर मात्र धीराने म्हणाल्या, "मेजर हॉटमानची वर्तणूक नेहमीच चांगली होती. अगदी सँडरना अटक झाल्यानंतरसुद्धा त्या शेवटच्या महिन्यात जर्मनांचा पराभवच होत होता सगळीकडे. बेअदबी करायला वेळच कुठं होता त्यांना."



**मी . . . अर्न्स्ट सँडर, मुक्काम अमुक अमुक, जाहीर करतो की. . .**

आता संभाषण थांबवण्याचा निर्णय मी घेतला. मी म्हटले, "ठीक आहे. श्रीमती सँडर, आपल्या पाहुणचाराबद्दल आभारी आहे मी आपला. पण मला कार्यालयात गेलं पाहिजे आता." मग सँडरकडे वळून मी म्हटले, "आपण असं करू शकाल का मि. सँडर? माझ्या कार्यालयात येऊन आपण एक अधिकृत निवेदन सादर करू शकलात तर आभारी होईन मी आपला. म्हणजे हेच निवेदन गुप्तहेरकार्यालयाला पाठवून देईन मी. आणि निवेदन जुजबी असलं तरी आम्हाला ते वरिष्ठांकडे पाठवावंच लागतं ना. मग? आज दुपारी येऊ शकाल तुम्ही? टाऊनहॉलच्या शेजारीच कार्यालय आहे माझं. बाहेर पाटी आहे नावाची."

"बापरे. मला तर वाटलं होतं की युद्ध संपून गेलंय म्हणून!" सँडर उपहासाने म्हणाला, "पण ते काही खरं नाही दिसत. म्हणजे गणवेषाचा रंग बदलला तरी सैनिकी फर्मान लागू आहे आम्हाला. नाही का?"

बळेच हसून मी म्हटले, "हे फर्मान नाही; सूचना आहे. हे जे दोन्ही संबंधित अधिकारी तुमच्या घरात तळ ठोकून होते, ते दोषी वा निर्दोषी आहेत हे रीतसर न्यायासनासमोर सिद्ध व्हायला पाहिजे, असं नाही का तुम्हाला वाटत?"

" हां. आता असं जर तुमचं म्हणणं असेल तर मला नकार नाही देता येणार. शिवाय मला दुसरं काहीच काम नाही आहे. छपाईची शाईच नसेल तर छापखाना कसा चालणार ? जर्मनांनी निदान माझा छापखाना चालू ठेवला होता. एवढी एक गोष्ट तरी त्यांच्या बाजूची ठरायला हरकत नाही. "

" ठीक आहे. आपण या दुपारी. मी वाट पाहतो आपली. " मी म्हटले आणि सँडर दांपत्याचा निरोप घेतला.

भोजनाच्या सुटीत भोजन करून मी कॉफी आणि सिगारेट पीत विचार करत होतो. माझ्या डोक्यात एक कल्पना साकार होत होती. तिचा जो जो मी विचार करत होतो तो तो ती मला आवडेनाशी होत होती. माझ्या या प्रतिहेरखात्याच्या कामात कधी कधी माणसाच्या नीच प्रवृत्तीचे भयंकर नमुने पाहायला मिळतात. सँडरचे प्रकरण त्यातलेच एक ठरेल, असे मला वाटत होते. त्यामुळे एखाद्या झाडूवाल्याबरोबर तात्पुरती भूमिकांची अदलाबदल करायला मी तयार होतो. परंतु न्यायाची अंमलबजावणी होणे आवश्यक होते. मी हाताखालच्या अधिकाऱ्याला बोलावून घेतले. दोस्तांच्या फौजांनी हॉलंड जर्मनांच्या ताब्यातून मुक्त केल्यावर जर्मनांच्या कागदपत्रांचा मला मोठा साठा दोस्तांच्या हाती पडला होता. तो नंतर त्यांनी आमच्या खात्याच्या हवाली केला होता. तो अजून शाबूत आहे काय, अशी विचारणा त्या अधिकाऱ्यापाशी मी केली. त्याने होकारार्थी उत्तर दिल्यावर त्यातून, जर्मनी सैनिकी शिक्कामोर्तब धारण करणारी एखादी सरकारी नोंदवही आणायला मी त्याला सांगितले. काही मिनिटांतच त्याने मला हवी होती तशी वही आणली. वही कातडी बांधणीची होती, आणि तिच्यावर गरुड आणि स्वस्तिकचा सोनेरी ठसा होता.

आता सारी सिद्धता होऊन मी सँडरची वाट पाहत बसलो. अखेर बऱ्याच उशिरा, जवळजवळ चार वाजता, तो आला. मी त्याला बसायला सांगितले. सकाळपेक्षा त्याची मनःस्थिती पुष्कळच निवळली होती. पण तरीही तो सावध झाला आहे, अशी जाणीव मला झाली.

" आपण लगेच तुमच्या निवेदनाकडंच वळू. " मी बोलायला सुरुवात केली, " असल्या निवेदनांच्या बाबतीत माझा अनुभव तुमच्यापेक्षा जास्त असेल नाही ? तेव्हा तुमची हरकत नसेल तर मी मोठ्यानं मजकूर सांगतो आणि तुम्ही लिहून काढा तो. जिथं चूक होईल माझी तिथं मला थांबवून दुरुस्त करा म्हणजे झालं. कसं ?"

" आपण म्हणाल तसं करू. " सँडर म्हणाला. त्याच्या स्वरात दिसणारा वैताग त्याच्या चेहऱ्यावर मात्र तितक्या प्रमाणात दिसत नव्हता.

" ठीक आहे. लगेच सुरू करू या आपण. हं. .." ' मी '...काय म्हणालात नाव तुमचं ? – ' अर्न्स्ट ' नाही का ?...ठीक. पुन्हा करू या सुरुवात. ' मी–अर्न्स्ट

सँडर, मुक्काम–'–इथं तुमचा पूर्ण पत्ता लिहायचा. मागाहून लिहिता येईल तो–हां. ' मी–अर्न्स्ट सँडर, मुक्काम अमुक अमुक, जाहीर करतो की आज, दिनांक १४ जून, १९४५ रोजी मी करीत असलेलं हे निवेदन पूर्णतया ऐच्छिक असून मी आपण होऊन करत आहे "...मी इथे थांबलो आणि पुढे झुकून सँडरला म्हणालो, "ही अशीच सुरुवात करावी लागते. कारण मग प्रतिपक्षाला, हे निवेदन बळजबरीनं घेतलं आहे, असा आक्षेप घेता येत नाही. ठीक आहे. पुढं जाऊ आपण...लिहा... " जर्मनांनी हॉलंड पादाक्रांत केल्यावर थोड्याच दिवसांनी त्यांनी माझं राहतं घर ताब्यात घेतलं. त्यातल्या एका भागात एका वरिष्ठ जर्मन अधिकाऱ्यांच्या निवासाची व्यवस्था करण्यात आली. तेव्हापासून गत वर्षाच्या शेवटी मला अटक होईपर्यंत एकामागून एक बरेच अधिकारी या निवासस्थानात राहून गेले. माझ्या समजुतीप्रमाणे न्यायासनाला त्यातील दोन अधिकारी–कर्नल फॉन बुशवॉल्ड आणि मेजर हॉटमान–यांच्याबद्दल अधिक माहिती हवी आहे. पहिल्या अधिकाऱ्याचे नावही मला आठवत नाही; पण माझ्या अनुभवाधारे मी एवढे निश्चित म्हणू शकेन की माझ्या निवासस्थानी वास्तव्य करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याने कधीही माझ्याशी वा माझ्या पत्नीशी असभ्यपणाचे वर्तन केले नाही.

' मला अटक झाली तेव्हा माझ्या जागेत राहत असलेला जर्मन अधिकारी म्हणजे मेजर हॉटमान. त्याची वर्तणूक वरिष्ठ अधिकाऱ्याला आणि सभ्य गृहस्थाला साजेशीच होती. त्याच्याबद्दल मी पुढे असे प्रकट निवेदन करू इच्छितो की, त्याच्या परोपकारी आणि स्नेहशील स्वभावामुळे माझे मन वळून मी जर्मनांच्या बाजूने काम करू लागलो. ...... पुढं आपण ' अजून करत आहे ' असं म्हणायचं का मि. सँडर ? ... डच भूमिगत चळवळीबद्दलची विविध प्रकारची गुप्त माहिती मी त्याला दिली, आणि या देशद्रोही कामगिरीबद्दल मला भरपूर मोबदला मिळाला. मला झालेली अटक हे एक व्यवस्थित वठवलेले नाटकच होते ! मी... '

सँडर ताडकन उठून उभा राहिला. म्हणाला, " हे भलतंच काय सांगताहा तुम्ही ? मला सापळ्यात अडकवण्याचा प्रयत्न चाललेला दिसतो आहे तुमचा. तसं असेल तर या निवेदनावर सहीच करणार नाही मी. "

" सही नका हो करू तुम्ही. पण हे सारं खरं आहे हे तर कबूल कराल की नाही ? भूमिगत चळवळीतले कार्यकर्ते काय तुम्ही ? मी सांगू तुम्ही कोण आहात ते ? स्वतःला विकणारे फडतूस देशद्रोही आहात तुम्ही. "

सँडरचे निळे डोळे रागाने जळू लागले. " कोणी सांगितलं हे सारं तुम्हाला ? ठाऊक माहे मला. माझ्या बायकोनं...त्या कुतरडीनंच सांगितलं असलं पाहिजे हे. "

" खाली बसा " मी शांतपणे म्हटले, " छे छे––तुमच्या बायकोनं––श्रीमती सँडरनं––नाही मला सांगितलं हे. ती बिचारी तुमच्यासारख्या बुद्रूक, नालायक पतीशीसुद्धा एकनिष्ठच आहे. दोन गोष्टींनी घात केला तुमचा मि. सँडर...एक ही नोंदवही

आणि दुसरे स्वतः तुम्ही !" मी त्या नोंदवहीवर अर्थपूर्ण रीतीने हात ठेवला. सँडरसमोर ती उघडण्याचे धाडस करणे शक्य नव्हते मला. मी पुढे म्हणालो, "ही गोष्ट, मला वाटतं, तुमच्या कधीच लक्षात आली नाही. मेजर हॉटमानच्या स्वभावात चमत्कारिक विरोध होता. तो व्यवस्थितही होता आणि निष्काळजीसुद्धा होता. तुम्हाला मोबदल्यादाखल वेळोवेळी दिलेल्या साऱ्या रकमांची नोंद करून ठेवण्याइतका तो व्यवस्थित होता; आणि ती नोंदवही जाताना नष्ट न करता मागे ठेवण्याइतका निष्काळजीसुद्धा होता. अर्थात आम्हांला या लेखी पुराव्याची तशी गरज नव्हती म्हणा. कारण, तुमच्या निवेदनानंच रहस्यभेद केला होता तुमचा."

"म्हणजे ?"

## हातावरचे कृत्रिम डाग

"सारं सांगतो. ऐका. छापखान्यात तुमच्याभोवती जर्मन पहारेकऱ्यांचा सतत गराडा असे. अटक झाली तेव्हाही अर्थातच तो होता. पण तरीही तुम्हाला वर जाऊन आपल्या पत्नीचा हार्दिक निरोप घेण्याची संधी मिळाली, हे नवल नव्हे काय ? गेस्टॅपो काही अशी पूर्वसूचना देत नाहीत अटकेची. ते एकदम झडप घालतात. छापखान्यातल्या पहारेकऱ्यांना सूचना मिळाली असती की त्यांनी अशा तत्परतेनं पकडलं असतं तुम्हांला की नाक शिकरायला संधी मिळाली नसती राव. पण ते कसं होणार ? कारण मेजर हॉटमानच्या संगनमतानं अटकेचा दिवस आधीच निश्चित केला होता तुम्ही. खरं की नाही ? कारण परिस्थिती असह्य होऊ लागली होती तुम्हाला. आणि जर्मनांना सतत कळणाऱ्या आपल्या चळवळीच्या बित्तंबातमीचा उगम भूमिगत कार्यकर्त्यांना कळणं अपरिहार्यच होतं ! काय ? आणि शिवाय तुमच्या हातावरचे ते कृत्रिम डाग !"

"कृत्रिम ?"

"मग काय तर ? सिगारेट वा चिरूटाने पाडलेली क्षतं तुम्ही पाहिलेली दिसत नाहीत कधी. तिथली कातडी आकुंचन पावते. शिवाय कातडी इतकी गुळगुळीतदेखील राहत नाही. तिच्यावर सुरकुत्या पडतात म्हटलं. गेस्टॅपोच्या कोण्या हस्तकानं सौम्य अॅसिडमधे बुडवून एखादं नाणं बारीक चिमटचानं काही सेकंद हातावर दाबून धरलं असणार तुमच्या. त्यामुळं तर या जखमांचे डाग असे व्यवस्थित दिसतात आणि कातडी गुळगुळीत दिसते. काय ? मी म्हणतो तसाच सारा मामला होता ना मि. सँडर ?"

"शिवाय कमरेला बांधलेल्या नोटांची ती बावळट कहाणी होतीच मला मदत करायला. त्या वेळी तुम्ही जर्मनीत होता. आठवतं ? नुकतेच जर्मनांच्या कैदेतून पळाला होता तुम्ही किंवा निदान मी तसं मानावं असं वाटतं आहे तुम्हांला. पण जिच्यावर, तुमच्या सांगण्याप्रमाणं, ब्रिटिश विमानाचा हल्ला झाला त्या जर्मन सैन्याचा पगार वाहणाऱ्या मोटारीत डच नोटांनी भरलेल्या पेटचा कुठून आल्या ?

जर्मन सैन्याचा पगार आणि डच नोटांचा संबंध काय? कारण त्या वेळपर्यंत तर जर्मन सैन्याने केव्हाच हॉलंडमधून काढता पाय घेतला होता. ज्या जर्मन फौजेचा पगार ती कल्पित मोटार वाहून नेत होती तिला पगार डच चलनात मिळाल्यानंतर काहीच विशेष वाटल नसतं, नाही का? याचा उघड अर्थ एकच आहे आणि तो हा की, त्या नोटा म्हणजे तुमच्या जर्मन मालकांनी तुम्ही केलेल्या कामगिरीबद्दल दिलेला मोबदला होय. कसं?"

सँडर कडवट हसला. म्हणाला, "आपण म्हणता ते कदाचित खरंही असेल. पण म्हणून ते सिद्ध करता येईल काय आपल्याला? माझ्यासारख्या सुप्रसिद्ध भूमिगत कार्यकर्त्याविरुद्ध असला बिनबुडाचा आरोप कसा टिकेल? तुमच्या म्हणण्यावर कोण कसा विश्वास ठेवील? तुमच्याजवळ पुरावाच नाही कसला."

"मग हॉटमानच्या या नोंदवहीला काय म्हणणार तुम्ही? हा पुरावा नाही तर काय? चांगला अस्सल पुरावा आहे हा." मी वहीवर बोटे आपटीत म्हटले.

"तो खोटा आहे, असं शपथपूर्वक सांगून मोकळा होईन मी. हॉटमाननं मला फितवण्याचा प्रयत्न केला आणि मी नकार दिल्यावर सूडबुद्धीनं ही नोंदवही तयार करून त्यात मोबदल्याचा हा स्फोटक मसाला त्यानं भरला, असं सांगता येईल मला."

"पण आम्ही खुद्द हॉटमानलाच साक्षीसाठी उभा केला म्हणजे मग?"

"हॉटमान एक तर मेलेला असेल किंवा दडी मारून बसला असेल. आणि एक वेळ समजा तो साक्षीसाठी उभा राहिला; त्याने तुम्ही म्हणता तशी साक्ष दिली; तरी लोक त्या गनिमावर विश्वास ठेवतील, का माझ्यासारख्या देशसेवकावर? तुम्हीच सांगा?"

## पण पुरावा कोठे आहे?

"तुमच्याजवळ सारी उत्तरं आणि स्पष्टीकरणं अगदी तयार दिसताहेत. पण तरीही मी म्हणतो तेच खरं आहे ना?"

"मी मघाशीच म्हटलं ते. तुमचं म्हणणं असेल खरं. पण पुरावा?"

"मग हा पाहा तुम्हाला हवा होता तसला पुरावा. त्या बाकावर असलेली फुलकुंडी दिसते तुम्हांला? बघा त्यातल्या रोपट्याची डहाळी कशी वाकली आहे ती. ती वाकणारच. कारण तिला ध्वनिक्षेपक बांधलेला आहे."

सँडर माझ्यावर झडप घालणार असे वाटले म्हणून मी तत्काळ पिस्तुल काढून त्याच्यावर रोखीत म्हटले, "सँडर, पुढं येऊ नका. पुढं आलात तर देहान्ताची संभाव्य शिक्षा आत्ताच अमलात आणावी लागेल मला."

परंतु सँडर फासावर चढला नाही. मी त्याच्याकडून कबुलीजबाब घेऊ शकलो नाही आणि निर्देशित पुरावा (recorded evidence) स्वीकारायला न्यायाधीश तयार नव्हते. सँडरच्या अपेक्षेप्रमाणे भूमिगत चळवळीतील एक झुंझार कार्यकर्ता

म्हणून त्याचा असलेला स्थानिक लौकिक त्याच्या मदतीला आला. मेजर हॉटमानला शोधण्याचे सारे प्रयत्न व्यर्थ ठरले. बहुधा तो बर्लिनच्या अंतिम घनघोर युद्धात कामी आला असावा. परिणामत: सँडर निर्दोषी म्हणूनच सुटला.

एका हलकट देशद्रोह्याला शासन झाले नाही याचा तर पश्चात्ताप झालाच मला; पण आणखी एका गोष्टीचाही झाला. त्या वेळी, त्या सगळ्या घाईगर्दीत आपल्या पत्नीवर ओंगळ आरोप करणारे ते निनावी पत्र सँडरने का पाठवले याचा खुलासा मी त्याच्याकडून मिळवू शकलो नाही. ते पत्र सँडरनेच लिहिले होते, अशी माझी खात्री झाली होती. छपाईकाम करणाऱ्यांना मोठ्या मोठ्या ठळक अक्षरात मजकूर लिहिण्याची सवय असते. तो घाईत लिहिताना अक्षरांची गिचमिड सहजच होते. जुळाऱ्याला स्वल्पविराम आणि पूर्णविराम यातील फरक स्पष्ट कळावा म्हणून पूर्णविरामाभोवती वर्तुळ करण्याचा संकेत छपाईधंद्यात रूढ होता. शिवाय मी प्रथम ते पत्र श्रीमती सँडरला दाखवले, त्या वेळच्या तिच्या प्रतिक्रियेवरून तिने ते ओळखले होते, असे म्हणावेसे वाटते मला.

अटक होण्यापूर्वी हॉटमानकरवी आपल्या बायकोला संकटात घालून तिचे पातिव्रत्य पारखून पाहण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न सँडरने केला होता काय? का बायकोच्या निष्ठेच्या बदल्यात आपले प्राण वाचवायला सँडरला हॉटमाननेच भाग पाडले होते? का हॉटमानने दोघांना फसवून, श्रीमती सँडरला फितवण्यापूर्वी सोयीस्करपणे सँडरची तेथून उचलबांगडी केली होती? या प्रश्नांची उत्तरे मला कधीच मिळणार नाहीत. परंतु बहुधा परत आल्यावर सँडरला साऱ्या गोष्टी समजल्या असाव्यात. त्यांची वाच्यता कोणाजवळ, आणि विशेषत: आपल्या पत्नीजवळ, करणे त्याला शक्य नव्हते; कारण त्यात त्याचा गुन्हा उघडकीला येण्याचे संकट उद्भवले असते. त्यामुळे द्वेषबुद्धीने प्रेमाच्या या विलक्षण त्रिकोणातील एकमेव निरपराध व्यक्तीवर आरोप करून तिला अपराधी ठरवण्याचा प्रयत्न त्याने केला असावा.

■■

# अंधांचे जग

## शरद गोखले

"या चादरी आणि हे टॉवेल्स पाहा." चादर हातात घेऊन पाहत असतानाच श्री. बम्मनकर उत्साहाने हाकारतात. "अरे, संपत, जरा खडूची पेटी घे बघू." चादर आणि टॉवेल्स पाहून मी खडूंकडे वळतो. श्री. बम्मनकर अभिमानाने सांगतात, "हे सर्व आमच्या विद्यार्थ्यांनी तयार केलं आहे हं. अगदी अजिबात दृष्टी नसून." हे सांगत असताना त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान समोरच्या माणसाला एक वेगळाच आनंद देऊन जाते.

एकोणीसशे बावन्न सालापासून म्हणजे अगदी संस्थेच्या स्थापनेपासून श्री. बम्मनकरांचा 'पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशन' या संस्थेशी संबंध आहे. "अंधजनांना समाजाची सहानुभूती नेहमीच मिळते. तथापि, या सहानुभूतीचा अंधांना फारसा उपयोग होत नाही. कारण, ही कोरडी सहानुभूती त्यांच्यातील अभिमान जागृत करू शकत नाही. दया आणि अनुकंपा याचा अंधजनांना फायदा होण्याऐवजी त्रास होतो, असा आमचा अनुभव आहे. आपण काम करू शकतो, पैसे मिळवू शकतो आणि अन्य चारचौघांसारखे मानाचे जिणे जगू शकतो, असा आत्मविश्वास अंध माणसामध्ये निर्माण झाला तरच त्याचे जिणे सुसह्य ठरते."श्री. बम्मनकर न थांबता अगदी मनापासून बोलत होते, आणि मी ऐकत होतो. असंख्य अंधजनांचे दुःख त्यांनी चार वाक्यात सांगितले; दृष्टिहीन माणसाला काम करण्याची कितीही इच्छा असली, तरी त्याला काम मिळणे कठीण होते. शिवाय त्याने कोणत्या पद्धतीचे काम करावे यालाही काही स्वाभाविक मर्यादा होत्या. आमच्या गरजा खुद्द आमच्यापेक्षा इतरांना समजणे कठीण, म्हणून आम्ही काही अंधजन व आमचे काही डोळस मित्र यांनी १९५२ मध्ये 'पुणे अंधजन संस्थे'ची (Poona Blind-men's Association) स्थापना केली.

१९५२ ते १९६९ या १७ वर्षांच्या काळात या संस्थेने झपाट्याने प्रगती केली आहे. अंधजनांमध्य आत्मविश्वास व जीवनासंबंधी गोडी निर्माण करणे आणि आर्थिकदृष्ट्या त्यांना स्वावलंबी बनवणे, ही या संस्थेची प्रमुख उद्दिष्टे होती. संस्थेच्या कार्यासाठी सतत निष्ठावान कार्यकर्ते मिळत गेल्याने संस्थेने खरोखरच कौतुकास्पद यश मिळवले आहे. आज केवळ पुण्यातीलच नव्हे, तर महाराष्ट्राच्या विविध भागातील अंधजन विश्वासाने संस्थेकडे येत आहेत. तथापि, आर्थिक अडचणी आणि अपुरी जागा, यामुळे इच्छा असूनही संस्थेला विद्यार्थ्यांकडे पाठ फिरवावी लागत आहे.



**वेतकाम चालू असताना**

जन्मतःच्या अंधांचे प्रमाण अत्यल्प असते. त्यामुळे संस्थेकडे येणाऱ्या अंधजनांपैकी बहुसंख्य विद्यार्थ्यांना अपघाताने अथवा देवीसारख्या रोगामुळे अंधत्व आलेले असते. स्वाभाविकपणेच या विद्यार्थ्यांना विलक्षण निराशने ग्रासलेले असते. त्यामुळे संस्थेत दाखल झाल्यावर त्यांच्या मनात घर करून बसलेली निराशा दूर करण्याचे कठीण काम करावे लागते. विद्यार्थ्यांची जीवनसंघर्षाची मानसिक तयारी झाल्यावर त्याला व्यावसायिक शिक्षण देण्यात येते. साधारणपणे हा अभ्यासक्रम चार वर्षांचा आहे. ब्रेल लिपीच्या साहाय्याने वाचन, खडू तयार करणे, खुर्च्यांचे वेतकाम करणे व हातमागावर काम करणे, इतक्या गोष्टी विद्यार्थ्यांना शिकवण्यात येतात. या व्यवसायांमुळे विद्यार्थ्यांला काम शिकता येते, केलेल्या कामाचा त्याला मोबदला मिळतो आणि होणाऱ्या उत्पन्नातून संस्थेचा खर्च चालवण्यास मदत होते.

## वाढत्या गरजा : अपुऱ्या सोयी

संस्थेच्या गणेश पेठेतील शेडमध्ये हातमाग कापडाचे उत्पादन होते. गेल्या वर्षी संस्थेने ३१ हजार रुपयांचे कापड सरकारला विकले, तर पुण्याच्या विविध शिक्षण संस्थांतून ७ हजार रुपयांच्या खडूंची विक्री झाली. वेतकामाचा व्यापही वाढला असून, गेल्या वर्षी संस्थेला या विभागात चार हजार रुपयांची प्राप्ती झाली. विद्यार्थ्यांची वाढती संख्या आणि वाढता व्यावसायिक व्याप यांमुळे सध्याची जागा अपुरी पडत आहे. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सतत खटपट करून शासनाला संस्थेच्या वाढत्या गरजांचे महत्त्व पटवून देण्यात यश मिळवले आहे. हडपसर येथे तीन एकरांचा एक प्रशस्त प्लॉट शासनाने संस्थेला दिला असून या जागेत एक कायम स्वरूपाचे वर्कशॉप व अंधगृह बांधण्याचा संस्थेचा मानस आहे. सध्याच्या अपुऱ्या सोयींमुळे एका वेळी ५०ते६० विद्यार्थ्यांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची सोय होऊ शकत नाही. त्यामुळे अंध तरुण मुलांना निराश होऊन परत जावे लागते आणि दुर्दैवाने त्यांची कोठेच सोय होऊ शकत नाही. कारण भारतातील अंधांची संख्या सुमारे २० लक्ष असून सबंध देशामध्ये त्यांना शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या केवळ १४० पर्यंत आहे आणि या संस्थांतून केवळ १० ते १२ हजार अंधजनांची सोय होऊ शकते. म्हणजेच संख्येने अक्षरशः लाखोंनी असलेल्या आपल्या या बांधवांना योग्य सोयीअभावी उपेक्षित जिणे जगावे लागत आहे. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना या विदारक वास्तव परिस्थितीची कल्पना असल्याने आणि दुर्दैवाने त्यांतील कित्येक स्वतः अंधजन असल्याने आपल्या परीने ही सर्व मंडळी शर्थीचे प्रयत्न करीत आहेत. प्रयत्न आणि सहानुभूती यांची सांगड घालून आपण आपले ध्येय गाठू शकू, असा आत्मविश्वास त्यांच्या बोलण्यात दिसून येतो.

संस्थेची भावी योजना १५ लक्ष रुपयांची आहे. त्यातील पहिल्या टप्प्यामध्ये ८ लक्ष रुपयांचे काम होणार आहे. ही रक्कम एक प्रचंड वर्कशॉप आणि अंधगृह बांधण्यासाठी खर्च करण्यात येणार आहे. या अंधगृहामध्ये सुमारे २०० विद्यार्थ्यांची सोय करण्यात येईल आणि वर्कशॉपमध्ये अनेक नवीन स्वरूपाची कामे करता येतील. अंधांना सुयोग्य ठरतील, असे अनेक व्यवसाय संस्थेजवळ तयार आहेत. हलक्या स्वरूपाचे इंजिनीअरिंग काम, (भागांची जुळवणी करणे, पॅकिंग, इ.) हॅन्डलूम वर्क, सुतारकाम, शिवणकाम, विणकाम, (अंध भगिनींसाठी) कागद तयार करणे, ब्रशेस तयार करणे, आदी अनेक योजना तयार आहेत. वाण आहे ती फक्त पैशांची ! तथापि या अडचणींवरही आपण मात करू शकू अशी संस्था चालकांची महत्त्वाकांक्षा आहे. या संदर्भात पुणे रोटरी क्लबने दिलेल्या २० हजार रुपयांच्या देणगीचा उल्लेख करणे आवश्यक वाटते. संस्थेतर्फे पैसा उभा करण्यासाठी सर्वतोपरीने प्रयत्न चालू आहेत.

या संस्थेतून शिक्षण घेऊन बाहेर पडलेली ३०–४० मंडळी सध्या पुण्याच्या

परिसरात काम करीत आहेत आणि आश्चर्याची बाब म्हणजे त्यांचे काम केवळ समाधानकारकच नव्हे तर उत्कृष्ट असल्याचा दाखला देणारी पत्रे संस्थेकडे आली आहेत. एस्केप कंपनीमध्ये काम करणाऱ्या एका कामगाराने एका महिन्यात जादा काम करून ५०० रुपये मिळवले असल्याचे श्री. बम्मनकर यांनी सांगितले. आपल्या कामात कुशल असल्याने आमचा कोणताही कामगार १५० ते २०० रुपये वेतन मिळवू शकतो; इतकेच नव्हे तर शिक्षण चालू असताना आम्ही जे वेतन देतो, त्यामध्येही ४० ते १२५ रुपये मिळवणारे विद्यार्थी असल्याचे संस्थेच्या चिटणिसांनी सांगितले.

संस्था पाहिल्यावर अक्षरशः निराशामय जीवनातून नवजीवन उभारण्याची जिद्द बाळगणारे संस्थेचे विद्यार्थी आणि त्यांनी केलेले काम पाहिले म्हणजे संस्था किती मौलिक कार्य करीत आहे याचा प्रत्यय येतो.

संस्थेची माहिती मी श्री. बम्मनकर यांच्याकडून घेतली. श्री. बम्मनकर यांनी मसाज करण्यात-कौशल्य संपादन केले आहे. जहांगीर नर्सिंग होम, रुबी नर्सिंग हॉल आदी ठिकाणी ते काम करतात. त्यांची मासिक प्राप्ती ३५० ते ४०० रुपयांपर्यंत असल्याचे त्यांनी अभिमानाने सांगितले. मग "तुम्ही इथे कसे काम करता ?" असा प्रश्न मी विचारला असता, श्री. बम्मनकर म्हणाले, "आमच्या अंध बांधवांना मदत करणे मी कर्तव्य समजतो. माझ्या कामाचा कोणताही मोबदला मी घेत नाही. अंधांसाठी ब्रेल लिपीतून मी 'अंतर्ज्योती' हे द्वै-मासिक मी संपादन करतो. या लिपीतून पुस्तके तयार करणे हे अतिशय कठीण काम असते. आतापर्यंत तर ही लिपी हातांनीच कोरावी लागे. तथापि जोगेश्वरी येथे निघालेल्या नवीन छापखान्यातून आता ब्रेल लिपीतील पुस्तके तयार होऊ शकतात. तथापि, हे काम अती खर्चाचे असते."

अंधांच्या संदर्भातील समाजाची कर्तव्ये कोणती असे मी विचारले असता, श्री. बम्मनकर म्हणाले, "समर्थ असणाऱ्या अंधाला समाजाने म्हणजेच पर्यायाने व्यावसायिकांनी काम मिळवून दिले पाहिजे. अंधांच्या दृष्टीने सर्वांत नाजूक प्रश्न म्हणजे विवाहाचा ! अनेक प्रयत्न करूनही अंधांचा विवाह जमवणे फार कठीण जाते. तथापि पुरुषांच्या बाबतीत विवाह जमवणे काही प्रमाणांत तरी शक्य असते. परंतु अंध मुलीला पती मिळवून देणे जवळ जवळ अशक्य आहे. या प्रश्नाची सोडवणूक करण्याचे प्रयत्नही आम्ही करतच असतो.

अंधांचे जग हे अगदी वेगळे. त्यांच्या आशा—आकांक्षाही मर्यादित. त्या पूर्ण करण्याची जबाबदारी समाजाने अंशतः तरी पार पाडली पाहिजे. 'माणूस'च्या वाचकांनी या संदर्भात त्यांना जे सहकार्य करणे शक्य आहे ते अवश्य करावे, असे त्यांना सुचवावेसे वाटते. (सहकार्यासाठी श्री. एन्. एम्. मर्चंट, चिटणीस, पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशन, ८२ रास्ता पेठ पुणे ११, यांच्याशी संपर्क साधावा). ■■



# पक्षी उडाला

गोविंद मार्तंड पुरंदरे

संपूर्ण नागपूरवर आज एक जणू शोककळा पसरली होती. असे दैवाचे दुर्विलास पाहण्याचे ह्या नगरीच्या दोन वर्षांत, तिसऱ्यांदा नशिबी आले होते. दुसऱ्या रघुजी महाराजांच्या निधनाची आकाशीची कुऱ्हाड दोन वर्षांपूर्वीच नागपूर प्रांतावर पडली होती. एकूण रात्र वैऱ्याची होती. सर्व बाजूंनीच साऱ्या अमंगल वार्ता नगरीत बेचैन वातावरण निर्माण करीत होत्या. रघूजीचा मृत्यू विशेष जाणवणारा होता. कारण साऱ्या हिंदुस्थानभर तैनाती फौजेचा टेंभा मिरविणाऱ्या गोऱ्यांना रघुजी महाराजांनी पूर्ण ओळखले होते. त्यांनी ह्या रेशमी फासापासून भोसल्यांचे राज्य हरप्रयासाने दूर ठेवले होते. त्यामुळेच घरच्या पडत्या काळात

**औरंगजबाच्या छावणीतून हा एकोणिसाव्या शतकातील भोसला पसार झाला होता. पक्षी उडाला होता. पिंजऱ्याचा मालक हळहळत होता.**

सर्वांना धीर देऊन घरातील माणसांचा उत्साह वाढविणारा कर्तापुरुष कालवश होऊन जावा, तसे नागपूर प्रांताच्या लोकांना दुसऱ्या रघुजी महाराजांच्या मृत्यु-नंतर वाटल्यास नवल नव्हते !

परंतु दुसऱ्या रघुजीच्या वियोगाची जखम वाहत असतानाच आजचा हा अशुभ दिवस नाग नदीच्या काठी उगवला होता. नागपूरचे आप्पासाहेब भोसले इंग्रजांचे कैदी बनले होते. आज इंग्रजी पंचांगाप्रमाणे १८१८ सालची मार्च महिन्यातील १५ तारीख. सर्वशक्तिनिशी आप्पासाहेबांनी टक्कर देऊनही सीता-बर्डीच्या लढाईत भोसल्यांना हार खावी लागली होती. मराठ्यांची आपसातील दुही आणि इंग्रजाची कूटनीती ह्यांचा विजय झाला होता.

आप्पासाहेब सीताबर्डीच्या टेकडीपायथ्याशी असलेल्या रेसिडेन्सीत कैदी म्हणून आजपासून राहणार होते. मुक्त संचार करणारा हा नरव्याघ्र आजपासून कपटयांच्या कोठडीत जीवन कंठणार होता. नागपूरची सारी जनता हळहळत होती. दुःखाबरोबरच एक भीतीचे वातावरण सर्व गावभर पसरले होते. शुक्रवार दरवाजातून आत अफवांचे नुसते पेव फुटले होते. कुणी म्हणे आप्पासाहेबांची इंग्रजी लष्करी कोर्टाकडून चौकशी होणार आहे, तर कुणी म्हणे त्यांना कल-कत्त्याला नेणार आहेत. एक ना हजार ! कुणीही उठावे आणि काहीही उठवावे. तरीपण आप्पासाहेब कैदी झाले तरी त्यांच्या जिवाला जीव देणारी मंडळी गावात कमी नव्हती. गंगासिंग आणि त्याचे साथीदार गुप्तपणे महाराजांवर सक्त नजर ठेवीत होते. त्यामुळेच आप्पासाहेबांस नागपूरहून उत्तरेकडे हलविण्यात येणार आहे ही बातमी गंगासिंगाला ताबडतोब समजली. नाहीतरी इंग्रजांचे नोकर आणि शिपाई सर्व हिंदी माणसेच होती. गंगासिंगाने त्यांपैकी अनेकांचे हात ओले करून बित्तंबातमी काढण्याची पूर्ण व्यवस्था करून ठेवली होती. ह्याकरिता गंगासिंगाला आप्पासाहेबांच्या धर्मपत्नी उमाबाई यांच्याकडून पैशाचा सतत पुरवठा होत होता. शेवटी आप्पासाहेबांना हलविण्याचा दिवस ठरल्याचे रेसिडेन्सीतून महालात गुप्त जासुदाकडून कळले. तसेच उमाबाईंनी गंगासिंगाला बोलावणे पाठवले. सोमलवाड्याहून गंगासिंग आल्यावर उमाबाईंनी डोळ्यांत पाणी आणून गंगासिंगाला म्हटले, "गंगासिंग, जेंकीनच्या कोठडीतून आलेली बातमी तुला समजलीच असेल. उद्या सकाळी उत्तरेकडं हलविलं जाणार आहे. तू

शेवटपर्यंत मागावर राहून योग्य ते करशीलच याची मला खात्री आहे. माझ्या सौभाग्यरेषेला वळण देणं केवळ तुझ्या आणि तुझ्याच हाती आहे." गंगासिंग हा खरा निधडा, हरहुन्नरी, अत्यंत चतुर असा शूर वीर होता. पण तोसुद्धा उमाबाईंच्या ह्या बोलण्यानं विरघळून गेला. अत्यंत भारावलेल्या अवस्थेत तो उभा होता. त्याची ती अवस्था उमाबाई समजू शकल्या. काही वेळ थांबून त्या म्हणाल्या, "गंगासिंग, पैशाची कधीच अडचण पडणार नाही. तुझा नुसता निरोप आला तरी अर्ध्या रात्री वाटेल तितके धन तुझ्या हाती लागेल ह्याची खात्री बाळग. तूर्त ही थैली जवळ असूदे." असे म्हणून उमाबाईंनी गंगासिगाच्या हाती एक बरीच जड अशी थैली दिली. गंगासिंगाने थैली उघडून पाहिली नाही, तरी आत मोहरा आणि मौल्यवान हिरे-माणके आहेत, अशी त्याची खात्री होती. गंगासिंग हा आप्पासाहेबांचा हा अत्यंत विश्वासातला. स्वामीनिष्ठा त्याच्या रोमरोमांत भिनली होती. उमाबाईंच्या ह्या बोलण्यात तो होत्याचा नव्हता झाला होता. काही वेळ कुणीच काही बोलत नव्हते. चौकापलीकडे नव्या हवेलीतून हसण्याखिदळण्याचे आवाज मधून मधून गवाक्षातून कानांवर पडत होते. महालात आप्पासाहेबांना कैद केल्यापासून बाकाबाईच्या नव्या हवेलीत मात्र आनंद, उत्साह दुथडी वाहत होता. त्या भयाण वातावरणातील भकास शांततेचा भंग करीत गंगासिंगाने हळूच मान वर केली. मनात चाललेली खळबळ नंदादीपाच्या प्रकाशात त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. "राणीसाहेब," एक शब्द बोलून गंगासिंग थांबला. पण पुन्हा श्वास रोखून जमिनीकडे पाहत गंगासिंग म्हणाला, "महाराजांच्या केसाला धक्का लागल्याची कसलीपण बातमी कळण्यापूर्वी गंगाराम आणि त्याच्या साथीदारांचेच मुडदे पडल्याचेच तुम्हांला अगोदर कळेल, ही गोष्ट पंचमढीच्या महादेवाची आन वाहून सांगतो." गंगासिंग पंचमढीच्या महादेवाचा महान उपासक होता. थरथरत्या अंतःकरणाने गंगासिंग बोलत होता. त्यानंतर लगेच गंगासिंग उमाबाईंना मुजरा करून त्यांच्या खोलीच्या बाहेर पडला, तो सरळ अयाचित मंदिराकडे वळला आणि तेथून अंधारातून नाहीसा झाला.

रात्रभर रेसिडेंट जेंकिन्सच्या देखरेखीखाली आप्पासाहेबांच्या रवानगीची तयारी सुरू होती. प्रयाणाची वार्ता-मार्ग अगदी गुप्त ठेवले होते. तरीपण सीताबर्डीच्या टेकडीवरून वाहणारा वारा सर्व बातम्या गंगासिंगाला कळवीत होता. आप्पासाहेब मध्यरात्र उलटून गेल्यावर नागपूरच्या बाहेर पडणार असून जबलपूरच्या दिशेने कूच करणार आहेत, ही बातमी गंगासिंगाच्या साथीदारांना शुक्रवार तलाववरील झोपडीत रात्री बाराच्या सुमारास कळली होती. ठीक मध्यरात्र उलटून गेल्यावर रेसिडेन्सीच्या आवारातून ५० घोडेस्वारांची तुकडी बाहेर पडली. त्यात तिसरा भाग गोरे सैनिक असून बाकीचे हिंदी सैनिक होते. पाठोपाठ तीन मेणे पंधरा-पंधरा, वीस-वीस पावलांच्या अंतरावर भोई उचलून नेत होते. मेण्याच्या

दोन्ही बाजूंनी संगीनधारी घोडेस्वार शिस्तबद्ध पद्धतीने चालत होते. मधल्या मेण्याच्या भोवतालीही घोडेस्वारांची संख्या थोडी अधिक होती. मधल्या मेण्यात आप्पासाहेब होते. समोर आणि मागे आप्पासाहेबांचे जिवलग साथीदार नागोपंत आणि रामचंद्र वाघ हे होते.

मेण्यांच्या मागे परत ५० सशस्त्र सैनिकांची तुकडी शिस्तीने चालली होती. संपूर्ण कामाची जबाबदारी असलेला कॅप्टन ब्राऊन घोड्यावर सतत पुढेमागे देखरेख ठेवीत होता. अंधारात मेणे चालले होते. कोणाच्याही तोंडातून शब्द निघत नव्हता. घोड्यांच्या टापांमुळे ह्या नीरव शांततेचा भंग होण्यापलीकडे वातावरण पूर्ण शांत होते. कुणी पाळतीवर असेल तर त्याला आपला मार्ग कळू नये म्हणून ब्राऊनने तेलंखेडी तलावाला वळसा घालून रामटेक मार्गाने सैन्याला चलण्याची आज्ञा दिली, परंतु गंगासिंगाचे साथीदार फसू शकत नव्हते. रेसिडेन्सीपासून ब्राऊनची मागची सैनिकांची तुकडी रामटेक रस्त्याने कोस-दीड कोस गेली असेल नसेल तोच मोतीबागेतून गंगासिंग आणि त्याचे सैनिक सौदागराच्या वेषात रामटेक रस्त्याला लागले.

शुक्राची चांदणी दिसते न दिसते तोच कॅप्टन ब्राऊनने ठरल्याप्रमाणे मेणे रामटेकच्या जवळपास आणले. रामटेकची टेकडी जेमतेम कोसभर असेल नसेल तोच कॅप्टनने थांबण्याची आज्ञा दिली. एका दमात भोई सतत दौड करीत असल्यामुळे ते घामाने नुसते निथळत होते. रामटेक गाव दूर टाळून त्यांना पुढचा मार्ग आक्रमायचा होता. सर्वच प्रवासात वस्तीपासून शक्यतोवर दूर राहूनच मार्ग आक्रमण करण्याचा रेसिडेंटचा सक्त हुकूम होता. पुढचा प्रवास दुपारी १२ वाजल्यानंतर करण्याचे ब्राऊनने ठरविले होते.

आप्पासाहेब भोसल्यांचा अशा प्रकारे प्रवास जबलपूरच्या दिशेने सतत सुरू होता. गंगासिंगाचे सौदागर ब्राऊनच्या मागोमाग कोस दोन कोसांवरून बरोबर आप्पासाहेबांशी गुप्तपणे संधान बांधून होते. कॅप्टन ब्राऊनने आप्पासाहेबांच्या भोवताली केवढा कडेकोट बंदोबस्त ठेवला होता ! आप्पासाहेबांच्या बारीक हालचालींवर पण तो डोळ्यात तेल घालून नजर ठेवत होता. इतके करूनही आप्पासाहेबांस गंगासिंगाच्या हालचालींबद्दल दिवसातून एकदा तरी बातमी कळत होती. ब्राऊन शक्य तितका सतर्क होता; कारण सभोवतालच्या जंगलातील गोंड आणि सर्वसाधारण ग्रामीण लोकांची आप्पासाहेबांस पूर्ण सहानुभूती आहे, ती जनता अजून शंभर टक्के राजनिष्ठ आहे, ह्याची जाणीव त्यास निघण्यापूर्वीच नागपूरला देण्यात आली होती.

शक्यतो दिवसा प्रवास करून रात्रीच्या वेळी छावणीचा मुक्काम होत असे सैनिकांपासून भोयांपर्यंत २०० च्या वर लोक ब्राऊबरोबर होते. ते लोक संध्याकाळच्या वेळेस तंबू ठोकून रात्रभर मुक्कामाची सोय करीत. रात्रभर छावणीवर कडक पहारा असे. दर चार तासांनी पहारेकरी बदलत असत. शिवणीला एक दिवस

मुक्काम वाढला होता. पुढे लखनौंद सोडले तसे गंगासिंगाच्या हालचाली बऱ्याच वाढल्या. होता, होता मुक्काम जबलपूरच्या दक्षिणेस रायचूरजवळ येऊन पोचला. गंगासिंगाचा पण मुक्काम कोसभराच्या आतच होता. नागपूरहून निघण्याच्या वेळेपासून ब्राऊनच्या लोकांत आप्पासाहेबांविषयी निष्ठा असणाऱ्या लोकांचा भरणा होताच. आतून आप्पासाहेबांच्या ह्या बंदिस्त स्थितीबद्दल ते अत्यंत व्यथित होते. ह्यात उत्तर हिंदुस्थानी रामशरण, हरिसिंगसारखे भोई, तर गेनू, तानबा, व्यंक्या, इत्यादी मराठी सैनिक घुडस्वार आणि रहीम, अहमद, अबदुल्ला वगैरे अनेक अरब पण होते. ह्या सर्वांचा गंगासिंगाशी आणि त्याच्या साथीदारांशी संबंध होता. इतकेच नव्हेतर गंगासिंगाच्या संकेतानुसार ही मंडळी वागत असत.

सूर्यनारायण पश्चिमेला लाल दिसत असतानाच रायचूर गावाजवळ ब्राऊनने थांबण्याची आज्ञा दिली. साधारणतः सपाट पृष्ठभाग पाहून तंबू ठोकण्याची तयारी चालू होती, इतक्यात रायचूर गावाच्या दिशेने एक भिक्षेकरी आला आणि छावणीच्या लोकांना भीक मागू लागला. एका गोऱ्या सोजिराने त्याला हाकलण्याचा प्रयत्न केला, पण तो भिकारी फारच लोचट दिसला. बंदुकीची नळी पाहून पण घाबरत नव्हता. अखेरीस त्या गोऱ्या सोजिराने दोन सैनिकांना त्याला १५० पावलांपलीकडे धक्के देऊन हाकलून देण्याचा हुकूम केला. त्याप्रमाणे गेनू आणि तानबा त्या भिकाऱ्याच्या अंगावर खेकसून धावले. दोघे त्याचे दंड धरून १५० पावलांपलीकडे ओढीत घेऊन चालले. भिकारी पण निमूटपणे जाऊ लागला. तोंडाने मात्र केविलवाणे ओरडणे चालूच होते. शेवटी कुणाचे लक्ष नाही असे पाहून त्याने हळूच तानबाच्या हातात एक कागदाची घडी दाबली. चिठ्ठी तानबाला मिळाली तसा तानबाचा खेकसण्याचा आणि भिकाऱ्याचा केविलवाणा आवाज अधिकच वाढला. शेवटी भिकाऱ्याला सोडून तानबा आणि गेनू छावणीत परतले. मात्र अर्ध्या घटकेच्या आत तानबाला काहीतरी निमित्त काढून आप्पासाहेबांच्या तंबूकडे फिरकताना पाहण्यात आले होते.

रात्री बाराचा सुमार होता. दिवसभर वैशाखाच्या उन्हामुळे तापलेल्या वातावरणात गारवा येण्यास सुरवात झाली होती. तरीपण छावणीच्या नियमाप्रमाणे दोन बाजूंनी दोन आगट्या पेटलेल्या होत्या. छावणीत पहारेकरी सोडून सर्वत्र निजानीज झाली होती. झोपण्याकरिता परतण्यापूर्वी ब्राऊनने जातीने हातात रायफल घेऊन सर्व छावणीला एक चक्कर मारली होती. रात्रीच्या वेळी दर तीन तासांनी गस्त बदलत होती. बारानंतर आता भल्या पहाटे म्हणजे सकाळी तीन वाजता गस्त बदलणार होती. कृष्णपक्षाचा जोर असल्यामुळे आगट्यांच्या आसपासचा भाग सोडून सर्वत्र गडद अंधार होता. आकाश निरभ्र असल्यामुळे मिणमिणत्या ताऱ्यांचा काही प्रकाश पोचत होता इतकेच. सभोवार किर्र झाडी. कोल्ह्यांची कोल्हेकुई आता थांबली होती. परंतु पहारे बदलल्यावर दूरवर एकदा वाघाच्या डरकाळीचा आवाज ऐकू


आला होता. त्यामुळे पहारेकरी झाडीत काही पण हल्ल्यासारखे दिसले तरी ' देख रे भय्या शेर आया, ' म्हणून शेजारच्या शिपायाला आवाज देत होता. इकडे आप्पासाहेबांच्या तंबूत एक सेवक रात्रभर उशाशी वारा घालत होता. कारण, वैशाखाच्या दिवसांत गर्मी होत असूनही आप्पासाहेबांना उघड्यावर झोपण्याची मनाई होती. इतर सर्वजण कुणी तंबूच्या कमानी वर करून, तर कुणी पूर्णपणे उघड्यावरच झोपले होते. बारा वाजण्याच्या सुमारास आप्पासाहेबांच्या तंबूतील मेणबत्ती विझली. त्यामुळे गार्डने तंबूजवळ येऊन त्याबद्दल चौकशी केली असता नोकराने हवेच्या झोतामुळे दिवा विझला असल्याचे सांगितले. गार्डने जास्त चौकशी केली नाही.

संपूर्ण छावणीभोवती पंचवीस पहारेकरी होते. पहाऱ्याची वेळ संपत आली, की नवीन पाळीचे लोक गार्डच्या राहुटीमागे जमा होत. गार्ड सर्व तंबूच्या मध्यभागात मागच्या बाजूस उभा असे. ' लेफ्ट राइट ' करीत सर्वजण गार्डच्या समोरून निघून जात. सकाळी तीनचा सुमार. नवीन पहारेकरी पहाऱ्यावर जाण्याकरिता अंधारातच उभे होते. जुने पहारेकरी ताटकळून केव्हा एकदाचे जाऊन अंथरुणावर अंग टाकतो म्हणून कंटाळले होते. दोन्ही बाजूंनी जळत असलेल्या मोठाल्या आगट्या आता शांत होत आल्या तरी पण त्यामधील रसरशीत निखारे अजूनही सभोवतालचे वातावरण तापवीत होते. नवीन पहारेकरी आल्यावर ते आता त्या आगट्यांत लाकडे टाकून त्या सकाळपर्यंत जळत राहण्याची व्यवस्था करणार होते. इतक्यांत जुन्या पहारेकऱ्यांची तुकडी पाय टाकीत गार्डसमोर येऊन दाखल झाली. गार्डसाहेबांची पण ड्यूटी आता बदलणार त्यामुळे ते पण बरेच ताटकळून गेले होते. साधारण ५।१० शिपायांचे चेहरे अर्धेमुर्धे दिसल्यावर त्यांनी 'क्विक मार्च' हा शब्द कानावर पडल्यावर शिपायांची ओळ पुढे सरकू लागली.

नवीन पहारेकरी आपल्या जागेवर पहारा करण्यास निघून गेले होते. जुने पहारेकरी ' सुटलो एकदाचे ' म्हणून श्वास टाकीत आपल्या तंबूत आडवे झाले. हळूहळू काळ सरकत होता. शुक्राची चांदणी दिसू लागली आणि काही वेळात अंधकाराचा पूर्ण नाश होऊन स्पष्ट प्रकाश दिसू लागला. सूर्यनारायणाच्या आगमनाची वर्दी देणाऱ्या पक्ष्यांचा किलबिलाट पण आता बंद पडला. रात्रीच्या पहाऱ्यावरील पेंगलेले सोडून छावणीतील सर्वजण जागे होऊन तंबूबाहेर दिसू लागले होते. आप्पासाहेब मात्र अजून तंबूच्या बाहेर पडले नव्हते. ड्यूटीवरील गार्डने तंबूसमोर जाऊन त्यामुळे चौकशी केली. आप्पासाहेबांच्या नोकराने महाराजांचा पोटशूळ उठल्यामुळे रात्रभर जागरण झाल्याचे सांगितले. सकाळी सकाळीच त्यांचा डोळा लागल्याचे त्याने मोठा गंभीर चेहरा करून गार्डला सांगितले. तरीपण त्याला न राहवून त्याने तंबूची कनात वर उचलून आत डोकावलेच. पलंगावर कुणीतरी थेट डोक्यावरून शाल ओढून झोपल्याचे पाहून तो समाधान पावला. अधिक चौकशी करण्याच्या भानगडीत गार्डसाहेब पडले नाहीत.

इकडे सूर्यनारायण झाडातून हळूहळू वर सरकत संपूर्ण छावणी सूर्याच्या सोनेरी किरणात न्हाऊन निघत होती. झाडाच्या लांब लांब सावल्या आता हळूहळू आखूड होऊ लागल्या. ब्राऊन आपला प्रातर्विधी संपवून कॅप्टनच्या पूर्ण युनिफॉर्ममध्ये समोरच्या मैदानात दाखल झाला होता. सर्व लोकांच्या हालचालींत आप्पासाहेबांची अनुपस्थिती त्याला जाणवली. सूर्योदयापूर्वीचे होणारे आप्पासाहेबांचे दर्शन आज त्याला झाले नव्हते. त्यामुळे त्याने तावडतोब ड्यूटीवरील गार्डास बोलावून आप्पासाहेबांची चौकशी केली. गार्डाने आप्पासाहेबांची प्रकृती चांगली नसल्याचे त्यांच्या नोकराने सांगितले असल्याचे ब्राऊनला सांगितले. त्यावर ब्राऊनने एकदम 'तू स्वत: त्यांची प्रकृती पाहिलीस काय ?' म्हणून विचारले मग मात्र गार्डसाहेब गोंधळले. गार्डच्या चेहऱ्यावरील गोंधळ पाहून ब्राऊनचा चेहरा लालबुंद झाला. 'डॅमन, मोस्ट इॅरिस्पॉन्सिबल रोग' वगैरे शिव्या हासडतच ब्राऊनसाहेबांची स्वारी तावडतोब आप्पासाहेबांच्या तंबूकडे चालू लागली. कसायाच्या मागोमाग ओढल्या जाणाऱ्या गाईप्रमाणे गार्ड चालला होता. तंबूसमोर आप्पासाहेबांचा स्वामिनिष्ठ नोकर उभा होता. महाराजांची तब्येत ठीक नाही, झोपले असून न उठवण्याची मला ताकीद दिली आहे' वगैरे तो बोलत असतानाच ब्राऊनने त्याला 'गेट आऊट यू रास्कल' म्हणून धक्का मारून बाजूला सारले आणि हातवारे करीत तावातावाने तो तंबूत शिरला. पलंगावर पहुडलेल्या आप्पासाहेबांच्या अंगावरची शाल त्याने खसकन ओढली आणि काय ? कॅप्टन ब्राऊनची एकदम वाचाच लुळी पडली. युगाच्या अंताची आगाऊ सूचना देणाऱ्या कृतांतकाळाच्या घंटानादाचाच आवाज आपण ऐकत आहोत काय, असे क्षणभर त्यास वाटले. निमिषभर त्याची सर्व गात्रे एकदम बधीर झाल्याचा त्याला भास झाला. कारण पलंगावर आप्पासाहेब शाल पांघरून नव्हते तर त्यांच्या जागेवर तीन, चार लांब उशा ठेवल्या असून त्यांवर केवळ एक शाल झाकलेली होती. आप्पासाहेब सकाळीच तीन वाजता पहारेकरी बदलण्याच्या वेळेस शिपायाच्या वेषांत छावणीच्या बाहेर पडले होते. छावणीबाहेर पडून गंगासिंगाने तयार ठेवलेल्या घोड्यावर बसून छावणीतील नऊ साथीदारांसह आतापर्यंत ते दूरवर महादेवाच्या डोंगरात अज्ञातस्थळी पोहोचले होते. कडक शिस्तीच्या कॅप्टन ब्राऊनच्या हातावर तुरी देऊन आप्पासाहेब केव्हाच निसटले होते ! औरंगजेबाच्या छावणीतून हा एकोणीसाव्या शतकातील भोसला पसार झाला होता. पक्षी उडाला होता. पिंजऱ्याचा मालक हळहळत होता. ■■

# पुस्तके



## मराठी विचारवंत आणि आपण

**प्रा. मा. पं. मंगुडकर**

“मराठी विचारवंत आणि आपण” या विषयावर ‘मौज’ने १९६८ साली परिसंवाद आयोजित केला होता. या परिसंवादामध्ये प्राचार्य मे. पुं. रेगे, श्री. य. दि. फडके, प्राचार्य राम जोशी, श्री. प्रभाकर पाध्ये, श्री. दिलीप चित्रे, मधू पानवलकर, व वसंत पळशीकर यांनी भाग घेतला होता. ‘मौज’ दिवाळी अंकातील त्यांचे लेख आता पुस्तकरूपाने प्रकाशित केले आहेत.

महाराष्ट्राच्या दृष्टीने एखाद्या निवाड्याच्या प्रश्नावर विचारवंतांची मते एकत्रित स्वरूपामध्ये मांडण्याची ‘मौज’ची परंपरा जुनी आहे. त्यांच्या या परंपरेतील एक अतिशय महत्त्वपूर्ण प्रयत्न म्हणून या परिसंवादाचा उल्लेख करता येईल.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा आपला कालखंड हा कितीतरी घटनासंपन्न कालखंड आहे. याच काळात आपण आपल्या आर्थिक, राजकीय, सामाजिक जीवनाची पुनर्रचना करीत आहोत. शंभर–दीडशे वर्षे स्थितिशील झालेल्या आपल्या जीवनाची नव्याने मांडणी करण्याचा प्रयत्न करीत आहोत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या या अत्यंत महत्त्वाच्या, घटनासंपन्न कालखंडावर येथील विचारवंतांचा कोणता ठसा उमटला आहे? त्यांनी कोणता महत्त्वाचा वैयक्तिक वारसा दिला आहे? असा प्रश्न उपस्थित केला तर त्याचे उत्तर पुष्कळसे नकारार्थी द्यावे लागेल. हीच परिस्थिती पुढील कालातही चालू राहणे. विचारवंत व समाजजीवन दोघांच्याही दृष्टीने योग्य नाही. या दृष्टीने या महत्त्वाच्या प्रश्नाकडे अनेकांचे लक्ष वेधून ‘मौज’ने महत्त्वाचे कार्य केले आहे.

---

**प्रकाशक : वि. पु. भागवत, मौज प्रकाशन गृह**
**खटाववाडी, मुंबई ४. किंमत २ रु. पाने १००**

स्वातंत्र्योत्तर काळात येथील विचारवंताने आमच्या जीवनावर फारसा प्रभाव पाडला नाही, याबाबत या परिसंवादामध्ये सर्वच विचारवंतांमध्ये एकमत आहे. परंतु या प्रश्नाची प्रत्येकाची मीमांसा वेगळी आहे.

प्रा. य. दि. फडके म्हणतात, महाराष्ट्रातील विचारवंतांची परंपरा मुख्यत: व मूलत: ब्राह्मणी परंपराच राहिली आहे. त्यामुळे बहुसंख्य समाजामध्ये त्यांच्या-संबंधी. अविश्वासाची भावना आहे. त्यामुळे येथील विचारवंत समाजजीवनावर प्रभाव पाडण्यास असमर्थ बनले आहेत (पा. न. ३२–३३). श्री. मधू पानवलकर यांनी याच विचाराचा पुरस्कार केला आहे. (पा. नं. ८३). ही मीमांसा पुष्कळशी खरी आहे. आमचा विचारवंत शहरी भागांतला व समाजाच्या एका घटकातील येथील बहुसंख्य समाज खेड्यापाड्यांतील व दुसऱ्या थरांतला; त्यामुळे त्यांच्यामध्ये पुष्कळच अविश्वासाचे वातावरण आहे. या दोन्ही वर्गांमध्ये परस्पर विश्वासाची भावना निर्माण झाल्याशिवाय विचारवंत प्रभावी कार्य करू शकणार नाही, हेही खरे आहे. परंतु गेल्या १०-१५ वर्षांमध्ये ग्रामीण भागातून बहुसंख्य समाजातून अभ्यासकांचा, विचारवंतांचा एक नवा वर्ग निर्माण होत आहे.

महाराष्ट्रात आज खेड्यापाड्यांतून सुमारे २०० महाविद्यालये आहेत. तेथे कार्य करणारा प्राध्यापक वर्ग हा ग्रामीण भागातून आलेला व बहुसंख्य वर्गातीलच आहे. परंतु या नव्या बुद्धिजीवी वर्गाचा समाजावर काय प्रभाव दिसत आहे ? हा बुद्धिजीवी वर्ग तरी बहुसंख्य समाजाचा विश्वास उपभोगू शकणारा वर्ग आहे ना ? त्याचा प्रभाव पडण्याची कोणती लक्षणे आज दिसत आहेत ? ती दिसत नसतील तर त्यांची मीमांसा काय आहे ?

या संबंधीची श्री. मधू पानवलकर यांची दुसरी मीमांसा अशी की, विचाराला थोडेफार महत्त्व देणारे विरोधी पक्ष संख्येच्या दृष्टीने दुर्बळ आहेत आणि बहु-मताच्या जोरावर राज्य करणे शक्य असल्याने सत्ताधाऱ्यांना विचाराचे लोढणे गळ्यात बांधून घेण्यात स्वारस्य नाही, अशी ही शोकांकिका आहे.

श्री. प्रभाकर पाध्ये या प्रश्नाची मीमांसा वेगळ्या पद्धतीने करतात. त्यांचे म्हणणे असे की, आपल्या राज्यकर्त्यांची प्रकृती विद्वत्तेला फारशी अनुकूल नाही. विद्वानांचा उपयोग फक्त आपल्या सत्तेच्या राजकारणात करून घेण्याकडेच त्यांचा कल असतो. विद्वानांबद्दल आमच्या राज्यकर्त्या वर्गात थोड्याफार प्रमाणात आकसच आहे. ही परिस्थिती कायम आहे तोपर्यंत आमचे विचारवंत येथील आमच्या समाजजीवना-वर प्रभाव पाडू शकणार नाहीत. श्री. प्रभाकर पाध्ये यांनी पुढे असेही म्हटले आहे की, आमचे राजकारण हे दारिद्र्याचे राजकारण आहे. आमचे विचारवंतदेखील त्यामुळे अल्पस्वल्प फायद्याला बळी पडतात. त्यामुळे आपली स्वतंत्रता किंवा वैचा-रिक सचोटी ते टिकवू शकत नाहीत. ही परिस्थिती कायम आहे, तोपर्यंत आमचे विद्वान आमच्या समाजजीवनावर प्रभाव गाजवू शकणार नाहीत.

प्राचार्य राम जोशी यांनी यासंबंधी केलेली मीमांसा विचारप्रवर्तक आहे. त्यांचे म्हणणे असे की, आमचा शिक्षकच ज्ञानविरोधी आहे. त्याला ज्ञानाच्या क्षेत्रात फारशी आव्हानेच नाहीत. शिवाय समाजप्रबोधन आणि समाजपरिवर्तन यांविषयीदेखील मराठी विचारवंत उदासीन आहे. आमचे राज्यकर्ते हे बुद्धिवादविरोधी आहेत. आमचा विचारवंत वर्ग जर सामाजिक परिवर्तनाबद्दल उदासीन असला तर येथे बुद्धिवादविरोधी सत्ताधीशांवर अंकुश कोणी चालवावा, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे. विचारवंतांमध्ये ध्येयवाद निर्माण होणे व त्याने आपल्या भूमिकेचे पावित्र्य राखण्यासाठी पडेल ती किंमत द्यावयास तयार होणे हाच यावर उपाय आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

## गांधी युगातील बदल

वरील वेगवेगळ्या मीमांसा विचारप्रवर्तक आहेत यात शंका नाही. मला याबाबत एक महत्त्वाचे कारण दिसले ते काहीसे वेगळे आहे. १९२० पर्यंत आपल्याकडे विचारवंत आणि राजकारण यांच्यांत एक प्रकारचे अद्वैत होते. विचारवंत हा राजकारणामध्ये आघाडीवर होता. परंतु गांधीयुगाच्या उदयानंतर ही परिस्थिती हळूहळू बदलू लागली. गांधीयुग हे एका दृष्टीने ज्ञानाच्या पिछाडीचे युग होते. गांधीयुगात क्रियेला इतके महत्त्व आले की त्यामुळे ज्ञान, व्यासंग, विचार यांना झपाट्याने ओहोटी लागली. गांधीयुगाच्या आधी त्यामुळे टिळक, रानडे, गोखले, फिरोजशहा मेहता यांच्यासारखे मोठमोठे विचारवंत आपल्याला जसे दिसतात तसे गांधीयुगानंतर दिसेनासे होऊ लागले. आज राजकीय जीवनात विचारवंतांची जी पीछेहाट दिसते तिची मुळे गांधीयुगामध्ये आहेत. गांधीयुगात लोकांच्या आंदोलनाला महत्त्व असल्यामुळे व्यासंग, ज्ञानोपासना यांना पूर्वीइतके महत्त्व राहणे स्वाभाविक नव्हते. परंतु लोकांच्या आंदोलनाबरोबरच ज्ञानोपासनेला जर गांधींनी महत्त्व दिले असते तर कदाचित् आपल्या राजकीय जीवनाची चेहरेपट्टी बदलली असती. आजच्या आपल्या राजकीय जीवनाची पुष्कळशी मुळे त्यामुळेच गांधीयुगात शोधावी लागतील असे मला वाटते.

दुसरे असे की, आमचा विचारवंत हा समाजजीवनाच्या मुख्य प्रवाहापासून आज पुष्कळच तुटल्यासारखा वाटतो. तो सामान्य माणसाच्या सुखदु:खाशी समरस होऊ शकत नाही. आजच्या विचारवंताला समाजजीवनात प्रभावीपणे कार्य करायचे असेल तर त्याने सामान्य माणसाच्या आशा—आकांक्षांशी समरस होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. लोकशाहीचे तत्त्वज्ञान आपण एकदा स्वीकारल्यानंतर सामान्य माणसाबाबत आपल्या मनात अढी ठेवून चालणार नाही. लोकशाहीमध्ये सामान्य माणूस हाच आमच्या जीवनाचा शिल्पकार असतो. खऱ्या अर्थाने तोच आजचा भारतभाग्यविधाता आहे. अशा या सामान्य माणसाच्या सुखदु:खांशी समरस होऊन त्याच्या प्रश्नाचा आम्ही विचार करावयास लागले पाहिजे.

आमच्या प्राध्यापकवर्गाबद्दल दुसरी एक अडचण आहे. तो पाश्चात्य ग्रंथ वाचणारा आहे. परंतु या पाश्चात्य लेखकांचे ज्ञान आमच्या परिस्थितीच्या संदर्भा-मध्ये कितपत योग्य आहे, याची स्वतंत्रपणे समीक्षा तो करीत नाही. आमची पुष्कळशी समाजशास्त्रीय मूलभूत तत्त्वे युरोपमधील परिस्थितीच्या संदर्भामध्ये तयार झाली आहेत. परंतु ही मूलभूत तत्त्वे आमच्या परिस्थितीला कितपत लागू पडतात, हे तो क्वचितच पाहतो. अशा प्रकारचा आमचा प्राध्यापक वर्ग आमच्या समाजजीवनावर कोणता प्रभाव पाडणार आहे ?

इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीनंतर नवा राजकीय नेत्यांचा वर्ग उदयाला येऊ लागला. वैचारिक दृष्टीने हा वर्ग काहीसा कच्चा होता. अशा काळात तिकडील फेबियन सोशॅलिस्टांनी या नव्या वर्गाचे राजकीय शिक्षण करण्यासाठी अनेक छोट्या छोट्या पुस्तिका लिहून काढल्या. त्यामुळे कामगारांमधून राजकीय शिक्षण झालेला एक नवा वर्गच्या वर्ग निर्माण झाला. आमच्याकडेदेखील अशा उपक्रमाची आज गरज आहे. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, यांतील मूलभूत ज्ञान समजावून सांगणाऱ्या छोट्या छोट्या पुस्तिका आमच्या विचारवंतांनी जर प्रकाशित केल्या तर त्याचा फायदा शेकडो राजकीय कार्यकर्त्यांना होईल. समाज व विचारवंत यांच्यामध्ये अधिक जवळीक निर्माण होईल. आमच्या विचारवंतांनी समाजाकडे अशा पद्धतीने जर पाहिले तर कदाचित पुढील दहा वर्षांत त्यांचा प्रभाव समाजजीवनावर वाढत जाईल अर्थात आमच्या राज्यकर्त्यांनीदेखील ज्ञानाची प्रतिष्ठा सांभाळली पाहिजे. या बाबतीत गांधीयुगाच्या आधी असलेली रानडे, गोखले, टिळक यांची परंपरा आम्ही पुन्हा पुनरुज्जीवित केली पाहिजे. येथे सुटलेला धागा आम्ही पुन्हा पकडला पाहिजे. यातूनच आजचा विचारवंत सामाजिक पुनर्रचनेच्या कार्यात महत्त्वाचा वाटा उचलू शकेल. नव्या जीवनाचे शिल्प घडवताना तोही एक शिल्पकार म्हणून आपला अल्पस्वल्प वाटा उचलील, असा विश्वास वाटतो.




२३ सप्टेंबर १९६२ ला माझ्या ब्रिगेडचे ब्रिगेड–मेजर, मेजर खरबंडा हे लुपू येथे ' G ' स्टाफ हे सांकेतिक नाव असलेल्या स्टाफसह मला येऊन मिळाले. ज्याची आवश्यकता होती, असा एक टाईपरायटरदेखील त्यांनी येताना बरोबर आणला होता. मी केलेल्या टेहळणीचा व्यापक अहवाल तयार करण्याच्या माझ्या अत्यंत आवडीच्या कामाची कल्पना मी सोडून दिलेली नव्हतीच. आणि हे काम मला स्टाफ आणि टाईपरायटरशिवाय करता येत नव्हते. माझ्या स्टाफशी आणी-बाणीच्या त्या नऊ दिवसांत माझा संपर्क तुटला होता. कारण, माझ्या स्टाफपासून मला खड्यासारखे बाजूला करण्यात आले होते.

आघाडीवरच्या परिस्थितीचा स्पष्ट आणि सत्य अहवाल लिहून काढून आपल्या लष्करी ताकदीचे चित्र G. O. C. समोर उभे करण्याचा मी निश्चय केला होता. कारण, माझी अशी कल्पना होती की आघाडीवरील परिस्थिती प्रत्यक्ष पाहून नंतरच

लेखक । **ब्रिगेडिअर जे. प्री. दळवी**

अनुवाद । **अॅडव्होकेट माधव कानिटकर**

लेखांक । **सोळा**



मी व्यक्त केलेल्या मतांचा वरचष्मा राहील आणि आपले भविष्यकालीन लष्करी धोरण ठरविण्याशी त्याचा अत्यंत महत्त्वाचा संबंध असेल. नामका-चू नदीच्या आजूबाजूच्या प्रदेशाची टेहळणी करीत असतानाच अशी विपुल माहिती मला मिळाली होती, की ज्यावरून इतकाच निष्कर्ष काढता आला असता की, 'चिन्यांना हुसकूस देणं' हे फक्त दिवास्वप्न ठरेल! पोकळ डामडौलाचा उपयोग काय ?

थागला प्रदेशात समोरासमोर आणले गेलेले चिनी सैनिक आणि भारतीय जवान यांच्यांतली लढाई निर्णायक ठरणार होती; आणि आपण हरणार आहोत हे कटुसत्य समोर दिसत होते! एकदा का नेमून दिलेल्या 'चिन्यांना हुसकून' लावण्याच्या जिकिरीच्या कामाची योजना ठरवली गेली की आपल्याला आपल्या धोरणात बरेच फेरफार करावे लागतील अशी माझी खात्री पटली होती. पण आता मात्र असे वाटते की, दिल्लीत बसून हुकूम सोडणाऱ्या राजकारणी झोंडांच्या बाबतीतला माझा अंदाज चुकलाच! ते राजकारणी की ज्यांनी आम्हांला भारत-चीन असे विषम ताकदीचे युद्ध करायला भाग पाडले. दिल्लीत त्या वेळी घेण्यात येत असलेल्या युद्धविषयक सभांची त्या वेळी मला काहीच कल्पना नव्हती.

ता. २५ सप्टेंबरला ज्या वेळी जनरल प्रसाद आघाडीवर आले, त्या वेळी त्यांनीदेखील मला हेच सांगितले की, त्यांनासुद्धा त्यांच्या हेडक्वार्टरमधून अक्षरशः घालवून देण्यात आले होते. एवढा मोठा जनरल पण त्यांनाही सांगण्यात आले होते की, 'हेलिकॉप्टरची वाट बघत न बसता लुंपूपर्यंत चालत जा!' चिन्यांना हुसकून देण्याचा जो दिवस ठरवण्यात आला होता, त्याला लष्करी सांकेतिक नाव देण्यात आले होते D-Day. चिन्यांना हुसकून देण्याची योजना आणि D-Day याशिवाय कुणाला काही सुचत नव्हते आणि म्हणूनच जनरल प्रसादना हुकूम फर्मावला गेला होता की, 'ताबडतोब नीघ.' (Move at once) किती झाले तरी प्रसाद हा भारतीय लष्करातला जनरल या मानाच्या जागेपर्यंत पोचलेला एक वरिष्ठ अधिकारी होता. निदान त्यांना तरी यापेक्षा जास्त चांगली वागणूक दिली जायला हवी इतकी त्यांची योग्यता होती. त्यांचे वय, त्यांची प्रकृती या गोष्टी लक्षात घेऊन त्यांच्या 'जनरल' या किताबाच्या दर्जाला शोभेल अशा सभ्य वागणुकीची त्यांनी अपेक्षा करणे हा त्यांचा अधिकार होता. दुसऱ्या महायुद्धानंतर त्यांना फुफ्फुसांचा रोग जडला होता. 'हेलिकॉप्टरसाठी न थांबता लुंपूपर्यंत चालत जा!' हा त्यांना दिला गेलेला हुकूम केवळ अयोग्य नव्हता तर त्यात क्रौर्य होते. हिमालय पर्वतातून प्रवास करीत असताना प्रत्येकाबरोबर संपर्क तुटल्यामुळे एकटाच इतस्ततः भटकणारा हा दुसरा कमांडर होता. ता. १३ सप्टेंबरपासून त्यांच्याशी मी एक शब्ददेखील बोलू शकलो नव्हतो. आता ही गोष्ट स्मरणपूर्वक मी एवढ्याचसाठी सांगतोय की, तुम्हांला हे कळावे की, राजकारणी लोकांनी

केलेली घाई ही लष्कराला संसर्गजन्य रोगाप्रमाणे ग्रासून टाकते आणि लष्करी अधिकाऱ्यांना साधी सभ्यता आणि शिष्टाचाराची वागणूकदेखील मग दिली जात नाही. जनरल प्रसाद यांचे लुंपू येथे झालेले आगमन काही फारसे चांगले नव्हते. जनरल चालत येतो हे दृश्य पाहवत नव्हते. एवढे करून जनरल प्रसाद यांच्या कार्यक्षमतेला मर्यादा होत्या; कारण, यापूर्वी नामका-चू नदीचा परिसर नजरेखालून घालायलादेखील त्यांना वेळ मिळाला नव्हता. त्यांच्या सल्ल्यालादेखील एक प्रकारची मर्यादाच पडली होती. मी त्यांना जे काही सांगेन ते एकतर त्यांनी स्वीकारायचे होते किंवा नाकारायचे होते.

सप्टेंबर, १९६२ ची मी केलेली चिकित्सा अत्यंत महत्त्वाची आहे. कदाचित वेगवेगळ्या मनोवृत्तीचे लोक त्यातून वेगवेगळे अर्थ काढू शकतील. जनरल कौल यांनी तर ता.५ ऑक्टोबर ते ता.१० ऑक्टोबर या कालखंडात त्यांनी केलेल्या उतावळेपणाबाबत ते कसे निष्पाप आहेत हे दाखवण्यासाठी माझ्याच या महत्त्वपूर्ण अहवालातले अनेक उतारे ' पुरावा ' म्हणून वापरले आहेत. (आणि तरीदेखील ७ व्या पायदळ तुकडीचे कमांडर जे. पी. दळवी यांनी पराभवाच्या बाबतीत एक्स्प्लनेशन दिले पाहिजे ही मागणी वर आहेच !) एवढेच नव्हे तर आपले सगळे कौशल्य वापरून त्यांनी माझ्या या उताऱ्यांचा लबाडीने असा दुरुपयोग केला आहे की, त्यावरून असे सुचवले जावे की ' काय करणार ? काही गोष्टींना अगोदरच अशी काही चालना मिळाली होती की, जनरल कौल आघाडीवर पोचण्यापूर्वीच त्या अमलात आणल्या गेल्या होत्या. जनरल कौलला फक्त बघ्याची भूमिका घेणे भाग पडले होते. कारण, त्या घडून गेलेल्या घटना ते थांबवू शकत नव्हते किंवा ठरलेल्या कार्यक्रमापासून ते मागे जाऊ शकत नव्हते. चुकीचे कार्यक्रम अमलात आणणे त्यांना भाग पाडले गेले होते ! (त्यात त्यांचा काहीच दोष नाही !) ७ व्या पायदळ तुकडीला ' पुढे जा ! नामका-चूपर्यंत पुढे जा ! ' असा आदेश देऊन ता. १० ऑक्टोबरला आपल्या जवानांचे चिन्यांशी भांडण लावून देण्यात त्यांनी जी ' भूमिका ' पार पाडली होती, त्या बाबतीत जनरल कौल एक अक्षरदेखील बोलायला तयार नाहीत. आपला व्यक्तिगत हेतू साध्य व्हावा म्हणून माझा हा महत्त्वपूर्ण अहवाल मी कसा आणि कुठल्या परिस्थितीत लिहिला याचा पूर्वेतिहास द्यायला जनरल कौल तयार नाहीत. फक्त माझ्या त्या अहवालातले उतारे उद्‌धृत करून जनरल कौल कसे निर्दोषी ठरतात, एवढेच सांगायचे हा हेतू. संदर्भ आणि पार्श्वभूमी अंधारात ! आपल्या या लिखाणातला काही भाग त्यांनी जनरल उमरावच्या माथी मारला आहे; तर काही ब्रिगेड कमांडरच्या. एके ठिकाणी तर माझ्या मूळ लिखाणातल्या परिच्छेदातल्या शब्दात थोडा बदल करून, परंतु आशय मात्र तोच ठेवून माझा मूळ परिच्छेद त्यांनीच लिहिला आहे असं भासवलंय.

ऐन लढाईच्या वेळेच्या पूर्वी आघाडीवरची ठिकाणे आणि काळ-वेळ यांसंबंधी

गुणदोषपूर्वक चर्चा न करताच लढाईची योजना आखणे निरर्थक असते, हे एक स्वयंसिद्ध तत्त्व आहे. त्यासाठी वेगळा पुरावान को ! पण याच वस्तुस्थितीकडे 'आपण लढाई का हरलो ? ' याची पक्षपाती चर्चा करणारे डोळेझाक करतात. बैल गेला आणि झोपा केला अशी स्थिती ! आघाडीवर वस्तुस्थिती काय होती हे लक्षात न घेताच त्या वेळी कमांडरने अमुक एक हालचाल का केली, याची किंमत करायला बसणे हा शुद्ध मूर्खपणा आहे. कमांडर हा कमांडर असतो ! आणि त्याने ती हालचाल का केली अशी निष्फळ चर्चा करणाऱ्याला स्वतः ते कमांडर झाल्याशिवाय कळायचे नाही. थागला प्रकरणात हेच घडले. राजकीय दडपणामुळे तिथल्या वस्तुस्थितीचा कुणी विचारच करत नव्हते. कारण, वरिष्ठ लष्करी अधिकारीच भारत सरकारपुढे नमते घेणारे. चुकीच्या हुकमांपासून लष्कर वाचवण्याऐवजी काही जनरल हाच, जे हुकूम अमलात आणणे केवळ अशक्य होते ते, हुकूम ' ताबडतोब अमलात आणा ' अशी पराणी ' खालच्यांना ' टोचणार ! आता हेच पाहा ना. जनरल सेन यांनी जनरल उमरावना अधिकारवाणीने सांगितले की, ' भारत सरकारने चिन्यांना हुसकून देण्याचा निर्णय ' (' Decision ') घेतला आहे आणि हे काम काहीही करून कुठल्याही परिस्थितीत पार पाडलेच पाहिजे. (Had to be completed) जनरल उमराव या हुकमाला विरोध करूच शकत नव्हते. जनरल उमरावनी जनरल प्रसादना सांगितले की, चिन्यांना कसे हुसकून द्यायचे याची योजना तयार करा. जनरल प्रसादनी मला सांगितले की, परिस्थितीचा नीट विचार करून ' चिन्यांना हुसकून द्या ! ' या हुकमाची अंमलबजावणी कशी करता येईल या बाबतीतल्या योजनेचा आराखडा तयार कर. भारत सरकारचा हुकूम चुकीचा असून आपले साध्य असाध्य आहे, हे ठाऊक असून दिल्लीतला एकही मायेचा पूत ते स्पष्टपणे कबूल करण्याची हिंमत दाखवीत नव्हता.

शिस्तबद्ध लष्करातले फील्ड कमांडर्स हे हुकमाची बेअदबी कधीही करीत नसतात. हुकमाची अंमलबजावणी करण्यासाठी ते भगीरथ प्रयत्नांची पराकाष्ठा करतात. ज्या दिवशी लष्करातल्या व्यक्तीच राजरोसपणे किंवा गुप्तपणे हुकूम पायदळी तुडवण्याचा प्रयत्न करतील त्यासारखा दुसरा वाईट दिवस नाही. अर्थात इथे ' हुकूम ' या शब्दाचा अर्थ लष्करी दृष्ट्या योग्य आणि बरोबर असलेला हुकूम असा घ्यायचाय. कारण, चुकीचा आणि नुकसानकारक हुकूम ठोकरलाच पाहिजे हे पटवण्यासाठीच मी तसं लिहिलंय. कुठलाही हुकूम आल्याबरोबर लष्करी अधिकाऱ्याचे हे कर्तव्य असते, की वस्तुस्थितीची साद्यंत आणि खरी हकीकत त्यांनी वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांना कळवून त्यांचे अखेरचे निर्णायक मत घ्यायचे असते. आणि अशा ' खालून ' ' वर ' आलेल्या माहितीचा अभ्यास करून वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांनी प्राप्त परिस्थितीत काय करायला पाहिजे या बाबतीत सरकारला सल्ला द्यायचा असतो. ज्या वेळी युद्ध असे प्रत्यक्ष चालू झालेले नसते आणि राजकीय

दडपणाखाली लढण्याचा हुकूम दिला गेलेला असतो, त्या वेळी तर या गोष्टी फारच महत्त्वाच्या असतात. कारण, आघाडीवरच्या कमांडर्सना कुठलाही–लक्षात ठेवा कुठलाही हुकूम, मग तो चुकीचा असो किंवा बरोबर असो–हुकूम मोडण्याची अनुज्ञा नसते.

सर्वसामान्य वाचकाला आघाडीवरच्या परिस्थितीचे मूल्यमापन कसे करतात, हे समजावे म्हणून काही गोष्टी इथे स्पष्ट करतो. कमांडरवर सोपवलेली कामगिरी ही मूल्यमापन करण्याचा पाया असते! आणि शत्रूवर हल्ला कसा करायचा, याची योजना कमांडर फक्त आपल्या स्वतःच्या इच्छेने ठरवीत नसतो. 'हे निर्णय फक्त सरकारने घ्यायचे असतात,' असे श्री. व्ही. के. कृष्णमेनन म्हणतात, ते एका अर्थी बरोबर आहे. माझे पण तेच म्हणणे आहे. फक्त सरकारने हे निर्णय पद्धतशीर-रित्या, वस्तुस्थिती समजावून घेऊन आणि बरोबर घ्यायचे असतात, एवढेच माझे मेननसाहेबांना सांगणे आहे.

जनरल प्रसाद, जी. ओ. सी. 4th Division यांच्यावर सोपवलेली कामगिरी पुढीलप्रमाणे होती :–

१. नामका-चू नदीच्या उत्तरेकडील तीरावरून चिन्यांना हुसकून दे!

२. थागला प्रदेशाचे संरक्षण कर.

३. सांगले (Tsangle) या ठिकाणावर लक्ष ठेवून गस्त घाल.

वस्तुतः, हा हुकूम म्हणजे चीफने यापूर्वीच दिलेले इशारे होते, जे अनिर्णित अंदाजामुळे वेळोवेळी तहकूब केले गेले होते. आघाडीवरची परिस्थिती दिवसेंदिवस बदलत जात असूनदेखील 'चिन्यांना हुसकून द्या!' या उद्दिष्टांपासून एक इंचदेखील मागे हटायला भारत सरकार तयार नव्हते. चिन्यांना हुसकून देण्याची कामगिरी हाताखालच्या लोकांवर सोपवून जनरल थापर हात झाडून मोकळे झाले होते. आता जे काही घडेल त्याची जबाबदारी झटकून टाकायला ते मोकळे होते; कारण, चिन्यांना हुसकून देण्याचा लेखी हुकूम राजकारणी लोकनियुक्त प्रतिनिधींनी त्यांना दिला होता आणि तो हुकूम अंमलात आणण्याची कामगिरी त्यांनी संबंधित 'खालच्या' लष्करी अधिकाऱ्यांवर सोपवून दिली होती. आता चिनी दिल्लीपर्यंत आले तरी त्याला थापर जबाबदार नव्हते! अशी परिस्थिती असल्यामुळेच भारत सरकारच्या या 'हुकमा'वर त्यांनी लष्करीदृष्टया विचार करून त्या हुकमाचे मूल्यमापन केले नव्हते.

जवानांना एखादी कामगिरी पार पाडायला सांगण्यापूर्वी परिस्थिती कशी काय आहे; आपण हे काम साध्य करून घेऊ शकू का, याचा अभ्यास करणे एवढी कमीतकमी अपेक्षा वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांकडून असते. चांगला कमांडर त्याची कामगिरी पार पाडण्याची शर्थ करीत असतोच. जनरल या हुद्द्यावरच्या व्यक्तीची मुख्य जबाबदारी ही असते.

'मला मिळालेला हुकूम मी दुसऱ्यापर्यंत पोचवला,' असे जर का जनरल म्हणायला लागला तर जनरल आणि पोस्टमन यांच्यात फरक तो काय राहिला? जनरल थापर आणि जनरल सेन यांनी या आवश्यक बाबीकडे दुर्लक्ष केले.

आणखी एक मुद्दा लक्षात घ्या की, आघाडीवरच्या परिस्थितीचा लेखी अहवाल हा त्या वेळच्या विशिष्ट परिस्थितीवर अवलंबून असतो. परिस्थिती दिवसेंदिवस बदलणारी असेल तर एकच एक अहवालावर अवलंबून राहणे लष्करीदृष्ट्या धोक्याचे असते. आता हेच पाहा की, ता. २२ सप्टेंबरला जनरल थापर यांच्या अंदाजाप्रमाणे थाग ला प्रदेशात चिन्यांची ताकद फक्त एका बटालियनची होती. याच एकमेव बटालियनला हुसकून देण्याचा हुकूम त्यांनी खालच्या लष्करी अधिकाऱ्यांना दिला होता. पण या हुसकून देण्याच्या कामाचे प्रमुख सूत्रधार म्हणून जनरल कौल यांची नेमणूक झाली. तोपर्यंत ता. ५ ऑक्टोबर उजाडला होता. ता. २२ सप्टेंबर ते ता. ५ ऑक्टोबर या अवध्या १४ दिवसांत चिन्यांची त्या प्रदेशातली ताकद एक ब्रिग्रेडची झाली होती. म्हणजे ता. २२ सप्टेंबरचा आघाडीवरच्या परिस्थितीचा अहवाल ता. ५ ऑक्टोबरला टाकाऊ आणि कुचकामी ठरणार होता. तिथे घडत असलेल्या घटनांनी आपल्या योजना आणि आशाआकांक्षांना अशा तऱ्हेने जबरदस्त तडे जात होते. चिन्यांची एक ब्रिगेड, तर त्यांना तोंड द्यायला आपली पण एक ब्रिगेड असे म्हणून आपली एक ब्रिगेड पुढे नेण्यात धोका होता. लढाई म्हणजे लिलाव करण्याची जागा नव्हे; कारण, दारूगोळा जवळ नसताना, संपर्क साधण्याची व्यवस्था नीट नसताना आणि इतर आवश्यक ती तयारी नसताना आपल्या एकच नव्हे तर दोन ब्रिगेडस्‌चादेखील चिनी धुव्वा उडवू शकले असते. त्यांची फक्त ब्रिगेड नव्हती तर ती युद्धसज्ज, तय्यार ब्रिगेड होती!

आपल्या वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांनी एक तर चिन्यांना हुसकून देण्याचा अफलातून हुकूम मागे घ्यायला हवा होता आणि तो अंमलात आणायचाच होता तर 'चिन्यांची बटालियन', 'चिन्यांची ब्रिगेड' या शब्दजंजाळात न सापडता आपली 'ताकद' त्यांच्याशी तुल्यबल (military balance) कशी होईल, याचा विचार करायला हवा होता. आपले जवान संख्येने किती आहेत, हे जसे महत्त्वाचे होते त्याचप्रमाणे ते कशा परिस्थितीत कुठे आहेत, हे पाहणेही अत्यंत महत्त्वाचे होते! नीट बातमी मिळवून चिन्यांची संख्या किती आहे? त्यांचे हेतू काय आहेत? त्यांची ताकद किती आहे? त्यांनी सैन्याची रचना कशी केलेली आहे? त्यांच्याजवळ दारूगोळा किती आहे? याचा अंदाजदेखील जनरल थापरना नव्हता. हेतू साध्य करून घेण्यापूर्वी नीट विचार करावा लागतो. लष्करीदृष्ट्या महत्त्वाची असलेली माहिती न मिळवताच आघाडीचा अंदाज घेता येणे शक्य नसते. नेमून दिलेली कामगिरी पार पाडण्यातदेखील कमांडरला काही मर्यादा असतात. त्या मर्यादेपलीकडे तो काही हालचाल करूच शकत नाही. 'वरून' काहीच खबर नसताना

कमांडर फक्त समोर जे पाहील, त्याला जे दिसेल आणि तिथल्या 'खबऱ्या'कडून जे काही कळेल त्यावर अवलंबून राहून काम करीत असतो. लढाई ही अशी कधीच करीत नाहीत. वरच्या अधिकाऱ्यांनी आघाडीवरच्या कमांडरला शत्रूची साद्यंत माहिती पुरवायची असते. म्हणजे मग तो कमांडर आघाडीवर चांगला लढू शकतो. आणि अशी माहिती मिळवून आपले वरिष्ठ अधिकारी योग्य तो निर्णय घेऊ शकले नाहीत, हा जनरल थापर यांनी तो हुकूम दिला नव्हता तर फक्त मिळवला होता याचा हा ढळढळीत पुरावा आहे.

आघाडीवरच्या परिस्थितीचा अंदाज घेण्याचा गुणदोषदर्शक अहवाल म्हणजे फक्त सेनापतीच्या हुकमाला दिला गेलेला होकार होता. त्यामध्ये स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचे स्पष्ट निर्णय कुणीच दिले नाहीत. G. O. C. 4 th डिव्हिजन आणि ७ व्या ब्रिगेडचे कमांडर म्हणजे मी त्याच बिकट अवस्थेत होतो की जिचे वर्णन जनरल वूल्फ (Gen. Wolfe) ने असे केले आहे की, "प्राप्त परिस्थितीत अडचणी इतक्या अनंत आहेत की, त्या कुठल्या आहेत हे जर मी स्वतःच सांगत बसलो तर नुकसान माझेच होईल!"

चिन्यांना हुसकून देणे केवळ अशक्य आहे हें आघाडीवरच्या कमांडर्सना ठाऊक होते. ते कुठल्याही मोहजालात गुरफटलेले नव्हते. चिन्यांची बटालियन हाताळण्याचा प्रश्न म्हणजे सा ऽ ऽ धी योजना अशी होती की, जसे सर्वसामान्य लोकांच्या जमावाला पोलिस हटवतात तसे चिन्यांना हटवायचे. चिन्यांची ताकद अजमवायची! आघाडीवरच्या प्रत्यक्ष परिस्थितीच्या अहवालाबाबत G. O. C. नी माझ्याकडून मागितलेल्या साहाय्याबाबत माझी पहिली प्रतिक्रिया अशी होती की, आपणही अहवाल लिहिण्याची विनंती साफ नाकारावी. कारण, हा माझा अहवाल दिल्लीपर्यंत पोचणार होता! आघाडीवरची परिस्थिती दिवसेंदिवस बदलत होती आणि एखाद्या विशिष्ट दिवशीचे मी केलेले लेखी वर्णन साफ चुकीचे ठरण्याची शक्यता होती. आणि म्हणूनच मी फार संतापलो! इकडे आड तिकडे विहीर. जनरल प्रसाद यांच्याबरोबर माझी शाब्दिक चकमक उडाली. आधीच मी चिडलो होतो, माझा तोल सुटला. मी म्हणालो, "सेनापतीचा हुकूम असो नाहीतर आणखीन कुणाचा असो. आपल्याला प्राप्त परिस्थितीत चिन्यांना हुसकून देता येणं शक्यं नाही!" कारण, ते आपोआपच स्पष्ट होत होते. त्यासाठी प्रसंगोचित वस्तुस्थितीचा, आपल्या जवानांपुढे असलेल्या उपायांचा, शत्रूपुढे असलेल्या उपायांचा, एखादी विशिष्ट योजना आपण का आखली हे स्पष्ट करण्याचा अभ्यास करण्याची तालीम करण्याची जरूर नव्हती. अरे, माणसाला अपघात झाला, त्याचे हात, पाय आणि मान तुटली! आता तो कसा जगेल? याचा अहवाल काय बोडक्याचा लिहायचा? तो मरणार हे सांगायला 'कमांडर' कशाला पाहिजे? एकूण परिस्थती काय आहे या बाबतीतली माझी मते मी G. O. C. ना अगोदरच तोंडी कळवली होती आणि

तीच परिस्थती माझ्या अहवालात वर्णन करून लिहून काढली. फक्त माझी मते त्यातून वजा केली. वस्तुस्थिती इतकी स्पष्ट दिसत होती की, १५,००० फूट उंचीवरच्या विस्तीर्ण प्रदेशाचे संरक्षण करण्यासाठी चिन्यांविरुद्ध लष्करी कारवाई करणे आणि त्यांना 'हुसकून द्या !' असे म्हणणे म्हणजे शुद्ध मूर्खपणा होता ! काय घाई होती एवढी ? करता आले असते ते एवढेच की जरा हवामान बदलू दे. हवामान आपल्याला अनुकूल होईल तेव्हाच केमाँग फ्रॉंटियर डिव्हिजनमधल्या आपल्या तुकड्या चिन्यांवर सोडू. नाहीतर प्रतिकूल हवामानामुळे आपल्याच तुकड्या अडकून पडतील. माझ्या या अहवालामुळे G. O. C. कधी नव्हे अशा अनिष्ट पेचात पडले. त्यांच्यापुढे फक्त दोनच मार्ग मोकळे होते ! एक तर माझा अहवाल जशाच्या तशा स्वरूपात वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांना द्यायचे नाकारून त्यांच्यापुढे सत्य परिस्थिती उघडी करणे किंवा माझ्या अहवालाला मर्यादा घालून त्यात थोडेफार फेरफार करून तो वरिष्ठ अधिकाऱ्यांना मानण्यास भाग पाडणे. प्राप्त परिस्थितीत पहिल्या मार्गाने ते जाऊ शकत नव्हते. अजूनही चीन आणि भारत यांनी युद्ध घोषित केले नव्हते. पहिला मार्ग त्यांनी पत्करणे म्हणजे हा अहवाल म्हणजे कागदी घोडी नाचवण्यासारखे होते. वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांनी कदाचित माझा हा सडेतोड अहवाल राजकीय दडपणामुळे माझ्यावर 'नामर्द,' 'भ्याड' (!) किंवा 'अत्यंत वाईट' असे शेरे मारून तो फेकून दिला असता. आणि दुसरी भीती अशी होती की, मार्शल जॉफ्रे (Joffre) म्हणतो त्याप्रमाणे, "जनरलने फक्त हुकूम पाळायचा असतो. ते त्याचे कर्तव्य असते. 'असा हुकूम का दिलात ?' हे त्याने विचारायचे नसते आणि सेनापतीने फक्त जनरलला हुकूम द्यायचा असतो ! ज्यांनी सैन्यात काही वर्षे घालवली आहेत, त्यांनाच फक्त माझ्या भावना कळतील. जनरल प्रसाद यांनी दुसऱ्या मार्गाने जाणे पसंत केले. त्यांनी मला सांगितले की, इतके कडक लिहू नकोस. 'न ब्रूयात सत्यं अप्रियम्' फक्त एक असा साधा मसुदा तयार कर, की ज्यात आपल्या जवानांच्या निर्वाहाचा आणि एकूण व्यवस्थेच्या प्रश्नांचा उल्लेख असेल आणि चिन्यांच्या व आपल्या दारूगोळ्यातल्या विषमतेची कल्पना येईल. तरच दिल्लीत बसून योजना आखणाऱ्यांना जरा शहापणा येईल. त्यांची कल्पना अशी होती, एवढेच फक्त स्पष्ट व्हावे की लढाई झाली नाही तरीदेखील थागला रीज आणि नामका–चू नदीच्या खोऱ्यांच्या परिसरात आपल्या जवानांना पोसणे – नुसते पोसणे – देखील कठीण आहे ! 'चिन्यांना हुसकून द्या !' हा हुकूम अंमलात आणला जाईल. पण कसा ? चिनी आपणहून तो प्रदेश सोडून चिनी हद्दीत परत निघून गेले तर ! एरव्ही ते कठीणच आहे. माझ्या अहवालामुळे जनरल प्रसादांची परिस्थिती बिकट झाली तर त्यांच्या या निर्णयामुळे माझी परिस्थिती बिकट झाली. मीच मला अडचणीत आणले ! कसे ? एका फ्रेंच जनरलने असे म्हटले आहे की, 'मी त्यांच्याशी कसा वाद घालू ? माझ्या खांद्यावर फक्त दोन स्टार पण त्यांच्या खांद्यावर तीन

आहेत !' मी फक्त कमांडर तर ते जनरल ! अहवाल माझा पण निर्णय त्यांचा !

थोडक्यात सांगायचे तर नामका-चूजवळची दरी अत्यंत अरुंद आणि खडबडीत होती. घनदाट वृक्षाच्छादित उभे कडे आणि तसेच भयानक उतार ! नामका-चू नदी ता. २० सप्टेंबरला जोराने वाहत होती. त्याच दिवशी नेमकी ती नदी म्हणजे आपल्याला अडचण होती ! (म्हणूनच तर त्याच दिवशी एका चिन्याने पलीकडून भारतीय हद्दीत ग्रेनेड फेकली !) लष्करी डावपेचाची व्यूहरचना तिथे करता येणे शक्यच नव्हते. तिथला प्रदेश हा महत्त्वाचा मुद्दा होता. कारण, थागला प्रदेशातले उतार पश्चिमेकडून पूर्वेकडे असे घसरत जातात. आणि पूर्वेकडून पश्चिमेकडे वर चढत जाण्याचा धोका पत्करणे म्हणजे मरणाला आमंत्रणच ! किंम्बहुना ते थागला ह्या रस्त्यात अनेक दुर्लंघ्य उभे कडे होते. पायदळ तुकड्यांनादेखील ते ओलांडून जाणे शक्यच नव्हते. दक्षिणेकडून उत्तरेकडे जाणाऱ्या मधल्या मार्गात चिनी काट्यासारखे उभे होते. Paitsai या ठिकाणी त्यांचे प्राबल्य होते आणि हे ठिकाण या मार्गात येत होते. चिन्यांच्या त्या ठिकाणच्या अस्तित्वामुळे थागला प्रदेशाचे दोन भाग पडले होते. पुढे जाणाऱ्या पायदळ तुकड्यांवर चिन्यांकडून या ठिकाणी वाटेतच तुफानी उलट गोळीबार होण्याची शक्यता होती आणि त्यांना जबाब देण्याइतपत दारूगोळा आपल्या जवानांजवळ नव्हता. आपल्याला पुढे जाण्यासाठी लष्करी दृष्ट्या योग्य असा एकमेव मार्ग सांगले (Tsangle) वरून होता. आणि चिन्यांना हे ठाऊक होते. चिन्यांचे आपण शत्रू होतो आणि शत्रू कुठून कसा पुढे येऊ शकेल याचा अंदाज आणि हिशेब लढाईपूर्वीच तज्ज्ञ लष्करी अधिकारी करून ठेवत असतात. चिन्यांना आपण दिसू नये आणि त्यांची आपली वाटेतच चकमक होऊ नये अशा कार्पोला खिंडीवरून जाणाऱ्या रस्त्याने पुढे सरकणेच शहाणपणाचे होते. कारण, हाथुंगला मार्ग पूल क्रमांक १ ते ४ जवळ चिन्यांसमोरूनच जात होता. नामका-चू दरीतून पुढे सरकण्यासाठी सरळ मार्गच नाही, हे त्या वेळी मला ठाऊक नव्हते. आपली नाकेबंदी करून टाकणारी चिन्यांची तटबंदी चुकवण्यासाठी सांगधर (Tsangdhar) या ठिकाणी त्यांना हुलकावणी देणे भाग होते. चिन्यांची आणि आपली तुलनात्मक ताकद आणि जलद गतीने पुढे जाण्याची आपली शक्ती या गोष्टी महत्त्वाच्या होत्या. आपण असा अंदाज (मूर्खासारखा ?) धरून चाललो होतो की, त्या ठिकाणी एक बटालियनपेक्षा जास्त सैन्य चिनी आणणारच नाहीत.

नामका-चूजवळ जास्तीतजास्त सैन्य जमा करण्याची शर्यत आपण हरणार आहोत आणि चिनी सैन्य एक बटालियनपेक्षा कितीतरी पटीने आणि केव्हाही जास्त येऊ शकेल याचा आपल्याला अंदाज नव्हता. थागला रीज प्रदेशात पुढे जाण्यापूर्वी आवश्यक तो तोफखाना आपल्या सैन्याला पुरवला गेला पाहिजे असे खरे म्हणजे ठरलेले होते. पॅरेफिल्ड बंदुकांखेरीज दुसऱ्या कुठल्याही प्रकारचा तोफखाना

आपण तिथे नेऊ शकणार नाही, हे आपल्याला ठाऊक होते. वेळ आणि अंतर या गोष्टी मी विस्ताराने सांगितल्या होत्या. कारण, दिल्लीत योजना आखणाऱ्यांचा त्यावर विश्वास बसला नव्हता. पायदळ तुकड्या आघाडीपर्यंत पोचायला फक्त दहा दिवस पुरतील असे 'दिल्लीकर' समजत होते. ऑक्टोबरच्या शेवटी शेवटी तिथे बर्फ पडायला लागलेले असते. आघाडीवरच्या जवानांची खाण्यापिण्याची तरतूद करून ठेवू शकणारे साठे त्यापूर्वीच करून ठेवायला हवे होते. नाहीतर एप्रिल, १९६३ पर्यंत आपल्याला म्हणण्यासारखी अशी काहीच हालचाल करता आली नसती. सुरक्षितता आणि चिन्यांशी आकस्मिकरीत्या गाठ पाडण्याची शक्यता याचा विचार करणे आवश्यक होते. नामका-चू नदीच्या उत्तरेकडील तीराच्या पलीकडे-विशेषतः पश्चिमेकडे-फक्त टेहळणीसाठी, सोपे मार्ग आणि नदी पार करण्याची ठिकाणे हेरण्यासाठी एवढीच 'हालचाल' करणे इष्ट होते. अनोळखी प्रदेशात आणि बेरकी शत्रूपुढे जास्त तुकड्या पाठवण्यापूर्वी अशी टेहळणी अत्यंत आवश्यक होती. चिन्यांना उल्लू बनवण्यासाठी ज्या युक्त्या कराव्या लागल्या असत्या त्यासाठी आवश्यक तेवढ्या तुकड्या आपल्याजवळ नव्हत्या. होते तेच जवान द्रविडी प्राणायाम करून पुढे न्यायचे होते. जनरल कौल यांच्या हाती सूत्रे जाण्यापूर्वी सुरक्षिततेला महत्व दिले जात होते. आपले गस्त घालण्याचे काम ता. २९ सप्टेंबरपासून सुरू झाले होते; आणि सांगले (Tsangle) या ठिकाणची टेहळणी अगोदर व्हायला हवी होती.

या टेहळणीची पहिली खबर दिल्लीला पोचल्याबरोबर काहीही कारण न दाखवताच 'सांगले हे ठिकाण सोडू नकोस' असा मला हुकूम मिळाला. जनरल उमराव यांनी या हुकमाचा तीव्र निषेध केला. त्यांच्या मते सांगले हे ठिकाण लष्करी डावपेचाच्या दृष्टीने तिथे तुकड्या नेणे म्हणजे आपल्या युक्त्या आपणच चिन्यांना उघड करून सांगण्यासारखे होते; पण जनरल उमरावांचे ऐकतो कोण? दुर्दैवाने चिनी लवकरच जागे झाले आणि आपल्या ताब्यात असलेल्या टेकडीचा कब्जा घेण्यासाठी त्यांनी अगोदर सैन्य पाठवले. आता ती टेकडी म्हणजे आपल्या मार्गातली धोंड होऊन बसली! आता तिथल्या चिन्यांना तोंड दिल्याशिवाय पुढे जाता येणे शक्य नव्हते. तिथेच एकतर चिन्यांनी आपला रस्ता अडवला असता किंवा लढाई झाली असती आणि पुढे तेच घडले. या शिवाय जखमी जवानांना हेलिकॉप्टरने हलवण्याची सोय करणे, सांगधर (Tsangdhar) ते सांगले (Tsangle) आणि तिथून पुढे सामान नेण्यासाठी हमालांची सोय करणे, पुढे जाण्यापूर्वी आपले जवान सुसज्ज आहेत की नाहीत हे पाहणे, तिथल्या हवामानाची जवानांना सवय होणे या अडचणींचा विचार करणे आवश्यक होते. उरलेली ब्रिगेड नामका-चू दरीपर्यंत पुढे पाठवण्यापूर्वी जवानांना कमीतकमी तीस दिवस पुरेल इतक्या अन्नाचा सांठा सांगधरला केला जाईल, असे ठरले होते. पुढे हा

रेशनचा कोटा कमी करण्यात येऊन फक्त सात दिवस पुरेल इतपत अन्न खाली टाकले जावे असे ठरले. आधीच अडचणी आणि त्या दूर करण्याच्या मार्गात 'जर', 'तर', 'पण', 'परंतु' या शब्दांची अडचण! हे सगळे जर–तर दूर झाले असते तरच फारफार तर खालीलप्रमाणे मर्यादित कामगिरी पार पाडता आली असती.

(१) पूल क्रमांक ५ पासून नामका–चू नदीच्या खोऱ्याच्या दक्षिण टोकापर्यंत पुढे धडक मारायची.

-(२) ही हालचाल तीन टप्प्यांनी करायची, लुंपू ते सांगधर, सांगधर ते मुकसर (Myksar), आणि मुकसर ते सेग–जाँग (Tseng Jong).

त्यानंतरची कामगिरी चिन्यांच्या प्रतिहल्ल्यांवर अवलंबून होती. लुंपूमध्ये बसून त्याच्यापुढे कसे जायचे हे ठरवण्यात अर्थ नव्हता. चिनी आपल्यावर प्रतिहल्ला करण्यासाठी कशी हालचाल करतात यावर ते अवलंबून होते. सेग–जाँग (Tseng Jong) पासून प्रत्यक्ष चिन्यांवर कशी धडक मारायची हेच फक्त आपले पुढचे काम होते.

ही योजनादेखील खरे म्हणजे लष्करी दृष्टचा बरोबर नव्हती; कारण, या योजनेत या कामगिरीबद्दल चिनी आपला कसा आणि कुठे बदला घेतील याचा उल्लेख नव्हता. या कामगिरीचे स्वरूप पुष्कळसे असे होते की, आली पोलिसांची गाडी आणि पळाले दंगलखोर लोक. पण दंगल फार पेटली तर पोलिसांची गाडी आली तरीदेखील काही उपयोग होत नाही. गुंडच पोलीस व्हॅन पेटवून देतात. हे धोरण इतके कडक नव्हते की जे चिन्यांना बंद पाडता आलेच नसते. बरोबरीच्या इतर तुकडयांबरोबर एकत्र काम करण्याची शक्यता फार कमी होती. फक्त एकाच तुकडीने एकटीने करायची ही हालचाल कदाचित आयत्यावेळी बदलली गेली असती. लांबणीवर टाकली गेली असती किंवा रद्द केली गेली असती.

माझा अहवाल म्हणजे भारत सरकारने 'चिन्यांना हुसकून द्या!' या ऐटीत दिलेल्या हुकमामुळे निर्माण झालेल्या लष्करी प्रश्नांचे शेवटचे प्रदर्शन होते. अहवालाच्या तारखेपर्यंत एका सिनियर कमांडरने आघाडीवरील परिस्थिती पाहून काढलेले निष्कर्ष त्यात होते. ही कामगिरी माझी एकटयांची नव्हती. कोअर कमांडर, डिव्हिजनल कमांडर आणि बिगेड यांनी एकमताने केलेली ती संयुक्त कामगिरी होती. तरी देखील या अहवालाकडे दुर्लक्ष करण्यात आले आणि आवश्यक त्या गरजा भागवण्यात आल्या नाहीत. सरकारने डोंगर पोखरून उंदीर काढला! या अहवालातल्या अडचणीकडे कानाडोळा करून सरकारने फक्त एवढेच पाहिले की याच्यात चिन्यांना हुसकून देण्याची योजना आहे की नाही? असेल तर ठीकच आहे. कारण, काहीही करून 'चिन्यांना हुसकून द्या!' जो अहवाल तयार करायला एक महिना लागला होता, ज्याच्यात सरकारवर कडक टीका केली गेली होती आणि म्हणूनच जो भारत सरकारने गाडून टाकला होता तो जनरल कौलनी

उकरून काढला. कशासाठी ? ७व्या पायदळ तुकडीच्या दारुण पराभवाला ते स्वत: कसे जबाबदार नाहीत हे दाखवण्यासाठी !

ता. २६ सप्टेंबरला माझ्या मूळ अहवालात थोडेफार फेरबदल करून आणि काही नवीन परिच्छेद मिळवून असलेल्या अहवालाबाबत थोडीफार माझ्याशी चर्चा करून जनरल प्रसाद यांनी अखेर माझ्या त्या अहवालाला मान्यता दिली. जनरल प्रसादनी जनरल उमरावबरोबर माझ्या अहवालाबाबत स्वतंत्र चर्चा केली. जनरल उमराव ता. २६ सप्टेंबरला लुंपू येथे आले होते. माझ्या मूळ अहवालाला जनरल उमरावनीदेखील हरकत घेतली. ते म्हणाले, ' हे फार झालं ! भलतीच महत्त्वाकांक्षा बाळगण्यात अर्थ नाही ! ' त्यांनी पुढे सांगितले की, ' बाकीचं जाऊ द्या ! फक्त दारूगोळ्याची जास्त मागणी करा आणि 'जवानांची व्यवस्था नीट ठेवा,' एवढीच मागणी करा.' जनरल उमराव पुढे असेही म्हणाले की, ' आपण काही ' तारखा ' ठरवतो हे ठीक नव्हे ! लढाईत तारखा पुढे-मागे होऊ शकतात. लढाई म्हणजे काय कोर्ट आहे, की अगदी त्या ' तारखेला 'च ते काम झाले पाहिजे ? मात्र फेर-बदल केला गेलेला मसुदा त्यांनी मंजूर केला. सोळा दिवसांत दुसऱ्यांदा जनरल उमरावनी योग्य तो उपदेश केला होता. चीनबरोबरच्या लढाईत काय काय अड-चणी येतील हे जनरल सेनना कळविण्यासाठी जनरल उमराव ता. २९ सप्टेंबरला लखनौला रवाना झाले. त्यांनी जाण्यापूर्वी आम्हांला असे आश्वासन दिले की, ' चिन्यांच्या गुहे 'त आपले जवान पाठविण्यापूर्वी कमीत कमी काय तयारी तुम्ही करू शकाल ? हे मला सांगा असा, मी जनरल सेनजवळ आग्रह धरीन. जर शक्य झालं तरच ता. १ एप्रिल १९६३ पूर्वी (बहुतेक ते शक्य होणार नाहीच.) प्रचंड तयारी केल्याशिवाय ' चिन्यांना हुसकून ' देता येणे शक्य नाही याबद्दल ते जनरल सेन यांची खात्री पटवतील, असेही जनरल उमराव म्हणाले होते ! जनरल उम-रावनी निघताना आम्हांला सांगितले की, ' माझ्या या आघाडीवरच्या भेटीपासून फारशी अपेक्षा बाळगू नका. कारण, आता प्रत्येकजण ' D–Day ' साठी (चिन्यांना हुसकून द्या ! ) उतावीळ झालेला आहे. त्यांच्या ब्रिगेडिअर–जनरलच्या हातात आता फक्त वस्तुस्थिती आणि ' तारखा ' शिल्लक होत्या.

जनरल उमराव यांनी असा सक्त हुकूम दिला होता की, सांगधर या ठिकाणी ' पुढे गेलेल्या ' जवानांना पुरेल इतपत अन्नाचा साठा होईपर्यंत आणखी पायदळ तुकड्या लुंपूच्या पुढे पाठवू नका. जाता जाता ते आम्हांला म्हणाले की, ' अच्छा ! गुड – बाय ऽ ! मला जमेल त्या क्षणी मी आघाडीवर पुन्हा येईनच !'

विमान सुटण्यापूर्वी जनरल उमरावनी राजपूत आणि गुरखा पलटणीच्या कमांडिंग ऑफिसर्सना मुद्दाम बोलावून घेतले आणि त्यांना ते म्हणाले, ' सांभाळ ! मी चाललोय ! बहुतेक लवकरच परत येईन !' याच कमांडिंग ऑफिसर्सच्या शब्दांत या प्रसंगाचे वर्णन असे होते की, जनरल उमराव यांनी जेव्हा आम्हांला

निरोप दिला त्या क्षणी आम्हांला असं वाटलं की, रणांगणावर जाऊन जिवाची पर्वा न करता लढणाऱ्या दोन निष्णात योद्धयांचा ते शेवटचाच निरोप घेत होते. कारण, आम्ही एकदा का पुढे गेलो की, पुन्हा जिवंत परत येणार नाही हे आम्हांला ठाऊक होते! आम्ही त्यांना वचन दिले की, 'जी कामगिरी आमच्यावर सोपविलीय ती पार पाडण्यासाठी आम्ही जिवाचं रान करू!' आम्ही अशी इच्छा व्यक्त केली की, 'आपल्या जवानांना यश मिळो! पण कमीत कमी आणखी थोडी शस्त्रास्त्रं, थोडे गरम कपडे आणि थोडा दारूगोळा आमच्या हातात द्या! मग बघा काय होतं ते!'

लखनौला प्रत्यक्ष काय घडले ते मला ठाऊक नाही. पण मला इतके ठाऊक आहे – खात्रीने ठाऊक आहे – की जनरल उमरावनी ता. ३० सप्टेंबरला आर्मी कमांडरला प्राप्त परिस्थिती आणि मिळणारे हुकूम या बाबतींत लेखी निषेध प्रदर्शित केला. असेही घडले असण्याची शक्यता आहे की, जनरल उमराव, जनरल सेन यांचे 'तुमच्यापेक्षा वरिष्ठ असलेल्या अधिकाऱ्यांना अजून तरी काही विचार करायला सांगा!' असे हृदयपरिवर्तन घडवून आणण्यात असमर्थ ठरले असतील. मग काय उरले? 'मला हे हुकूम मान्य नव्हते!' असे रेकॉर्ड वर ठेवून कदाचित जनरल उमराव यांना ते हुकूम पाळणे भाग पडले असेल. जनरल उमराव दोन्हीकडून खलास झाले! त्यांना हुकूम पाळणारा कुत्राही बनायचे नव्हते की हुकूम ठोकरून देणारा सिंहही बनायचे नव्हते!

अशा तऱ्हेने सप्टेंबरच्या शेवटी शेवटी दिल्लीत बसून हुकूम सोडणारे आणि आघाडीवरचे कमांडर्स यांच्यांतले मतभेद स्पष्ट झाले. 'चिन्यांना हुसकून द्या!' हा क्रूर निर्णय अमलात आणण्याचा प्रश्न सोडवण्याचा आता एकमेव मार्ग शिल्लक होता की, जोरदार आणि जहाल हालचाली करा. भारत सरकारची आता अशी पॉलिसी होती की, जो कमांडर ही जबाबदारी स्वीकारायचे नाकारील त्याला आघाडीवरून बदली करून त्याच्या ठिकाणी दुसरा कमांडर आणायचा! कोण आणि कुठला शहाणा कमांडर स्वीकारणार होता ही जबाबदारी?... (क्रमशः)

From Himalayan Blunder by Brig. J. P. Dalvi
Thacker & Co. © with the Original Publisher

# आधुनिक विज्ञानेश्वरी


दत्तप्रसाद दाभोळकर

## अंतराळ युगात....

२५ जुलैला माणूस चंद्रावर उतरणार. आपल्या दृष्टीने हा महान विजयाचा क्षण आहे. अमेरिकन आणि रशियन शास्त्रज्ञांच्या दृष्टीने मात्र, हा फक्त अंतराळ-युगाचा श्रीगणेशा आहे. त्यानंतर काही वर्षांतच मानवाला दूरच्या ग्रहावर पोचवावयाचा त्यांचा मानस आहे. सूर्यमालेचा भेद करून त्या पलीकडे अंतराळयान पाठवण्याचाही त्यांचा विचार आहे. रशियन शास्त्रज्ञांनी तर दूरच्या ग्रहांवर जाऊन वसाहती करावयाची पण तयारी चालविली आहे. त्यांच्या मते हा लांबचा अंतराळ-प्रवास आपण कोणीही करू शकू; कारण, या प्रवासात मानवाला बेशुद्ध अवस्थेत संपूर्ण गोठवून अंतराळयानात ठेवले जाईल. अंतराळयान विवक्षित ग्रहाजवळ गेल्यावर त्या गोठवलेल्या प्रवाशाला ऊब देऊन चलनवलनक्षम बनविले जाईल.

अमेरिकन शास्त्रज्ञांचा विचार मात्र वेगळा आहे. त्यांच्या मते आता प्रत्येक तरुणाला अंतराळयुगात जगावयाचे शिक्षण मिळाले पाहिजे. आज अमेरिकेतील अनेक विद्यापीठांत हे शिक्षण दिले जाते. या सर्वांत पेनसिल्व्हानिया विद्यापीठाने आघाडी मारली आहे. त्या विद्यापीठाचे विद्यार्थी सकाळी सहलीसाठी म्हणून समुद्र-सपाटीपासून तीस मैल उंचीपर्यंत फेरफटका मारून येतात ! संध्याकाळी जरा पाय मोकळे करावयाला म्हणून समुद्राच्या पोटात पंधराशे फुटांपर्यंत खोल बुडी मारतात ! आणि पुन्हा या गोष्टी करण्यासाठी ते विद्यार्थी कोठे बाहेर जात नाहीत. विद्या-पीठाच्या आवारातच या सर्व गोष्टींची सोय आहे. त्या विद्यापीठाने उभारलेल्या ९५ टन वजनाच्या नव्या चिलखती प्रयोगशाळेमुळे या सर्व गोष्टी शक्य झाल्या आहेत. या प्रयोगशाळेची रचना एकूण चार खोल्यांत केलेली आहे. त्रेचाळीस फूट लांब आणि पंधरा फूट व्यासाच्या एका भल्या मोठ्या नळकांड्यात खोली क्रमांक एक आणि दोन उभारलेल्या आहेत. खोली क्रमांक एकमध्ये अंतराळात अठ्ठावीस मैल उंचीवर जे वातावरण असते ते निर्माण केलेले आहे. खोली क्रमांक दोनच्या

पायाशी असलेल्या खोली क्रमांक चारचे वजन पंचवीस टन आहे. सतरा फूट उंचीच्या आणि आठ फूट व्यासाच्या या खोलीत, समुद्राच्या पोटात सतराशे फूट खोलवर गेल्यावर पाणबुड्याला जो अनुभव मिळतो, तो विद्यार्थ्यांना अनुभवावयास मिळतो. पंधरा टन वजनाच्या सोळा फूट उंचीच्या आणि सहा फूट व्यासाच्या खोली क्रमांक तीनमध्ये प्रयोगशाळेतील प्राण्यांच्या वसाहती उठविल्या आहेत. त्या प्राण्यांत जीवाणू, उंदीर, कुत्री, माकडे वगैरे अनेक प्राणी आहेत. या प्राण्यांच्या अनेक पिढ्या या खोलीत वाढविल्या जातील. या प्रयोगामुळे मानवाने दूरच्या ग्रहांवर वसाहती केल्यास त्याच्या मानसिक व रासायनिक ठेवणीत कोणता फरक पडेल, हे समजून येईल.



पेनसिल्व्हानिया विद्यापीठातील नवी प्रयोगशाळा

या साऱ्या योजनेचे प्रमुख म्हणून वैद्यक शास्त्राचे नावाजलेले प्राध्यापक डॉ. लॅंबर्स्टन हे काम करताहेत. त्यांच्या मते, " अगदी लवकरच जगातील अनेक प्रमुख विद्यापीठांना अशा अनेक प्रयोगशाळा उभाराव्या लागतील. कारण, फार झपाट्याने आपण अंतराळयुगात प्रवेश करतोय. सर्वसामान्य माणूस मात्र आज या प्रयोगांनी भांबावून जातोय. कारण, चंद्रप्रवासावरच खुश असलेल्या सर्वसामान्य माणसांना, शास्त्रज्ञ किती झपाट्याने आपल्या पृथ्वीला अंतराळयुगात खेचताहेत याची कल्पनाच आलेली नाही ! "

## आपुले मरण....

मरण म्हणजे काय ? जीवन म्हणजे काय ? मरण आणि जीवन यांतील नक्की सीमारेषा कोणत्या ? मृत्युनंतर आपले काय होते ?—या प्रश्नांची समाधानकारक

उत्तरे अजून कोणालाच गवसलेली नाहीत. जेव्हा केव्हा या प्रश्नांची खरी उत्तरे आपणांला मिळतील, त्या वेळी ' जीवना 'चा सारा रंगच पालटून जाईल आणि या प्रश्नांची योग्य उत्तरे शोधण्याचा विडा सध्या विज्ञानाने उचललेला आहे. जगभर फार वेगवेगळया मार्गांनी या प्रश्नांचा अभ्यास केला जात आहे. या वेगवेगळया प्रयोगांत अतिशय अभिनव प्रयोग शिकागो विद्यापीठातील एका प्राध्यापकाने चालविलेला आहे. त्या प्राध्यापकाने एक वर्षभर शंभर वृद्ध माणसांच्यावर नकळत पाळत ठेवली होती. त्या प्राध्यापकाच्या प्रयोगाचे निष्कर्ष मोठे मननीय आहेत. तो म्हणतो, " त्या लोकांपैकी जे लोक मरण पावले त्यांपैकी नव्वद टक्के लोकांना आपण लवकरच मरणार हे अंतर्मनात कोठेतरी जाणवले होते. विशेष म्हणजे मरण पावलेल्यांपैकी अनेक जण कोणत्याही मोठ्या असाध्य रोगांनी आजारी नव्हते. काहीजण तर चक्क अपघातात मरण पावले. पण तरीही त्यापूर्वी काही महिने

## स्वप्नकथा....

कवी कविता कशी करतो ? चित्रकाराला चित्रे कशी सुचतात ? शास्त्रज्ञांना शोध कसे लागतात ? आपणा सर्वांनाच या प्रश्नांचे खूप कुतूहल असते. आणि नवनिर्मितीच्या या प्रक्रिया अनेकदा फार विचित्र असतात. कल्पनेहूनही अद्भुत असतात. डॉ. ऑटो लुई यांना आलेला हा विलक्षण अनुभव पाहा. डॉ. लुईंना एका रात्री एक स्वप्न पडले. त्या स्वप्नात त्यांनी एक मजेशीर पण सोपा प्रयोग केला होता. सकाळी उठल्यावर लुई यांना तो प्रयोग स्पष्ट आठवत होता. दुपारी प्रयोगशाळेत गेल्यावर तो प्रयोग करून पाहण्याचे त्यांनी नक्की केले. डॉ. लुई दुपारी प्रयोगशाळेत आले. आणि काय आश्चर्य ! प्रयोगशाळेत आल्यावर लुई यांना त्या प्रयोगातील काहीसुद्धा आठवत नव्हते. आपण काही तरी महत्त्वाचे विसरलो आहोत एवढी अनामिक हुरहूर मात्र मनात बाकी उरली होती. त्यांचा तो सबंध दिवस फार अस्वस्थतेत गेला. रात्री बेचैनीत लुई झोपी गेले. आणि त्या रात्री डॉ. लुई यांना पुन्हा ते स्वप्न पडले. झोपेतून उठल्यावर लुई यांनी प्रथम तो प्रयोग लिहून काढला. त्यानंतर तडक प्रयोगशाळेची वाट धरली. तो प्रयोग फार सोपा होता. एखाद्या बेडकाचे हृदय काढून घेऊन त्यातील रक्त वेगवेगळया द्रवाने भरून त्याला विद्युत संदेश द्यावयाचे होते. हा सोपा प्रयोग त्यांनी एका दिवसात पुरा केला. पण या एका प्रयोगामुळे मेंदूकडून आलेले संदेश स्नायूंपर्यंत एखाद्या पोकळीतून कसे प्रवास करतात हे समजून आले. या एका प्रयोगासाठी डॉ. ऑटो लुई यांना वैद्यक शास्त्रातले नोबेल पारितोषिक बहाल करण्यात आले !

आपण मरण पावणार हे त्या लोकांच्या अंतर्मनाला कळून चुकले होते. त्यांच्या जागृत मनाला याची जाणीव नव्हती. पण त्या लोकांच्या वागणुकीचे मानसशास्त्रीय पृथ:करण त्यांच्या अंतर्मनाला मरणाची चाहूल लागली होती ही गोष्ट निर्विवादपणे स्पष्ट करत होते.

हा संशोधक आपले प्रयोग आता मोठ्या प्रमाणावर करणार आहे. या वेळी तो स्त्री, पुरुष, वृद्ध, तरुण, बाल अशा अनेक गटांतील लोकांच्यावर पाळत ठेवणार आहे. प्रयोगातील महत्त्वाचा भाग म्हणजे ज्यांच्यावर अशी पाळत ठेवली जाईल, त्यांना त्याची काही माहिती नसेल. कोणत्या प्रकारची माहिती गोळा केली जात आहे, याची माहिती फक्त निकटच्या संशोधकांनाच देता येईल. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे माणूस मरण पावण्यापूर्वी त्याच्या अंतर्मनाला तशी जाणीव होते, का अंतर्मनाला मरणाची इच्छा झाल्यावर शरीरात काही रासायनिक व मानसिक

## माझ्या घरी मी पाहुणा....

माणूस चंद्रावरच्या दगडाचे नमुने गोळा करून पृथ्वीवर आणणार आहे. त्या नमुन्यांचे संपूर्ण पृथ:करण करणार आहे. पण एवढी अवघड गोष्ट करणाऱ्या मानवाला पृथ्वीच्या पोटात खूप खोलवर आत कोणत्या गोष्टी भरलेल्या आहेत, याची काहीही कल्पना नाही. पृथ्वीच्या अंतरंगाबद्दलचे आपले आजचे ज्ञान तसे फारच जुजबी आहे. पृथ्वीची घनता साडेपाच आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागावरचा फार मोठा भाग असलेल्या पाण्याची घनता फक्त एक आहे. पृथ्वीवरील दगडांची घनता सरासरी तीन आहे. याचा अर्थ पृथ्वीच्या अंतरंगाची घनता साडेपाचहून अधिक आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागावर जे दगड मिळतात ते समुद्राच्या तळापासून खाली दहा मैलां-पर्यंत व जमिनीच्या पृष्ठभागापासून चाळीस मैलांपर्यंत खोलवर मिळत असतात. त्यानंतर अतिशय वजनदार व एकजिनसी पदार्थाचा प्रदेश सुरू होतो. त्यानंतर एखाद्या अती जड धातूचा प्रदेश असेल. सर्वांत आत पाऱ्यासारख्या पण खूप जड अशा द्रवाचा साठा असेल. पण या साऱ्या कल्पना आहेत. आणि येल विद्यापीठातील प्राध्यापक वॉल्टन आणि फ्लिंट यांच्या मते या गोष्टी अखेर कायम कल्पनाशक्तीवरच सोपवाव्या लागतील; कारण मानव दूरच्या ग्रहांवर सहज जाऊ शकेल. पण पृथ्वीच्या मध्यापर्यंत एखादा खड्डा खणून पृथ्वीचे अंतरंग समजावून घेणे मात्र विज्ञानाला कधीच शक्य होणार नाही ! '

बदल घडून माणूस मरण पावतो हे बघावे लागेल. आपण मरणार याची अंतर्मनाला जाणीव झालेल्या एखाद्या माणसाच्या अंतर्मनाला, तू खूप जगणार आहेस, असे बाह्य संदेश देऊन त्याचे मरण पुढे ढकलता येते का, हे पण पाहावे लागेल. हा प्रयोग तसा खूपच किचकट आहे. पण त्या संशोधकाने मात्र आपल्याशी एक वायदा केलाय. केवळ तीन वर्षांत त्याच्या संशोधनाचे संपूर्ण निष्कर्ष तो आपणांसमोर ठेवणार आहे.

## आळशावर गंगा....

आळशावर गंगा आली तर काय होत असेल याची कल्पना मला परवा आली. त्या वेळी मी विज्ञानजगातले काही अत्याधुनिक अहवाल चाळत होतो. बिचारे जगभरचे संशोधक दिवसरात्र काम करून आपणांसाठी काही शोध लावतात. आपण ते साधे वाचण्याचेही श्रम घेत नाही. जे कोणी वाचतात त्यांना त्या संशोधनाचा उपयोग करून घेण्याची कुवत नसते.

माझ्या वाचनात आलेला पहिला अहवाल फिलिपाईन्समधला आहे. फिलिपाईन्सच्या आंतरराष्ट्रीय भात संशोधन केंद्राने आशियाई देशांना-विशेषतः भारताला-उपयोगी पडेल असा एक शोध लावलेला आहे. भारतात भाताची रोपे उतारावरून काढून नंतर पाण्याच्या खाचरांत वाढवली जातात. त्या खाचरांत भाताबरोबर इतर निरुपयोगी गवत, तण (वीड) वगैरे गोष्टी पण वाढतात. हाताने हे तण उपटून काढणे जिकिरीचे तर असतेच, पण त्यात संपूर्ण यशही मिळत नाही. या संशोधन केंद्राने हे तण नष्ट करण्यासाठी 'अल्फा ट्राय क्लोरो इथाईल स्टाइरीन' [टी. सी. ई स्टाइरीन] हा रासायनिक पदार्थ उपयोगात आणला आहे. त्यांच्या मते एक एकर जमिनीत दोन किलो या प्रमाणात हा पदार्थ वापरला तर भाताला काही अपाय न होता फक्त तण तेवढे मरतात.

दुसरा अहवाल आंध्र प्रदेशातील केंद्रीय तंबाखू संशोधन केंद्रातील आहे. त्यांच्या मते एखाद्या प्रदेशात पावसाळी पीक म्हणून तांदूळ घेतला, त्यानंतर त्याच प्रदेशात लागोपाठ हिवाळी पीक म्हणून तंबाखू पेरला तर शेतकऱ्याला दर एकरी किमान रुपये दोनशे अधिक सुटले पाहिजेत. त्यांच्या या प्रयोगात दोन्ही पिकांना त्यांनी नायट्रोजन, फॉस्फरस आणि पोटॅशिअम खत म्हणून पुरवले होते. दर हेक्टरमागे ९३४ किलो तांदूळ आणि १०८० किलो तंबाखू पिकला, असा त्यांचा दावा आहे.

तिसरा अहवाल ब्रिटनमधला आहे. कडधान्यांवर जर 'प्रोपिऑनिक ॲसिड'चा शिडकावा मारला तर बंदिस्त वा मोकळया जागेत ती धान्ये अधिक काळपर्यंत अधिक चांगली टिकतात, असा त्यांचा अनुभव आहे. 'प्रोपिऑनिक ॲसिड'चा प्रकृतीवर काही वाईट परिणाम होत नाही. उलट थोड्या प्रमाणात का होईना

पण ते धान्य अधिक पौष्टिक बनते. 'प्रोपिऑनिक ॲसिड ' बनवणे पण तसे कठीण नाही. हातभट्टी चालवू शकणारा कोणीही प्रोपिऑनिक ॲसिड बनवू शकेल! किंबहुना, दारू (अल्कोहोल) आणि 'कार्बन मोनॉक्साइड ' एकत्र तापवूनच 'प्रोपिऑनिक ॲसिड ' बनवले जाते.

हे सारे प्रयोग शेतकऱ्यांच्यासमोर ठेवीपर्यंत त्यात अनेक बदल करावे लागतील, हे उघड आहे. प्रत्येक जिल्ह्याच्या हवामानानुसार वेगवेगळे प्रयोग पण करून पाहावे लागतील. पण आमच्या जिल्हा पातळीवरच्या कर्तृत्ववान जागरूक पुढाऱ्यांनी या गोष्टी मनावर घेतल्या तर हे सहजशक्य आहे. जिल्ह्यात कृषी विद्यापीठ मिळविण्यापेक्षा हे अधिक जरुरीचे आहे ! –खरे पाहता हे आपणा सर्वांनाच आव्हान आहे... पण आपण सारेचजण या गोष्टी फारशा मनावर घेत नाही हे एका अर्थाने बरेच आहे. कारण आपण असल्या काही गोष्टी केल्या तर मग अमेरिकन शेतकऱ्यांना काही फारसे काम उरणार नाही. ते बेटे आपल्यासारखेच आळशी बनतील ! ■■




मुंबई समाचार [पान २ वरून]

लोकसंख्येनुसार प्रतिनिधित्व मिळावं, ऊस्मानिया विद्यापीठाचं कुलगुरूपद मुसलमानाकडे असावं, उर्दूला राजभाषेचा दर्जा प्राप्त व्हावा वगैरे मागण्या ह्या समाजानं सादर केल्या होत्या. श्री. ब्रह्मानंद रेड्डींनी ह्या मागण्या मान्य केल्यास मुसलमान समाजाचा तेलंगण चळवळीच्या विरोधात सरकारला पाठिंबा राहील असंही सांगण्यात आलं होतं. परंतु सरकारनं ह्या मागण्या फेटाळल्या. साहजिकच ह्या मुसलमान समाजाने तेलंगणवाद्यांना पाठिंबा दिला. हैद्राबादचे काही स्थानिक सांगतात की तरूण आणि महत्त्वाकांक्षी निजामाचा तेलंगणवाद्यांना नैतिक व आर्थिक पाठिंबा आहे. निजामाच्या नेतृत्वाखाली मुसलमानांची, असंतुष्टांची व अराजकतेचं स्वागत करायला तत्पर असलेल्या कम्युनिस्टांची आघाडी उघडून, स्वतंत्र तेलंगणाचा डाव आज रचला जात आहे. कांही भावनिक तरुणही ह्या डावाला बळी पडू पाहात आहेत. काही असो, पण जुन्या निजामशाहीची स्वप्ने आज तेलंगणात पद्धतशीरपणे रुजवली जात आहेत, मुस्लिम–जातीयवादाला चिथावणी दिली जात आहे.

काही दिवसांपूर्वी, डावे कम्युनिस्टस्, मुस्लिम लीग, कुडवे–भावनाविवष बंगाली व पूर्व बंगालमधले साम्यवादी, चीनच्या आशिर्वादाची स्वतंत्र, सार्वभौम बंगालची स्वप्ने रंगवीत असल्याचा ईषारा सरसंघचालकांनी दिला होता. "दोन्ही बंगाल एकत्र येऊन, चीनच्या पंज्याखालील स्वतंत्र बंगाल राष्ट्राची निर्मिती करण्याचा प्रयत्न झाल्यास, त्यात मला आश्चर्य वाटणार नाही." असे अगदी अलिकडेच सांगून श्री. स. का. पाटलांनीही श्री. गुरुजींच्या संशलाया दुजोराच दिला आहे.

ह्याच सुरात केरळीयांनीही आपला सूर मिसळला आहे. मल्लपूरम् जिल्ह्याच्या निर्णयामुळे जातीय तेढ आज केरळात आधीच धुमसत आहे. मंत्रिमंडळही अस्थिर वाटचाल करीत आहे. अशाच वेळी केरळचे कामगारमंत्री श्री. मथाई मंजूरन् ह्यांनी पालघाट येथे भाषण करताना "स्वतंत्र, सार्वभौम केरळ" हे आपले उद्दीष्ट असल्याचं जाहीर केलं आहे. श्री. मंजूरन् हे केरळ समाजवादी पक्षाचे (कच्छ आंदोलनाचे वेळी सं. स. मधून बाहेर पडलेला गट) एक जबाबदार नेते. केरळचे मुख्यमंत्री श्री. नंबुद्रिपाद ह्यांच्या खास मर्जीतले ! श्री. मंजूरन् आपलं उद्दीष्ट जाहीर करूनच थांबले नाहीत, तर मुस्लिम लीग, डावे कम्युनिस्ट आदिंचा आपल्या ह्या चळवळीला पाठिंबा राहील असंही सांगून ते मोकळे झाले आहेत. "डावे कम्युनिस्टस्, केरळ–समाजवादी, मुस्लिम लीग व अन्य स्वतंत्र केरळवादी संघटनांची आघाडी बांधून ह्या अंतिम उद्दीष्टांसाठी चळवळ उभी केली जाईल." असा ईषाराही श्री. मंजूरन् ह्यांनी दिला.

केरळ, बंगाल, आंध्रमधल्या ह्या प्रयत्नांच्या बातम्या वाचल्या की, एकक भयानक शक्ती भारतीय एकात्मतेच्या मुळावरच घाव घालायला कशा आसुसलेल्या आहेत ह्याचं चित्र उभं राह्यला हरकत नसावी. ह्या प्रयत्नांकडे, शक्तिकडे उपेक्षा भावनेने पाहून चालणार नाही, तर त्यांची वेळीच दखल घेतली जाणं आवश्यक आहे. नाहीतर, छिन्न–विछिन्न भारताचं चित्र पाहायला आसुसलेल्यांच्या, चीनवादी कम्युनिस्टांच्या, खुद्द चीनच्या आशिर्वादाने हा आंधळा जातीयवाद, "स्वतंत्र" राष्ट्रवाद फोफावेल, आणि अराजकाला ते आमंत्रणच ठरेल. सापांच्या ह्या शेपट्या वळवळताहेत तोवरच त्या ठेचल्या तर ठीक, नाहीतर फणे उभारून फुत्कारायला लागल्यावर त्यांना आवरणं फार फार जड जाईल ! रक्ताचं पाणी करून ज्या स्वातंत्र्ययोद्धयांनी ह्या मायभूमीला स्वतंत्र केलं, तिचं एकात्म रूप घडवलं, त्यांच्या साऱ्या स्वप्नांचा चुराडा होईल !! त्यांच्या परिश्रमांवर साफ बोळा फिरवला जाईल !!!

---

## आमचे छोटे शेजारी

---

आपल्या दोन शेजारी राष्ट्रांना भेटी द्यायला श्रीमति इंदिरा गांधी व श्री. दिनेश सिंग हे दोन वरिष्ठ केंद्रीय मंत्री सध्या गेलेले आहेत. आपल्या छोट्या–छोट्या शेजारी राष्ट्रांना आपले मंत्री भेटी देतात, त्यांना अमाप प्रसिद्धी मिळते, त्या भेटींना महत्त्व निर्माण होतं, त्या शेजारी राष्ट्रांचे नेते भारताला भेटी देतात–भारताचा आपल्या छोट्या शेजाऱ्यांबरोबरच्या संबंधांबाबतचा हा नवा दृष्टिकोन निश्चितच स्वागतार्ह आहे; उत्साहजनक आहे ! ही छोटी शेजारी राष्ट्रेही कोणत्या दृष्टिकोनातून भारताकडे बघत असतात ह्याचेही उत्तम उदाहरण पंतप्रधानांच्या सांप्रत भेटीत पाह्यला मिळालं. अफगाणिस्तानात त्यांचं अपूर्व स्वागत तर झालंच, पण कधी कुठल्याही परदेशी पाहुण्यास न मिळालेला, जिर्गापुढे (दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेपुढे) भाषण करण्याचा मानही त्यांना मिळाला. अफगाण नेत्यांनी ह्या संदर्भात असंही सांगितलं की, आशियाई राष्ट्रांनी, विशेषत: उपखंडातल्या व त्या आसपासच्या राष्ट्रांनी एकत्रित येऊन स्वत:चे आर्थिक, सामाजिक प्रश्न सोडवावेत, व ह्या बाबतीत भारतानं नेतृत्त्व द्यावं ! हे वाक्य, भारताच्या छोट्या शेजाऱ्यांच्या, भारतापासूनच्या अपेक्षा बोलून दाखवणारं आहे. दुर्दैवानं आजपर्यंत, रशिया, अमेरिका, ब्रिटन, चीन ह्या दूरच्या बड्या राष्ट्रांबरोबरच्या संबंधांवरच भारतानं आपलं सारं लक्ष केंद्रित केलं होतं. आज ही परिस्थिती बदलू पाहत आहे, हे सुचिन्हच मानलं पाहिजे. ह्या छोट्या शेजाऱ्यांच्या आर्थिक विकासात भारत आज मदत देऊ पाहत आहे; भारताच्या सहकार्यानं ह्या देशांतून औद्योगिक प्रकल्प उभे राहत आहेत.

ह्या छोटचा शेजाऱ्यांबरोबरच्या घनिष्ठ संबंधातूनच भारत स्वतःचं विशिष्ठ स्थान आशियात व पर्यायानं जगात निर्माण करू शकेल. ह्या दृष्टिनं अफगाणिस्तान व नेपाळला श्रीमति गांधी व परराष्ट्रमंत्री श्री. दिनेश सिग ह्यांनी दिलेल्या भेटी यशस्वी झाल्या आहेत असंच म्हटलं पाहिजे. नेपाळबरोबर 'सुस्ता' सिमेवर भारताचे मतभेद आहेत, पण ते वाटतात तितके तीव्र नाहीत हेच भारत-नेपाळ संयुक्त पत्रकातून दिसून आलं आहे. ईराण, सिंगापूर, मलेशिया, सिलोन वगरे बरोबरच्या अलिकडच्या वाटाघाटींतून भारताची ही नवी वाटचालच स्पष्ट दिसून येईल.

पंतप्रधानांच्या अफगाणिस्तान भेटीला आणखीही एका दृष्टीने महत्त्व आले होते–व ते म्हणजे सरहद्द गांधींना भारत भेटीचे आमंत्रण! भारतीय स्वातंत्र्यलढचातला एक अग्रेसर स्वातंत्र्ययोद्धा व अखंड हिंदुस्थानचा कट्टर पुरस्कर्ता असलेल्या खान अब्दुल गफारखानांना पाकिस्तान-निर्मितीनंतर खडतर हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. पाकिस्तानांतर्गत पठाणांना न्याय मिळत नाहीसं दिसून आल्यावर त्यांनी स्वतंत्र पख्तुनिस्तानच्या मागणीसाठी लढा उभारला. आज अफगाण सरकारच्या आश्रयात राहून तिथून ते ह्या लढचाचं नेतृत्व करीत आहेत. यंदा गांधी-जन्मशताब्दी महोत्सव. त्या सुमारास सरहद्द गांधींना भारतात बोलावून त्यांना 'नेहरू पारितोषिक' द्यावं, असा सार्थ विचार! पण, हा विचार अंमलात आणण्याचा निर्णय घेण्यासाठी कित्येक महिने लागले! सरहद्द गांधींना भारतात बोलावून त्यांचा सन्मान करावा ही भावना; तर तसं करणं म्हणजे आधीच निमित्तासाठी टपून बसलेल्या पाकिस्तानच्या टिकेला आमंत्रण देणं–अशा कात्रीत सरकार सापडलं होतं. कारण, हे आमंत्रण व सरहद्द गांधींचा सन्मान म्हणजे स्वतंत्र पख्तुनिस्तान चळवळीला पाठिंबा असाच अर्थ पाक लावणार. म्हणजेच पाकिस्तानच्या अंतर्गत व्यवहारात भारतानं हस्तक्षेप केला, अशी ओरड करायला पाकला संधी मिळणार! दलाई लामांना आश्रय देऊन पोळलेला भारत, म्हणूनच सरहद्द गांधींना बोलवायला कचरत होता. शेवटी, दडपण आल्यामुळे म्हणा किंवा भावनांचा विजय झाला म्हणून म्हणा, हे धारिष्टच करायचं भारतानं ठरवलं आहे. आमंत्रण दिलं गेलं आहे, स्वीकारलंही गेलं आहे. अर्थात पाकिस्तान त्याचं भांडवल करणार, हेही निश्चित! भारताला पाकिस्तानचा राग सहन करणं किंवा सरहद्द गांधींना, ज्येष्ठ-श्रेष्ठ स्वातंत्र्ययोद्धचाला मानाचा मुजरा देऊन ऋणमुक्त होणं हे दोनच पर्याय होते! स्वतंत्र अस्मितेला जागून दुसरा पर्याय भारतानं मानला आहे–परिणाम काहीही होवोत!

सरहद्द गांधी येत आहेत. त्यांचा सत्कार करून त्यांना प्रचंड थैली अर्पण करायचा संकल्प साथी जयप्रकाश नारायणांनी सोडला आहे. जयप्रकाश ही फार बडी असामी–कट्टर गांधीवादी! देशातली कुठलीही महत्त्वाची जागा खाली होवो, त्या जागेसाठी त्यांचं नाव एकदा तरी सुचवलं जातंच! पण ते नेहमीच अशा सत्तेच्या खुर्चीपासून

दूर राहिले आहेत. ज्येष्ठ, श्रेष्ठ गांधीवादी, स्वातंत्र्यसैनिक असे जयप्रकाशजी परवा चक्क नक्षलवाद्यांना आशीर्वाद देते झाले. ती चळवळ त्यांना लोकोपयोगी वाटली–भाग्य......???

■■

# पुरंदऱ्यांची दौलत

ब. मो. पुरंदरे

मूल्य साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन,

१०२५ सदाशिव, पुणे २

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



श्री. गो. जोशी, सायनाचार्य

२१ ते २७ जून, १९६९

**मेष :** सूर्य पराक्रमात आला आणि तुमची पावले प्रगतीकडे वेग घेऊ लागली. आगामी महिन्याभराच्या कालात तुम्हाला अनेक कार्यात घवघवीत यश मिळू लागेल. व्यवसायधंद्याचे क्षेत्र विस्तारेल, नोकरीत चांगली चार पावले पुढे पडतील.

तुमचा प्रगतीचा मार्ग अडविण्याची आता कुणाचीही हिंमत नाही. दूरचा प्रवास, परराष्ट्रीय व्यवहार, राजकीय व सामाजिक कार्यात पुढारीपण अशा अनेक गोष्टी अपेक्षेबाहेर घडून याव्यात.

सांपत्तिक दृष्टीने हा आठवडा इतर कालाच्या मानाने बराच अनुकूल जाणवेल. यांत्रिकधंदे, छपाई, ग्रंथ प्रकाशन इत्यादी बाबतीतही आपणास अपेक्षेप्रमाणे कार्य करून दाखवता येईल.

दि. २२, २५, २७ या कालावर लक्ष ठेवा.

**वृषभ** : उद्वेग, चिंता, नैराश्य हे प्रकार या आठवड्यापासून फारसे जाणवतील असे मला वाटत नाही. संपूर्ण स्वास्थ्य जरी लाभले नाही तरी; अनिष्ट कालावर आपण विजय मिळवू शकाल अशी लक्षणे दिसू लागतील. विरोधाची धार बोथट बनेल. हितशत्रूंची कारस्थाने मंदावतील. तरीसुद्धा ८ जुलैला मंगळ मार्गी होईतोपर्यंत काहीसे सावधगिरीनेच वागायला हवे.

भागीदारीतील संघर्ष मिटण्याची लक्षणे दिसू लागतील. मोठ्या प्रयासाने थोरांचे सहकार्य मिळवू शकाल. सांपत्तिक ताण काहीसा कमी जाणवेल.

नोकरीधंद्यांत सतत जुळतेमिळते घेण्याची प्रवृत्ती ठेवावी लागेल. मंगलकार्याचे काही काल पुढे ढकलणे चांगले.

दि. २३, २५, २६ अपेक्षित लाभ पदरी पडावेत.

**मिथुन :** सूर्याचे भ्रमण तुमच्या राशीतूनच सुरू आहे. तो तुमचे जीवन प्रकाशमान करील अशी आशा करता येईल. आता सहसा कोणत्याही अनिष्ट ग्रहाची तुम्हाला बाधा होईल अशी भीती बाळगण्याचे कारण नाही.

आरोग्य आणि पैसा या दोन्हीही बाबतीत आपणास स्वास्थ्य लाभू शकेल. नोकरीधंद्यातील हुकलेल्या संधी पुन्हा लाभण्याची लक्षणे स्पष्टपणे दिसू लागतील.

शनि-शुक्र एकादशात आहेत तोपर्यंत तुम्हाला पैशाअडक्याची उणीव सहसा जाणवणार नाही. स्थावराचा व वाहनांचा प्रश्न सोडविण्यात यशस्वी व्हाल, साहित्याच्या प्रांतात चांगलीच प्रतिष्ठा मिळवाल.

दि. २५ ते २७ या काली अपेक्षित लाभ घडावेत.

**कर्क :** सूर्य व्ययस्थानी आल्याने तुमची प्रगती रोखली जाईल, अशी भीती बाळगण्याचे मुळीच कारण नाही. गुरू-मंगळांनी आपली सारी शक्ती तुमच्या पाठीशी उभी केलेली असल्याने आपल्या प्रगतीचा वेग थोडाफार वाढेलच. या आठवड्यात खर्च वाढेल पण प्राप्तीतही अपेक्षेबाहेर वाढ होईल.

दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवले जाईल. अनेकांच्या सहकार्याने नव्या व्यवसायधंद्याची योजना आखली जाईल.

नवे करारमदार होतील, कला-क्रीडा क्षेत्रात भाग घेण्याची संधी लाभेल, अनपेक्षित स्वरूपाचे लाभ घडणे अगदीच अशक्य नाही.

दि. २२ ते २५ हा काल विशेष चांगला व प्रगतीचा जाणवेल.

**सिंह :** सूर्य लाभस्थानी आणि शुक्र भाग्यस्थानी एवढी ग्रहस्थितीही मंगळाचा सारा विरोध मोडून काढावयास समर्थ ठरेल. प्रकृती, पैसा आणि व्यवसायिक यश या बाबतीत आता आपणास निःशंकपणे प्रगतीकडे जाता येईल. नवे साहस करायला उद्युक्त व्हाल, आजवर न मिळालेले यश निश्चितपणे मिळवून दाखवाल. मंगळ मार्गी होण्याची वाट पाहण्याची गरज नाही.

नोकरीधंद्यांत स्थानांतर, बदल घडून येणे कोणत्याही क्षणी शक्य आहे. प्रत्येक गोष्टीत आता जुळते मिळते घ्यायलाच हवे असा प्रसंग आता जाणवणार नाही. निर्धाराचे खड्ग उपसून पुढे व्हा. यश तुमचेच आहे.

दि. २१ ते २५ सर्वोत्तम प्रगतीचे दिवस.

**कन्या :** गुरू-मंगळाचे सहकार्य आपणास वाटेल तेव्हा मिळू शकेल आणि त्यांच्या साहाय्याने आपण कोणताही अवघड गड जिंकू शकाल. परिस्थिती हाताबाहेर जाणार नाही अशी खात्री वाटू लागेल. पैश्याअडक्याचा प्रश्नही सहजपणे सुटू शकेल.

प्रतिभेचा उन्मेष बहरेल, अनन्यसाधारण कार्य साहित्याच्या क्षेत्रात करून दाखवाल.

आजवरच्या रगाळलेल्या कार्यांना या आठवड्यापासून चांगलीच गती मिळू लागेल.

नवे क्षेत्र हस्तगत कराल आणि त्या क्षेत्रात विजयावर विजय मिळवून दाखवाल. आठव्या शनीची दखल घ्यायचीही गरज भासणार नाही. अनेक कामे झटपट निपटून काढली जातील.

दि. २३ ते २६ आपल्या बऱ्याचशा समस्या सुटू लागतील.

**तूळ :** सूर्य भाग्यस्थानी आला त्या क्षणापासूनच आपल्या मनातील नैराश्य औदासिन्य यावर पडदा पडला. आता तुम्हाला सहसा कोणत्याही बाबतीत माघार घ्यावी लागणार नाही.

शनीच्या विरोधात फारसा दम नाही. मंगळही तुमच्या प्रगतीच्या आड येण्याचे साहस करणार नाही.

दूरचा प्रवास घडेल, नव्या वातावरणात आपले ठीक बस्तान बसेल, नवे स्नेह-संबंध जोडले जातील. साहित्यिकांनी, कलावंतांनी मात्र अजुन काही काल जपून पावले टाकायला हवीत, सामाजिक ताण फारसा बसणार नाही; प्रयत्नांची शिकस्त केलीत तर अपेक्षेबाहेर यश पदरी पाडून घेता येईल.

दि. २१–२२–२६–२७ यशस्वी व्हाल.

**वृश्चिक :** गुरू एकदशांत–एवढी एकच ग्रहस्थिती सध्या आपणास अनुकूल आहे अन्य ग्रह मात्र तुमच्यावर काहीसे नाराजच दिसतात. यामुळे आपल्या कार्यात आपणास यश मिळेल पण ते मिळविण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल. सांपत्तिक बाजू ठीक राहील पण अवास्तव खर्चाला काही आळा घालू शकणार नाही. धावपळ धडपड तर अजुन कित्येक दिवस सहन करावी लागेल.

फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलू नका. सामाजिक क्षेत्रात फारसा भाग घेऊ नका. आणि प्रकृतीकडेही दुर्लक्ष करू नका. स्थावर–वाहन या बाबतीत सतत सावध राहावे लागेल. लोकांच्या अभिवचनावर विश्वासून राहणे योग्य ठरणार नाही.

२३ ते २५ एवढाच काल अनुकूल व स्वास्थ्याचा जाणवेल.

**धनु :** सूर्याचा विरोध आणि मंगळाची अडवणूक अशा दुहेरी पेचात आपण आपण सापडला आहात अर्थात् यातूनही यशस्वीपणे बाहेर पडण्याचे सामर्थ्य तुमच्या ठिकाणी असल्यामुळे तसे निराश होण्यासारखे काही घडणार नाही.

सामाजिक ताण याही आठवड्यात कमी होण्याची लक्षणे दिसणार नाहीत. त्याच अडचणी, त्याच विवंचना पण दशमांतील गुरूमुळे तुमच्या प्रतिष्ठेला धक्का लाग देणार नाही.

नोकरी धंद्यातील पेचप्रसंग शिकस्तीच्या प्रयत्नाने सुटू शकतील, प्रगतीकडे पावले पडू लागतील असे वातावरण निर्माण होईल.

अनारोग्याची चिंता करण्याचे आता मुळीच कारण नाही. तरीसुद्धा हा आठवडा फारसा स्वास्थ्याचा जाणवेल अशी अपेक्षा करण्यात अर्थ नाही. २५ ते २७ या काली काही गोष्टीत चांगले यश लाभावे.

**मकर** : या वेळी एकट्या गुरूच्या एकखांबी तंबूवरच तुमचा सारा डोलारा सावरलेला आहे. कोणत्याही क्षणी वादळ होईल आणि त्या तंबूचे तणाव ढिले होऊ लागतील. म्हणून सतत सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

पैसा प्रतिष्ठा या बाबतीत चुकूनही उणीव भासू शकणार नाही पण अपेक्षित स्वास्थ्य लाभायला एवढ्या गोष्टी अपुऱ्या जाणवतील.

चौथ्या शक्तीमुळे कामे गतिशून्य बनू लागतील, प्रकृतीच्या बारीक सारीक तक्रारींमुळे मन अस्वस्थ बेचैन बनेल. उद्योगधंद्याचे नित्याचे तंत्र थोडेफार बदलावे असे वाटू लागेल. प्रवासाचे शक्यतो टाळा. २३ ते २५ या काळी अपेक्षेप्रमाणे सर्व काही घडावे.

**कुंभ** : या आठवड्यापासून अनेक ग्रहांचे हार्दिक सहकार्य आपणास लाभणार असल्यामुळे गेल्या काही दिवसातील बऱ्याचशा व्यावसायिक व आर्थिक विवेचना दूर व्हायला लागतील.

नव्या जबाबदाऱ्या वाढीस लागतील, नव्या क्षेत्रात अनेकांचे सहकार्य लाभेल, व्यावसायिक वातावरण अपेक्षेप्रमाणे सुधारायला लागेल. गुरू अनुकूल नाही म्हणून मागे रेंगाळू नका. गुरू मार्गी झाला तेव्हाच त्याने तुमचा भविष्यकाल अनुकूल असल्याचे सुचविले. उद्योग धंद्यात बरीच वाढ होईल, नोकरीमध्ये एक पाऊल पुढे पडेल, संशोधन क्षेत्रात नाव घेण्यासारखे कार्य हातून घडेल, आरोग्यही सुधारेल.

दि. १४–२५–२७ यशस्वी व लाभाचे दिवस.

**मीन** : हाही आठवडा गेल्या २–३ आठवड्याप्रमाणे आपणास लाभाचा व प्रगतीचा जाणवेल. राहत्या जागेचा प्रश्न याच आठवड्यात सुटावा. व्यावसायीक क्रांतीला वाव देणाऱ्या अनेक गोष्टी भरभर घडून यायला लागतील.

साहित्यिक क्षेत्रातील व्यक्तीस हे दिवस बरेच चांगले व प्रगतीचे जाणवू लागतील.

नवे स्नेह संबंध जुळतील, बिघडलेले वातावरण सुधारू लागेल. पैसाआडका मोठ्या प्रमाणावर जरी मिळाला नाही, तरी आपल्या नित्याच्या गरजा भागविण्यात मुळीच अडचण जाणवणार नाही.

प्रवासाचे काही काल टाळा.

दि. २३–२५–२६ या वेळी आपल्या अपेक्षा बऱ्याच प्रमाणात सफल व्हाव्यात ■■

**राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस, प्रा. लि., १७-ब, कोथरूड, पुणे ४ येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.**

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H–649



"'देशातील अनाचाराला पायबंद घालण्याचं आता तरुण पिढीनंच मनावर घेतलं पाहिजे अन् आपल्या कर्तृत्वानं जुन्या पिढीला धडा शिकवला पाहिजे' असं घोळून घोळून सांगायला नको होतं साहेब, तुम्ही आपल्या भाषणात...."